CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ६ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७७ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स

वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : वानखेडे मैदान, मुंबई

## विचारपुष्प



नि आंतरिक सिद्धांत किंवा विचार कितीही महान आणि श्रेष्ठ असला तरी तो संघटनेशिवाय साकार होऊ शकत नाही. असाधारण योग्यता-संपन्न, सक्षम आणि दृढनिश्चयी कार्यकर्तेच संघटनेच्या आदर्शांना मूर्त रूप देऊ शकतात.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी



# नागरी सुरक्षेचे मॉक ड्रील करा

● **केंद्र सरकारचा राज्यांना आदेश, बुधवारी सायरन वाजणार**
● **नागरिकांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचा निर्देश**

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने कंबर कसली असून दररोज या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. या कारवाईचा एक भाग म्हणून देशात संभाव्य युद्धस्थितीच्या सज्जतेसाठी सरकारने देशभरात मॉक ड्रिल करण्याचे जाहीर केले आहे. सोमवारी झालेल्या बैठकीमध्ये केंद्र सरकारने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले असून येत्या ७ तारखेला बुधवारी संपूर्ण देशात मॉक ड्रिल होणार आहे.

सोमवारी पंतप्रधान मोदी यांच्या सात लोककल्याण मार्ग येथील निवासस्थानी उच्चस्तरीय बैठक पार पडली. संरक्षण खात्याचे सचिव राजेश कुमार सिंह हे वैठकीला उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्याबरोबर बैठक झाल्यानंतर लगेचच पंतप्रधानांनी गृहसचिव गोविंद मोहन यांच्याशी चर्चा केली.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांचे संबंध ताणले गेलेले आहेत. पाकिस्तान हा देश दहशतवादाला खतपाणी घालतो, अशी भूमिका भारताने संयुक्त राष्ट्रसंघात मांडलेली आहे. त्याच पृष्ठभूमीवर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावले उचलायला सुरुवात केली आहे. संपूर्ण देशामध्ये बुधवारी सायरन वाजला जाणार आहे. हवाई हल्ल्याचा अलर्ट देणारा सायरन असेल, असा त्याचा अर्थ आहे.

भारत-पाकिस्तान तणावाच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने देशातील सर्व यंत्रणांना अलर्ट राहण्याचे आदेश दिले आहेत. भविष्यात युद्धजन्य परिस्थिती उद्‌भवली तर नागरिकांना धोका होऊ नये, यासाठी सर्वसामान्य लोकांना स्वसंरक्षणाचे ट्रेनिंग दिले जाणार आहे. विद्यार्थी, युवक आणि सर्वसामान्य लोकांना स्वसंरक्षण आणि आपल्या परिसराचे संरक्षण करता यावे, यासाठी केंद्र सरकार प्रशिक्षण देणार असल्याची माहिती आहे. (वृत्तसंस्था)

### मोठा निर्णय होण्याची शक्यता

पहलगाल हल्ल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या वेगाने बैठका घेऊन निर्णय घेत आहेत ते पाहता येत्या काही दिवसांमध्ये मोठा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. हा निर्णय कोणत्या स्वरूपाचा असेल, याबाबत केवळ आराखडे बांधले जात आहेत.

# संरक्षण वेबसाईट्सवर सायबर हल्ला

**पाकच्या 'ना'पाक कारवाया सुरूच**

**गोपनीय माहिती लीक झाल्याचा संशय**

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

गेल्या महिन्यात जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध प्रचंड तणावपूर्ण बनलेले आहेत. यादरम्यान, दोन्ही देशांकडून आपल्या लष्करी बळाची चाचपणी सुरू आहे. त्यातच कुरापतखोर पाकिस्तानने आता भारतावर सायबर हल्ले करण्यास सुरुवात केली आहे.

पाकिस्तानमधील हॅकर्सनी भारताच्या संरक्षण दलाशी संबंधित काही संकेतस्थळांना लक्ष्य केले आहे. भारतीय लष्कराने दिलेल्या माहितीनुसार भारताच्या काही महत्त्वपूर्ण संरक्षण संकेतस्थळांना लक्ष्य करण्यात आले असून, संरक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांची गोपनीय माहिती लीक झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

लष्कराकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार पाकिस्तान सायबर फोर्स नावाच्या एका एक्स हँडलने मिलिट्री इंजिनियर सर्व्हिसेस (एमईएस) आणि मनोहर पर्रिकर संरक्षण अध्ययन आणि विश्लेषण संस्था (आयडीएसए) यांच्या डाटामध्ये घुसखोरी केली आहे. या सायबर हल्ल्यात संरक्षण कर्मचाऱ्यांचे लॉगिन क्रेडेंशिल्ससह बरीचशी गोपनीय माहिती लीक झाली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे.

**भारताचे दोन शत्रू झाले मित्र!**

एकीकडे पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्या संबंधात कमालीचे वितुष्ट आले असताना संपूर्ण जगातील बहुतांश देश भारताला दहशतवादविरोधी लढ्यात पाठिंबा जाहीर करत आहेत तर दुसरीकडे, या क्षणी चीनने पाकिस्तानला पाठिंबा देत भारतविरोधी भूमिका सिद्ध केली आहे. आशियातील शांततेसाठी आम्ही पाकिस्तानसोबत आहोत, असे चीनने जाहीर केले आहे. (वृत्तसंस्था)

## पालकमंत्री जयकुमार गोरे आज जिल्हा दौऱ्यावर

**सोलापूर दि. ५ मे -**

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे मंगळवार दि. ६ मे २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

दि. ६ मे २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता चौंडी येथून बार्शी, जि.सोलापूरकडे प्रयाण, सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह, बार्शी येथे आगमन व राखीव, सायंकाळी ६ वाजता शिवाजी प्रसारक मंडळ, बार्शी येथे सदिच्छा भेट, सायंकाळी ६.२० वाजता बार्शी येथून कांदलगाव, ता.बार्शीकडे प्रयाण, सायंकाळी ६.३० वाजता कांदलगाव येथे आगमन व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत रस्ते विकास कामाच्या शुभारंभास उपस्थिती, सायंकाळी ६.५० वाजता कांदलगाव येथून बार्शीकडे प्रयाण, सायंकाळी ७ वाजता बार्शी येथे आगमन व भक्तनिवास भूमिपूजन समारंभास उपस्थिती, रात्री ८ वाजता भगवंत महोत्सवास उपस्थिती, रात्री ९ वाजता शासकीय विश्रामगृह, बार्शी येथे राखीव, रात्री १०.१५ वाजता बार्शी येथून कुर्डूवाडी, जि.सोलापूरकडे प्रयाण, रात्री ११.३० वाजता सिध्देश्वर एक्सप्रेस रेल्वेने मुंबईकडे प्रयाण करतील.

## महत्त्वाचे

### निर्देशांकात २९४ अंकांची उसळी



**मुंबई** : गुंतवणूकदारांनी ऑटो आणि धातू क्षेत्रातील शेअर्स खरेदीचा सपाटा लावल्याने निर्देशांक २९४ अंकांनी वाढला. राष्ट्रीय बाजारातील निफ्टीत ११४ अंकांची वाढ होऊन तो २४,४६१वर बंद झाला. आठवड्याच्या पहिल्या दिवशी निर्देशांकातील बहुतांश कंपन्यांचे शेअर्स तेजीत होते. त्यातही अदानी पोर्टस्‌चे शेअर्स सर्वाधिक ६ टक्क्यांनी वधारले होते. त्यापाठोपाठ कोटक महिंद्राचे शेअर्स तेजीत राहिले. या व्यतिरिक्त बजाज फिनसर्व्ह, महिंद्रा, इटरनल, टाटा मोटर्स, पॉवर ग्रीड, आयटीसी, हिंदुस्थान युनिलिव्हर, बजाज फायनान्स, भारती एअरटेल, एचडीएफसी बँक, टाटा स्टील, मारूती सुझुकी, टीसीएस, सन फार्मा हे शेअर्सही वाढले होते.

### राहुल गांधींना न्यायालयाचा दिलासा

**अलाहाबाद** : काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राहुल गांधी यांचे नागरिकत्व रद्द करण्याची मागणी करणारी जनहित याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने फेटाळली. तसेच राहुल गांधींच्या नागरिकत्वाला आव्हान देण्यासाठी इतर कायदेशीर पर्याय शोधा, असेही न्यायालयाने म्हटले. न्यायाधीश ए.आर. मसूदी आणि न्यायमूर्ती राजीव सिंह यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, केंद्र सरकार याचिकाकर्त्याच्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी विशिष्ट वेळ देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत याचिका प्रलंबित ठेवण्याचे कोणतेही औचित्य नाही. न्यायालयाने याचिकाकर्त्याला राहुल गाधींच्या नागरिकत्वाला आव्हान देण्यासाठी इतर कायदेशीर पर्याय शोधण्यास सांगितले. त्यानंतर आता हा खटला रद्द करण्यात आला. तसेच न्यायालयाने याचिकाकर्त्याला पुन्हा न्यायालयात जाण्याची मुभा दिली.

# 'वक्फ'वर १५ ला सुनावणी

**नवी दिल्ली, ५ मे**

सर्वोच्च न्यायालयाने वक्फ सुधारित कायद्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवरील सुनावणी पुढे ढकलली आहे. आता या प्रकरणी सुनावणी १५ मे रोजी होणार आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील न्यायासनासमोर होईल, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी सांगितले.

विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना १३ मे रोजी निवृत्त होत आहेत. त्यानंतर बीआर गवई हे पुढील सरन्यायाधीश असतील. मागील सुनावणीत न्यायालयाने कायद्याच्या दोन मुख्य पैलूंवर स्थगिती दिली होती. सर्वोच्च न्यायालयात १७ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीत, सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या न्यायासनाला केंद्राने आश्वासन दिले की, ५ मे पर्यंत ते वापरकर्त्याद्वारे वक्फसह वक्फ मालमत्ता डी-नोटिफाय करणार नाहीत किंवा केंद्रीय वक्फ परिषद आणि मंडळांमध्ये कोणतीही नियुक्ती करणार नाहीत. केंद्रानेही सुनावणी घेतल्याशिवाय कायदा थांबवू नये, अशी विनंती केली होती. यानंतर न्यायालयाने सुनावणीची




तारीख ५ मे निश्चित केली होती. याचिकाकर्त्यांना फक्त ५ याचिका सादर करण्यासही सांगण्यात आले आहे. याशिवाय, पुढील सुनावणीपर्यंत वक्फ मंडळात पुनर्नियुक्ती होणार नाही.

**न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचे आदेश काय?**

भारताच्या सरन्यायाधीशांच्या निवृत्तीचे वय ६५ असल्याने न्यायमूर्ती संजीव खन्ना आणखी ७ कामकाजी दिवसांनी निवृत्त होणार आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आजच्या सुनावणीत सांगितले की, वक्फ याचिका न्यायमूर्ती गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सूचीबद्ध केल्या जातील. कारण त्यांच्या निवृत्तीला काही दिवसच शिल्लक आहेत. पुढील आदेश येईपर्यंत न्यायालयाने या कायद्याबद्दल सध्याची परिस्थिती जैसे थे ठेवण्यास सांगितले आहे.

# यंदा जिल्ह्यात बारावी निकालाचा टक्का घसरला

**✔ कॉपीमुक्त अभियानाद्वारे जिल्हा प्रशासनाकडून परीक्षेचे अचूक नियोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाने बारावी परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर केला. पुणे विभागात सोलापूर जिल्ह्याचा निकालाचा टक्का घसरला आहे. यंदा जिल्ह्याचा निकाल टक्यावरून ८८.६२ टक्के लागला असून गतवर्षी तो ९३.८२ टक्के इतका होता. जिल्ह्यात प्रभावीपणे राबविलेल्या कॉपीमुक्त अभियानाचा हा परिणाम असल्याची चर्चा शिक्षण विभागात सुरु आहे.

कापीमुक्त अभियानामुळे परीक्षेतील कॉपीवर यंत्रणेने नियंत्रण मिळविले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण व विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास करण्याची प्रवृत्ती वाढावी, यासाठी प्रयत्न होत असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली. मात्र यावर्षी निकालात पाच टक्के घसरण कनिष्ठ महाविद्यालयावर परिणाम करणारी ठरणार आहे. जिल्ह्यातील बारावीच्या निकालात विज्ञान व वाणिज्य विभागाचा निकाल अपेक्षेप्रमाणे लागला असला तरी कला शाखेतील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात अनुत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण परीक्षार्थींमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे. यंदा निकालाची टक्केवारी ५.२६ टक्क्यांनी घसरल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात यंदा दहावी आणि बारावी परीक्षेच्यावेळी कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले. परीक्षा वर्ग कक्ष मोबाईलद्वारे नियंत्रण कक्षाकडे लाईव्ह करण्यात आला होता. परीक्षा कक्षावर मोबाईल कॅमेराची नजर असल्याने कॉपीमुक्त अभियानाचा चांगलाच प्रभाव दिसून आला. संवेदनशील केंद्रावर बैठे व फिरत्या पथकांची नजर ठेवण्यात आल्याने कॉपीवर अवलंबून असणाऱ्या विद्यार्थ्यांची गोची झाली. कॉपीमुक्त अभियानामुळे सर्वच परीक्षा केंद्रांवर कडक लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे निकालाच्या टक्केवारीत फरक दिसून येत आहे. अनुत्तीर्ण टक्केवारीत शहरापेक्षा ग्रामीण भागातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी अधिक आहेत. यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासावर भर द्यावा लागणार असल्याचे स्पष्ट होते. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना लगेचच फेरपरीक्षेची संधी असल्याने त्यांनी निराश न होता पुढील परीक्षेची तयारी करणे आवश्यक आहे.



## कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक

**◆ पुणे, ५ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावी परीक्षेचा राज्याचा निकाल जाहीर झाला असून कोकण विभागाने बाजी मारली आहे. तसेच यंदाही निकालात मुलींचे वर्चस्व राहिले.

**मुलींची बाजी, ९१.८८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण**

राज्याचा एकूण निकाल ९१.८८ टक्के लागला आहे. या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आय.टी.आय. या शाखांसाठी एकूण १४,२७,०८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा कोकणचा निकाल ९६.७४ टक्के सर्वाधिक लागला आहे. तर लातूर ८९.४६ टक्के निकाल सर्वात कमी लागला आहे.

अमरावती विभागातून वाशीम जिल्हा अव्वल स्थानी असून, विभागात यंदाही मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण मुलांपेक्षा अधिक आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा १.५७ टक्क्यांनी निकालात घसरण झाली आहे. नागपूर विभागात यंदा निकालात गोंदिया जिल्हा प्रथम आला जिल्ह्याचा निकाल ९४.0४ टक्के लागला आहे.

### मुलींची बाजी

निकालात ६ लाख २५ हजार ९०१ मुली, तर ६ लाख ७६ हजार ९७२ मुले उत्तीर्ण झाली. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.५८ टक्के, तर मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८९.५१ टक्के आहे.

### विभागनिहाय निकाल

| | |
|---|---|
| कोकण | ९६.७४ |
| कोल्हापूर | ९३.६४ |
| मुंबई | ९२.९३ |
| संभाजीनगर | ९२.२४ |
| अमरावती | ९१.४३ |
| पुणे | ९१.३२ |
| नाशिक | ९१.३१ |
| नागपूर | ९०.५२ |
| लातूर | ८९.४६ |

### शाखानिहाय निकाल

| | |
|---|---|
| विज्ञान शाखा | ९७.३५% |
| कला शाखा | ८०.५२% |
| वाणिज्य शाखा | ९२.६८% |
| व्यवसाय अभ्यासक्रम | ८३.२६% |
| आयटीआय | ८२.०३% |

# राज्यात पुढील तीन दिवस गारपीट

**मुंबई** : राज्यात मंगळवार ते गुरुवार या तीन दिवसांत विजांच्या कडकडाटांसह गारपीट अन् पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. गुजरात आणि मध्यप्रदेशात या कालावधीत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात म ोठ्या पावसाचा अंदाज आहे. सोमवारी राज्यातील तापमानात किंचित घट झालेली दिसून आली. ईशान्य अरबी समुद्र आणि लगतच्या गुजरातच्या किनाऱ्यावर कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. त्यामुळे देशातील सर्वच भागांत ते शनिवारपर्यंत पावसाचा अंदाज आहे. ...या राज्यांत राहणार अशी स्थिती गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, ओडिशा, झारखंडमध्ये काही ठिकाणी वाऱ्याचा वेग ताशी ७० ते १०० कि.मी. असणार आहे. देशचा किनारी भाग,तेलंगणामध्ये वारे वाहण्यास सुरुवात झाली आह

## सलालचेही दरवाजे बंद



अखनूरजवळ चिनाब नदीवर सलाल धरण बांधण्यात आले आहे. या धरणाचे दरवाजेही सोमवारी बंद करण्यात आले. त्यामुळे ७५ वर्षांनंतर प्रथमच चिनाब नदीतील खडक दिसू लागले आहेत. सलाल जलविद्युत प्रकल्प नियंत्रण रेषेजवळ असून व्याप्त काश्मीरमधून पाकमध्ये प्रवेश करताना प्रथमच चिनाबचा प्रवाह आटण्याच्या स्थितीत आला आहे.



### आर्थिक वर्षात २.६ कोटी वाहनांची विक्री

**नवी दिल्ली** : गेल्या आर्थिक वर्षात २०२४-२५ मध्ये देशभरात २.६ कोटी वाहने विकली गेली. वार्षिक आधारावर ६.४६ टक्के वाढ झाली आहे. यामध्ये, केवळ दुचाकी विभागात १.८८ कोटी वाहने विकली गेली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीपेक्षा हे ७.७१ टक्के जास्त होते. त्याच वेळी, नवीन आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या महिन्यात, एप्रिलमध्ये, देशात वाहनांची विक्री २२ लाखांहून अधिक होती. गेल्या वर्षी एप्रिलच्या तुलनेत २.९५% वाढ झाली आहे. या कालावधीत, दुचाकी श्रेणीत १६ लाखांहून अधिक वाहने विकली गेली, जी एप्रिल २०२४ च्या तुलनेत २.२५ टक्के जास्त आहे. फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल असोसिएशन (एफएडीए) ने २०२५ आणि एप्रिल २०२५ या आर्थिक वर्षात विकल्या गेलेल्या वाहनांचा विक्री अहवाल प्रसिद्ध केला आहे.

# त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात परवानगी शिवाय प्रसादाच्या लाडूंची विक्री

**नाशिक, दि. ५ मे-**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर मंदिरातील विश्वस्त मंडळ अडचणीत सापडले असून, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी भारतीय पुरातत्व खात्याने केली आहे. मंदिर परिसरात नियमबाह्यरित्या प्रसादाच्या लाडूंचे वाटप आणि विक्री करण्यात येत असल्याचा ठपका ठेवत पुरातत्व खात्याने त्र्यंबकेश्वर पोलिसांकडे पत्र पाठवले आहे.

गुढी पाडव्याच्या निमित्ताने त्र्यंबकेश्वर मंदिरात विश्वस्त मंडळाकडून बुंदीच्या लाडूंच्या प्रसादाचे वाटप सुरु करण्यात आले होते. तिरुपती बालाजी, शिर्डी, पंढरपूरप्रमाणे येथेही भाविकांना प्रसाद स्वरूपात लाडू मिळावेत, या हेतूने हा उपक्रम सुरू करण्यात आला. मात्र, मंदिर क्षेत्र हे भारतीय पुरातत्व खात्याच्या संरक्षणाखाली असल्याने कोणत्याही व्यावसायिक उपक्रमासाठी अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असते. मात्र, लाडू वाटपाच्या नावाखाली त्याची विक्री सुरु झाली असून त्यासंबंधी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या लाडू विक्रीविरोधात माजी विश्वस्तांनी देखील पुरातत्व खात्याकडे तक्रार नोंदवली होती. त्यानंतर खात्याने या प्रकरणाची दखल घेत त्र्यंबकेश्वर पोलिसांना पत्र पाठवून संबंधित विश्वस्त मंडळावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्र्यंबकेश्वर मंदिर हे संरक्षित स्मारक आहे. असे असतानाही तेथे अनधिकृतपणे व्यावसायिक लाडू विक्री सुरू केल्याचा गंभीर आरोप विश्वस्त मंडळावर करण्यात आला आहे. याप्रकरणी त्र्यंबकेश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर गुन्हा दाखल अशी मागणी भारतीय पुरातत्व खात्याने पाठवलेल्या पत्रात करण्यात आली आहे. त्यामुळे आता या प्रकरणावर त्र्यंबकेश्वर पोलिस नेमकी काय कारवाई करणार? हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**कुंभमेळ्यापूर्वी त्र्यंबकेश्वरला तीर्थक्षेत्राचा 'अ' दर्जा**

दरम्यान, त्र्यंबकेश्वर मंदिराला राज्य शासनाने 'अ' दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी नाशिक त्र्यंबकेश्वरचा दौरा केला होता. या दौऱ्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे भाविकांसाठी उन्नत सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नाशिक आणि त्र्यंबकला 'अ' वर्ग दर्जा मिळावा, ही मागणी अनेक वर्षांपासून सुरु होती. अखेर कुंभमेळ्यापूर्वी शासनाने हा निर्णय घेतला आहे. नाशिकच्या त्र्यंबकेश्वर मंदिराला तीर्थक्षेत्र 'अ' दर्जा देण्यास नगर विकास खात्याने मंजुरी दिली आहे.

# शास्त्रज्ञांनी शोधला 'मिनी मून'

**तुकड्याचा आकार केवळ ८ ते १२ मीटर**

**◆ टेक्सास, ५ मे**

पृथ्वीच्या आसपास लहान-लहान पर्वतसदृश्य तुकडे मोठ्या संख्येने आहेत. ज्यांना 'मिनी मून' म्हटले जाते. नुकताच शास्त्रज्ञांनी पृथ्वीचा 'मिनी मून' शोधला असून तो चंद्रापासून तुटलेला असू शकतो, असा अंदाज आहे.

हा तुकडा लाखो वर्षांपूर्वी चंद्रावर एखाद्या मोठ्या आघातानंतर किंवा टक्कर झाल्यानंतर अंतराळात आला असावा. या संशोधनामुळे पृथ्वीच्या आसपास चंद्राचे असे असंख्य तुकडे फिरत असावे, अशा संकेतांना पुष्टी मिळते. ग्रहांचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ टेडी करेटा यांनी टेक्सासमध्ये झालेल्या



५६ व्या लूनर अ‍ॅण्ड प्लॅनेटरी सायन्स कॉन्फरन्समध्ये म्हटले की, जर असा एखादाच तुकडा असता तर तो कुतुहलाचा विषय ठरला असता. पण, आता दोन तुकडे सापडले आहेत. त्यावरून आपण हे म्हणू शकतो की यांची संख्या नक्कीच जास्त असेल. या तुकड्याचे अर्थात मिनीमूनचे नाव २०२४ पीटी५ असे ठेवण्यात आले आहे. याचा शोध ऑगस्ट २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील खगोलशास्त्रज्ञांनी लावला होता. हा तुकडा पृथ्वीच्या जवळ फारच संथ गतीने हालचाल करताना दिसला. त्याचा वेग दोन मीटर प्रति सेकंद इतका कमी होता. इतक्या कमी वेगाने चालणारे केवळ नऊ क्षुद्र ग्रह यापूर्वी पाहण्यात आले होते. याच्या संशोधनानंतर टेडी करेटा आणि त्यांचे सहकारी निक मॉस्कोविट्ज यांनी लोवेल डिस्कव्हरी टेलिस्कोपने याचे अध्ययन केले. (वृत्तसंस्था)

### तुकडा वेगळा होण्याचे कारण शोधणार

संशोधकांनी अभ्यासांती सांगितले की, हा कोणताही साधारण क्षुद्रग्रह नाही. याची संरचना अपोलो मिशन आणि सोव्हियत युनियनच्या लूनार २४ मिशनद्वारे चंद्रावरून आणलेल्या दगडांशी जुळणारी आहे. हा तुकडा फक्त ८ ते १२ मीटरचा म्हणजे अत्यंत छोटा आहे. चंद्रावर एखादी उल्का धडकल्यानंतर हा तुकडा वेगळा झाला असावा. नंतर तो अंतराळात गेला. तो चंद्राच्या नेमक्या कोणत्या भागापासून वेगळा झाला असावा, याचा अभ्यास सध्या सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पिस्टल व तलवारीचा धाक दाखवून खंडणी मागणाऱ्या दोघांना अटक

### करमाळा पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे-**

तरूणास पिस्टल व तलवारीचा धाक दाखवून खंडणी मागणून पिस्टलमधून दोन राऊंड फायर करणाऱ्या दोघांना करमाळा पोलिसांनी अटक केली.

जयवर्धन उर्फ मुन्ना हणुमंत दैन (वय २५, रा. वांगी नं. १, करमाळा) आणि प्रदीप मुकुंद पोह (वय २१, रा. शेटफळ, ता. करमाळा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत अभयसिंह बाळासाहेब देशमुख (वय २८, रा. वांगी नं. १, ता. करमाळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२८ एप्रिल रोजी सकाळी सव्वा आकराच्या सुमारास अभयसिंह देशमुख, त्यांचा चुलत भाऊ संकेत सुहास देशमुख, मावस भाऊ अमित घोगरे असे सर्वजण कामासाठी शेटफळ येथे चारचाकी गाडीतून जात होते. त्यावेळी शेटफळ गावाच्या हद्दीतील कॅनॉलजवळ जयवर्धन दैन व प्रदीप पोळ या दोघांनी देशमुख यांच्या गाडीजवळ येऊन देशमुख यांची गाडी थांबविली. जयवर्धन याने देशमुख यांस शिवीगाळ करून त्याच्या पॅन्टमध्ये खोचलेली पिस्टल काढून देशमुख यांच्या कपाळाला लावून आत्ताच्या आत्ता पैसे पाहिजेत असे म्हणून खंडणी मागितली. त्यावेळी




देशमुख यांचा भाऊ संकेत याने जयवर्धन याचे पाय पकडून विनवनी करून भावाला काही करू नका असे सांगितले. त्यावेळी जयवर्धन याने मुन्ना कधी रिकाम्या हाताने जात नाही असे म्हणून देशमुख याच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेत देशमुख यांना ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या दिशेने पिस्टलमधून दोन राऊंड फायर केले. जयवर्धन याने प्रदीप पोळ याच्याकडे चैन दिली व ते तिथून निघून गेले. त्यानंतर २९ एप्रिल रोजी दुपारी देशमुख यांचा चालक प्रतिक देशमुख हा देशमुख यांच्या शेतात जात असताना माने वस्ती येथील जयवर्धन याने प्रतिक यास शिवीगाळ करून तुझा मालक मला पैसे देत नाही, त्यामुळे तु त्याचे काम करायचे नाही असे म्हणून कोयत्याच्या मागच्या मुठीने पायावर, पंजावर, नडगीवर मारून जखमी केले. त्यामुळे याबाबत करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी जयवर्धन दैन व प्रदीप पोळ या दोघांना ताब्यात घेऊन त्यांना अटक केली. या दोघांकडून एक पिस्टल, एक रिकामी पुंगळी, एक तलवार, एक स्कॉर्पिओ चारचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. या दोघांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली.

ही कारवाई पोलिस उपविभागीय अधिकारी अजित पाटील, पोलिस निरीक्षक रणजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक पोपट टिळेकर, पोलिस उपनिरीक्षक सुशीलकुमार पाखरे, हवालदार अजित उबाळे, मनिष पवार, वैभव ठेंगल, तौफिक काझी, ज्ञानेश्वर घोंगडे, सोमनाथ जगताप, अर्जुन गोसावी, गणेश शिंदे, योगेश येवले, रविराज गटकूळ, अमोल रंदील यांनी केली.

## महत्त्वाचे...

### पूर्ववैमनस्यातून विटेने मारहाण

**सोलापूर, दि. ५ मे-**




पूर्ववैमनस्यातून विटेने मारहाण करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत सुभाष सदाशिव चव्हाण (वय ५५, रा. घिसाडी गल्ली, राहुल गांधी झोपडपट्टी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन विकास सुरेश साळुंखे (रा. घिसाडी गल्ली, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मे रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास सुभाष चव्हाण यांचा मुलगा कृष्णा व विकास साळुंखे यांच्यात किरकाळे भांडण झाले होते. त्याचा राग मनात धरून विकास साळुंखे याने सुभाष चव्हाण यांच्या डोक्यात विटेने मारहाण करून त्यांना जखमी केले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार काळेल पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेने तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ मे-**

दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात तरूणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत स्वामी कट्टप्पा दासरी (वय ४०, रा. वैद्यवाडी, भवानी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन रफिक उर्फ युन्नूस शाहबोद्दीन मिरदे (वय ५०, रा. बसवेश्वर नगर, शेळगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष कट्टप्पा दासरी (वय ३०, रा. वैद्यवाडी, सोलापूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २८ एप्रिल रोजी सायंकाळी मार्केट यार्ड जवळील ज्वारी संशोधन केंद्रासमोरील सर्व्हिस रोडवर रफिक मिरदे यांनी त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र. एमएच १३ ईएम ७९८९ ही निष्काळजीपणे रॉंगसाईटने चालवून समोरून एमएच १३ ईटी ९४०४ क्रमांकाच्या दुचाकीवरून येणाऱ्या संतोष दासरी यांना जोरदार धडक दिली. या अपघातात संतोष दासरी गंभीर जखमी होऊन मरण पावला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.

### फुटपाथवर बेशुध्द अवस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ५ मे-**

सकाळी ९.४५ वाजता घडला. इक्बाल महेबूब शेख (वय ६९, रा. रामवाडी, सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. इक्बाल हे सोमवारी सकाळी ७० फूट रस्त्यावरील तिरंगा चिकन सेंटरजवळील पदपथावर बेशुध्द अवस्थेत दिसून आले. त्यांना लादेन यांनी उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाख्ल केल. परंतु उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून मुलीने प्राशन केले पिवळ्या रंगाचे द्रव्य

**सोलापूर, दि. ५ मे-**

घरगुती भांडणाच्या कारणातून अक्कलकोट रोडवरील गांधीनगरात राहणा-या १५ वर्षाच्या मुलीने पिवळा रंगाचे द्रव्य प्राशन केले. हा प्रकार सोमवारी सकाळी ८.४५ वाजता उघडकीस आला. नंदिनी लक्ष्मण मुलका (वय१५) असे तरुणीचे नाव आहे. सोमवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास नंदिणीच्या घरात घरगुती कारणातून भांडण झाले. यातून मानसिक त्रास झाल्याने तिने पिपळा रंग पाण्यात मिसळून प्राशन केला. यात तिला त्रास होऊ लागल्याने सकाळी ९.१५ वाजता मामा नागेश श्रीराम याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तोल जाऊन पडल्याने तरुणी जखमी

**सोलापूर, दि. ५ मे-**

नातेवाईकांच्या घरी असताना मध्यरात्री उठून बाथरूमकरीता जाताना पाय-यावरून अचानक तोल गेल्याने तरुणी जखमी झाली. हा प्रकार सोमवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास घडला. प्राची ऋषीकेश पवार (वय २०, रा. देगाव ता उ सोलापूर) असे जखमी तरुणीचे नाव आहे. प्राची ही सोमवारी रात्री अलकुंटे चौक परिसरात राहणा-या नातेवाईकाच्या घरी मुक्कामासाठी गेली होती. सोमवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास ती बाथरूमकरीता उठली. पाय-या उतरताना अचानक तिचा तोल गेल्याने ती पडल्याने तिच्या डोक्याला जखम झाली. पहाटे तीन वाजता पती ऋषीकेश पवार याने उपचाराकरीता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरासमोर क्रिकेट खेळण्यास मनाई केल्याने वृध्दाला मारहाण

**सोलापूर, दि. ५ मे-**

घरासमोर क्रिकेट खेळू नका म्हणाल्याने वृध्दाला दोघांनी मारहाण केली. हा प्रकार जुना विडी घरकुल परिसरातील शिरालिंग नगर येथे रविवारी रात्री १० वाजता घडला. अरुण वसंत चिंता (वय



५२) असे मारहाण झालेल्या वृध्दाचे नाव आहे. अरुण यांनी घराच्या परिसरात राहणा-या विजय गुर्रम व जय गुर्रम या दोघांना घरासमोर किकेट खेळू नका असे सांगितले. या कारणातून चिडलेल्या विजय आणि जय या दोघांनी रात्र १० वाजता अरुण यांना तुला काय करायचे असे म्हणून गाडीच्या चावीने मारहाण केली. यात डोक्याला जखम तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सोमवारी रात्री १२.३० वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शेतीच्या कारणातून एकास मारहाण

**सोलापूर, दि. ५ मे-**

शेतीच्या जागेच्या कारणातून झालेल्या भांडणातून मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ येथील एकास करण्यात आली. हा प्रकार शनिवारी तीन रोजी रात्री ९ वाजता घडला. गणेश तानाजी माळी (वय ४२) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. शेतीच्या जागेच्या कारणावरून सुनील नामदेव माळी व गणेश माळी यांच्यात वाद झाला. यातूनच सुनील माळी याने त्याच्या साथीदारांसह गणेश यास शनिवारी रात्री ९ च्या सुमारास मलिकेपेठ येथे काठीने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने सोमवारी सकाळी १०.५० वाजता अनिल माळी याने गणेश यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# मद्य-मद्यार्क वाहतुकीवेळी डिजिटल लॉक बंधनकारक

### जुलै २०२५ पासून प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

मद्य-मद्यार्कांच्यावाहतुकीच्या सेवेळी चोरी व इतर गैरप्रकारांना आळा घालण्याकरिता ई-लॉक, डिजिटल लॉक बसवणे बंधनकारक करण्यात येणार आहे. राज्य सरकारने याविषयीचा निर्णय बुधवारी जारी केला. यामुळे टँकरचा मार्ग, जागा याची अचूक माहिती उत्पादन शुक्ल विभागाला मिळणार आहे. जुलै २०२५पासून प्रायोगिक तत्त्वावर पहिल्या टप्प्यातील सर्व लायसन्सधारकांना डिजिटल लॉक, ई-लॉकचा वापर बंधनकारक असेल.

राज्यातील मद्य-मद्यार्क निर्माणीमधून होणारी वाहतूक परिवहन पासद्वारे होत असते. मद्यार्काची (स्पिरिट) वाहतूक पथरक्षणाखाली (एस्कॉर्ट) होत असते, तर मद्याच्या परराज्यात होणाऱ्या निर्यातीसाठी राज्यातील सीमातपासणी नाक्यापर्यंत पथरक्षण दिले जाते. पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक करताना खबरदारी घ्यावी, म्हणून डिजिटल लॉक वापरात आहेत. परंतु, राज्यात मद्य अथवा मद्याकांच्या वाहतुकीसाठी त्याचा वापर अद्याप होत नव्हता.

मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश या राज्यात मद्य, मद्यार्क यांच्या वाहतुकीदरम्यान डिजिटल लॉक किंवा ई-लॉक प्रणालीचा वापर केला जातो. त्याच धर्तीवर राज्यातही त्याचा प्रायोगिक तत्त्वावर अवलंब करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यामुळे यापुढे पथरक्षणासाठी जवान पाठवले जाणार नाहीत, तसेच यापुढे कंपन्यांना पथरक्षणासाठी द्यावी लागणारी रक्कमही वसूल केली जाणार नाही.

#### डिजिटल लॉक चे फायदे

- वाहतूक सुरू-संपल्याची माहिती
- लॉक उघडले किंवा छेडछाड झाल्याची माहिती
- जिओ-फेन्सपासून दूर गेल्याची तातडीने माहिती
- एकाच ठिकाणी टँकर उभा राहिल्यास त्याची माहिती.

# दोन्ही कानाखाली देऊन मटणाची उकळती भाजी फेकली अंगावर

### सोलापूर एस टी स्टँड मधील प्रकार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

सोलापूरच्या एसटी स्टँड मधील रेस्ट रूम मध्ये वादाचा प्रकार घडला असून एकाला मारहाण करून त्याच्या अंगावर मटणाची उकळती भाजी फेकून जखमी केल्याने संबंधित इसमाविरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. २५ एप्रिल रोजी रात्री ही घटना घडली होती त्याचा गुन्हा तीन मे रोजी दाखल झाला आहे.

कुंदन विजय डांगे (रा. गोलेगाव, ता. लोहा, जि. नांदेड) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पिराजी बाबुराव गिते (वय ४१ वर्षे, रा. मु. कासुर्डी, खेडेवाडे, ता. भोर. जि पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

२५ एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सोलापूर येथील रेस्ट रुम मध्ये जेवण करण्यासाठी फिर्यादी व सहकारी बसले असता आरोपीत हा बाहेरुन आला. त्यावेळी फिर्यादी त्यास इतके वेळ कोठे गेला होता असे विचारणा केली असता, तु कोण मला विचारणारा तु काय माझा मालक आहे का? असे तो म्हणाला. फिर्यादी त्यास समजावून सांगत असताना ''तू माझ्या बापापर्यंत जातो का''असे म्हणून शिवीगाळ केली.

तसेच फिर्यादी खाली बसले असता आरोपीताने दोन्ही हाताने फिर्यादीचे दोन्ही कानावर जोरात चापट मारली तसेच आज मटणाची भाजी कसे खाताय बघतोय असे म्हणून रुमालने भाजीचे भांडे फिर्यादीचे दिशेन टाकताना फिर्यादी उजव्या हाताने बचाव करताना गरम भाजी फिर्यादीचे उजव्या हातावर छातीवर व पाठीवर भाजुन गंभीर जखमी केले आहे. तपास फौजदार पाटोळे हे करीत आहेत.

# पदोन्नती नाकारलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर होणार कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

पोलीस दलात गेल्या काही वर्षांत अनेक अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारली आहे. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांच्या विरोधात आता कारवाई करण्याचे आदेश आस्थापनाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. सुखविंदरसिंह यांनी काढले आहेत.

सन २०२२-२३ आणि २०२३-२४ या वर्षांत पोलीस निरीक्षक, पोलीस उपअधीक्षक आणि सहायक पोलीस आयुक्त अशा तब्बल ७५ जणांनी पदोन्नती नाकारली आहे. त्यामुळे पदोन्नती नाकारलेल्या अशा अधिकाऱ्यांना पुढील पदोन्नतीसाठी आता प्रतीक्षा करावी लागणार आहे. पोलीस दलात अनेक अधिकारी वर्षानुवर्ष आहेत त्याच जिल्ह्यात राहतात. त्यासाठी वेगवेगळे फंडे वापरण्यात येतात तर काही जण पदोन्नती नाकारण्याच्या वाटेने जात आहेत आणि आहे तेच ठिकाण टिकवण्याचा प्रयत्न करतात.पदोन्नती नाकारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर काय कारवाई करावी, याबाबत २०१०, २०१६ आणि २०१९ ला शासनाने आदेश काढून कार्यवाहीबाबत आदेश दिले होते. त्यात गेल्या दोन वर्षांत पोलीसनिरीक्षक, पोलीसउपअधीक्षकआणि सहायक पोलीस आयुक्त अशा पदावरील ७५ जणांनी पदोन्नती नाकारली आहे. त्यामध्ये पुणे शहर, छत्रपती संभाजीनगर, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, बृहन्मुंबई, सोलापूर, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नाशिक ग्रामीण, जळगाव, अहिल्यानगर, सोलापूर ग्रामीण, सांगली येथील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

पदोन्नती नाकारणाऱ्या या अधिकाऱ्यांवर आता कारवाई केली जाणार आहे. त्यात वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर अथवा तत्पूर्वीच एखाद्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शवल्यास त्याचे नाव पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या निवड यादीतून काढून टाकण्यात येणार आहे. पुढील दोन वर्ष होणाऱ्या निवड सूचीमध्ये संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्याच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षीच्या पदोन्नतीसाठी पात्रता येणार आहे. ज्यांनी कायमस्वरूपी पदोन्नती नाकारली आहे, त्यांचा पुढील कोणत्याही निवड सूचीमध्ये समावेश केला जाणार नाही.

# जावयाकडून सासऱ्यावर चाकूने हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

भांडण मिटविण्यासाठी घरी आलेल्या सासऱ्यावर जावयाने चाकूने हल्ला करून जखमी केले. ही घटना २ मे रोजी रमाबाई आंबेडकर नगरात घडली असून याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नालंदा दिलीप सोनवणे (वय ४०, रा. अक्षद पाम्स, डोणगाव रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सुब्रजीज लक्ष्मण कांबळे (रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालंदा सोनवणे यांची मुलगी प्रिया हिचा सुब्रजीत कांबळे याच्यासोबत विवाह झालेला आहे. २ मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास नालंदा सोनवणे, त्यांचे पती दिलीप सोनवणे व मुलगी प्रिया कांबळे हे सर्वजण जावई सुब्रजीत कांबळे यांच्या घरी सकाळी झालेले भांडण मिटविण्यासाठी आले होते. त्यावेळी जावई सुब्रजीत याने सासू नालंदा यांच्या अंगावर चटणीचे पाणी टाकून शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली.

तसेच घरात जाऊन कांदे कापण्याचा चाकू घेऊन येऊन सासरे दिलीप सोनवणे यांच्या उजव्या हाताच्या पोटरीवर, कपाळावर मारून त्यांना जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार ओव्हळ पुढील तपास करीत आहेत.

# विवेकानंद केंद्राचे शिबिर १६मे पासून

**सोलापूर, दि. ५ मे -**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी जुळे सोलापूर शाखेने १६ मे ते २० मे या कालावधीत मुलामुलींसाठी निवासी व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचे आयोजन केले आहे. जुळे सोलापुरातील बॉम्बे पार्कनजीकच्या प्रणव नगरीतील विवेकानंद केंद्र ॲप्लिकेशन ऑफ योग अँड मॅनेजमेंट (वि. के. वयम्) मध्ये हे शिबिर होणार आहे. सहावी ते आठवीची मुले - मुली या शिबिरात सहभागी होऊ शकतील. मुलांमधले कुतूहल, कलाकौशल्ये, साहसी वृत्ती, संवेदनाशीलता... या आणि अशा अनेक क्षमतांना वाव देणारे, त्यांच्या विकासाला दिशा देणारे शिबिर आहे. या शिबिरात सूर्यनमस्कार, योगासने, हस्तकला, चित्रकला, विविध विषयांवर व्याख्याने, स्लाईड शो, गटचर्चा, मातृ - पितृ पूजन आदिंचा समावेश आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी पंडित बिराजदार (९४२२०३२६७९), वामन कुलकर्णी (७५८८१६३६५८) संपर्क साधावा, असे आवाहन केंद्राने केले आहे.

# मोहब्बत की किताब नाटिकेद्वारे संविधान जागर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलनात प्रबोधनात्मक नाटिका मोहब्बत की किताब या नाटिकेद्वारे संविधान जागर करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हुतात्मा स्मृती मंदिर येथे ''मोहब्बत की किताब'' सादर केली.भारतीय संविधानाची महती सांगण्यात आली.




बौद्ध साहित्य संमेलनाअंतर्गत सहाव्या सत्रात प्रबोधनात्मक नाटिका मोहब्बत की किताब नाटिका सादर करण्यात आली. राज्य कर निरीक्षक अभियंता बुद्धजय भालशंकर लिखित आणि भागवत कुवळेकर दिग्दर्शित या भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करणारी ही लघु नाटिका आहे. यामध्ये बुद्धजय भालशंकर, भागवत कुवळेकर, शशिकांत जाधव, सविता कुवळेकर यांची प्रमुख भूमिका होती. या नाटिकेद्वारे संविधानातील हक्क व अधिकार, स्त्री - पुरुष समानता, स्त्रियांचा सन्मान , समता यावर प्रकाश टाकला आहे. यातील विविध संवादावर उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली.

कार्यक्रमानंतर डॉ.भीमराव आंबेडकर, माजी मंत्री राजाभाऊ सरवदे यांच्यासह मान्यवरांनी ''मोहब्बत की किताब''चे कौतुक केले. त्यांनी शाबासकीची थाप पाठीवर दिली.

# दहा दिवसात पोलिसांकडून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होणार

### डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

प्रसिध्द मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरिष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात पोलिसांकडून विविधांगी तपास केला जात आहे. पोलिसांनी डॉक्टरांच्या फोनचे सीडीआर तपासलेत, त्यामध्येही हॉस्पिटलचा अंतर्गत वादासंदर्भात चर्चेच्या अनुषंगाने हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी डॉक्टरांना फोन केल्याचे दिसून आले आहे. मात्र आत्महत्या प्रकरणात पोलिसांच्या हाती सुसाईड नोटच्या व्यतिरिक्त काहीच लागलेले नाही. पोलिसांकडून तपास पूर्णत्वास आला असून दोषारोपपत्र येत्या दहा दिवसात न्यायालयात दाखल करण्यात येणार आहे.

> डॉ. वळसंगकर प्रकरणात तपास पूर्णत्वास आला आहे. येत्या काही दिवसात दोषारोपपत्र दाखल करण्यात येणार आहे. त्यातून सर्व चित्र स्पष्ट होईल, असे पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी सांगितले.

प्रसिध्द मेंदूविकारतज्ज्ञ डॉ.शिरिष वळसंगकर यांच्या आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी हॉस्पिटल प्रशासनाधिकारी मनिषा माने-मुसळे यांच्यावर सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल होताच संशयित आरोपी मनिषा माने हिस न्यायालयाची विशेष परवानगी घेत लागलीच अटक केली. तीस न्यायालयात हजार केले असता पहिल्यांदा न्यायालयाने २३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी दिली होती,त्यानंतर दोन दिवसाची वाढीव पोलिस कोठडी २५ एप्रिलपर्यंत दिली होती. त्यानंतर आरोपी महिलेस न्यायालयात हजर केले असता पोलिस कोठडीचा हक्क राखीव ठेवून १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली. १४ दिवसाची न्यायालयीन कोठडीचा ठोठावली आहे.

न्यायालयीन कोठडी संपण्यास चार दिवसाचा कालावधी उरला आहे. व न्यायालयाने ९ मे रोजी सरकारी पक्षाला त्याची बाजू मांडण्यासाठी वेळ दिली आहे. मात्र पोलिसांच्या हाती ठोस काहीच लागले नाही. त्यामुळे संशयित आरोपी महिलेस शिक्षा लागेल कि तिचा मुक्तता होईल या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ६ हजार ४५३ विद्यार्थ्यांनी दिली 'नीट' परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

जिल्ह्यातील १५ केंद्रावर रविवारी ६ हजार ४५३ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा (नीट) दिली आहे. परीक्षेतील उपस्थितीची खात्री करण्यासाठी बायोमेट्रिक नोंदणी बंधनकारक आहे. मात्र, काही विद्यार्थ्यांचे बायोमेट्रिक होत नसल्याने अंडरटेकिंग घेऊन परीक्षेला सोडण्यात आले. १४९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज करूनही अनुपस्थित राहिले आहेत.

नीट परीक्षा भारतातील वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाते. ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. यात मिळालेल्या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांना वैद्यकीय व दंतवैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळतो. ४ मे रोजी देशभरात नीट परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या सोईसाठी धाराशिव शहरात १५ केंद्रावर परीक्षा घेण्यात आली. विज्ञान शाखेतून बारावी परीक्षा दिलेल्या जिल्ह्यातील ६ हजार ६०२ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यातील ६ हजार ४५३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. यावेळी पोलिस बंदोबस्त कडक होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेवर गोळीबार

## ● जम्मू क्षेत्र आणि काश्मीर खोऱ्यातील ठाणी लक्ष्य ● भारताने दिले जोरदार प्रत्युत्तर

**◆ जम्मू, ५ मे**

जम्मू-काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेवरील आठ अग्रभागी क्षेत्रांमध्ये पाकिस्तानी सैन्याने विनाकारण गोळीबार करीत युद्धबंदी कराराचे उल्लंघन केले. रविवारी आणि सोमवारी रात्रभर गोळीबार सुरू होता. भारतीय सैन्याकडून त्याला प्रत्युत्तर देण्यात आले.

पहलगाम हल्ल्यानंतर नियंत्रण रेषेवर पाकिस्तानने सलग ११ व्या रात्री विनाकारण गोळीबार केला. ४ आणि ५ मे रोजी रात्री, जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा, बारामुल्ला, पूंछ, राजौरी, मेंढर, नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर येथील नियंत्रण रेषेवरील भागात पाकिस्तानी सैन्याच्या चौक्यांवर विनाकारण लहान शस्त्रांनी गोळीबार केला, असे जम्मूमधील संरक्षण प्रवक्त्याने सांगितले. जम्मू प्रदेशातील पीर पंजाल पर्वतरांगांच्या दक्षिणेस असलेल्या जम्मू, राजौरी आणि पूंछ आणि काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला आणि कुपवाडा या पाच सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानी सैन्याने रात्रीपासून गोळीबार सुरू केला.

उत्तर काश्मीरमधील कुपवाडा आणि बारामुल्ला जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवरील अनेक चौक्यांवर विनाकारण लहान शस्त्रांनी गोळीबार करून सुरुवातीला पाकिस्तानने युद्धबंदीचे उल्लंघन पूंछ सेक्टर आणि त्यानंतर जम्मू प्रदेशातील अखनूर सेक्टरपर्यंत वाढवले. त्यानंतर राजौरी जिल्ह्यातील सुंदरबनी आणि नौशेरा सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवरील अनेक चौक्यांवर लहान शस्त्रांनी गोळीबार करण्यात आला. त्यानंतर, जम्मू जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेवरील परगवाल सेक्टरपर्यंत गोळीबार करण्यात आला. (वृत्तसंस्था)



### ॥ उसंतवाणी ॥

१५०१



मुदत संपली । व्हिसा झाला बाद ।
राहण्याचा नाद । भारतात ॥१॥

अवैध हाकला । सारे पाकिस्तानी ।
नको मनमानी । अशांची ही ॥२॥

भारतात म्हणे । नाही लोकशाही ।
ही हुकूमशाही। मोदींचीच ॥३॥

कुणाला वाटले । 'डर का माहौल' ।
कुणाचे हे बोल । सांगा जरा ॥४॥

अशा भारतात । राहती कशाला ।
अवैध उशाला । व्हिसा ज्यांच्या ॥५॥

त्वरीत हाकला । अवघी ही घाण ।
देशावर ताण । फुकटचा ॥६॥

कांत म्हणे हाणा । इथला लिब्रांडू ।
कायद्याचा दांडू । लावा त्याला ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०५ मे २०२५

# पाकिस्तानकडून फतेह क्षेपणास्त्राची चाचणी



**◆ इस्लामाबाद, ५ मे**

दोन्ही देशांत कमालीचा तणाव असताना सोमवारी पाकिस्तानने फतेह या लघू पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची चाचणी घेतली आहे. फतेहची १२० किलोमीटरपर्यंत मारा करण्याची क्षमता आहे.

लष्कराची सिद्धता आणि तांत्रिक बाबी पडताळून पाहण्यासाठी चाचणी घेण्यात आल्याचे पाकिस्तानी लष्कराने म्हटले आहे. यावेळी वरिष्ठ लष्करी अधिकारी उपस्थित होते. गेल्या शनिवारी अब्दाली या ४५० किलोमीटर पर्यंत मारा करण्याची क्षमता असलेल्या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली होती. (वृत्तसंस्था)

## मुर्शिदाबादमध्ये स्थैर्य कायम : ममता बॅनर्जी

**◆ कोलकाता, ५ मे**

हिंसाचारग्रस्त मुर्शिदाबादमधील परिस्थिती स्थिर झाली आहे असे प्रतिपादन पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी केले. तसेच दंगलींवरील राज्यपाल सी.व्ही. आनंदा बोस यांनी गृह मंत्रालयाला दिलेल्या अहवालाची किंवा राज्यात कलम ३५६ लागू करण्याच्या शक्यतेचा उल्लेख केल्याची कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले.

सोमवारी दुपारी मुर्शिदाबादला दोन दिवसांच्या भेटीसाठी निघालेल्या बॅनर्जी म्हणाल्या की, त्या आधी भेट देऊ शकल्या असत्या, परंतु परिस्थिती सामान्य होईपर्यंत वाट पाहण्याचा पर्याय निवडला. मला गृह मंत्रालयाला बोस यांनी दिलेल्या अहवालाबद्दल कोणतीही माहिती नाही. राज्यपालांची प्रकृती ठीक नाही. त्यांच्या लवकर बरे होण्यासाठी आपण देवाकडे प्रार्थना करूया, असे बॅनर्जी यांनी हेलिकॉप्टरने मुर्शिदाबादला जाण्यापूर्वी सांगितले. (वृत्तसंस्था)

# सीमा सुरक्षा दलाच्या नव्या १६ तुकड्यांची होणार निर्मिती

## १७ हजारांच्यावर जवानांच्या भरतीची योजना

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

शेजारी देशांसोबत वाढते तणाव आणि सीमांचे रक्षण हे दोन मुद्दे लक्षात ठेवत सीमा सुरक्षा दलाच्या आणखी १६ तुकड्यांची निर्मिती करण्याचा विचार सरकार करीत आहे. यासाठी १७ हजारांपेक्षा जास्त जवानांची भरती करावी लागणार आहे.



नव्या तुकड्यांची निर्मिती आणि जवानांच्या भरतीला सरकारने तात्त्विक मंजुरी दिली आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशला लागून असलेल्या सीमांचे रक्षण करण्याची मोठी जबाबदारी सीमा सुरक्ष दलावर आहे. या दोन्ही देशांना लागून असलेल्या सीमांवरूनच देशाच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान मिळत आले आहे. नव्या बटालियनच्या निर्मितीबाबतची प्रक्रिया सुरू आहे. वित्त मंत्रालयाकडून हिरवा झेंडा मिळाल्यानंतर काम वेगाने सुरू होणार आहे. मंजुरी मिळाल्यानंतर महिला आणि पुरूष जवानांचे भरती अभियान सुरू होणार आहे. यासाठी निदान पाच ते सहा वर्षांचा कालावधी लागणार आहे. सध्या बीएसएफच्या एकूण १९३ बटालियन आहेत. एका बटालियनमध्ये एक हजारांपेक्षा जास्त जवान असतात. गेल्या काही वर्षांपासून देशासमोरील वाढती आव्हाने आणि झपाट्याने बदलत असलेली परिस्थिती पाहता नव्या २०-२१ नव्या तुकड्यांच्या निर्मितीचा प्रस्ताव गृहमंत्रालयाकडे पाठविण्यात आला होता. त्यापैकी गृहमंत्रालयाने १६ तुकड्यांना मंजुरी दिली आहे. (वृत्तसंस्था)

### सीमेजवळ होणार दोन फील्ड हेडक्वार्टर

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सीमा सुरक्षा दलांची दोन फील्ड हेडक्कार्टरच्या निर्मितीलाही मंजुरी दिली आहे. यातील एक जम्मू आणि पंजाब सीमेला लागून तर दुसरे मिझोराम येथे स्थापन करण्यात येणार आहे. बांगलादेशला लागून असलेल्या सीमेच्या रक्षणासाठी मिझोराममधील ठिकाण निवडण्यात येणार आहे.

## हरयाणाच्या फरार माजी काँग्रेस आमदाराला ईडीने केली अटक

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

अंमलबजावणी संचालनालयाने दिल्लीतील एका पंचतारांकित हॉटेलमधून फरार हरियाणा काँग्रेसचे माजी आमदार धरम सिंह छोकर यांना अटक केली आहे, असे ईडी अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. माजी आमदाराला रविवारी रात्री ९ वाजल्यानंतर मध्य दिल्लीतील शांग्री-ला हॉटेलच्या ग्रप्पा बारमधून ताब्यात घेण्यात आले.

रविवारी रात्री ८:३० च्या सुमारास चोकर काही लोकांसह हॉटेल बारमध्ये उपस्थित होता, अशी गुप्त माहिती मिळाली होती. गुरुग्रामच्या विशेष पीएमएलए न्यायालयाने जारी केलेल्या घोटाळ्याच्या नोटिससह त्याच्याविरुद्ध जारी केलेल्या सात अजामीनपात्र वॉरंटच्या अनुषंगाने त्यांना अटक केली आहे. (वृत्तसंस्था)

# दहावीत झाला नापास, तरी कापला केक, वाटली मिठाई

### कुटुंबाने साजरे केले अपयश
### कर्नाटकातील अफलातून प्रकार



**◆ बागलकोट, ५ मे**

दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत अनेकांना यश मिळते तर अनेक जण अपयशी होतात. यश मिळाल्यानंतर आनंद साजरा करण्यात येतो. दुसरीकडे अपयशी विद्यार्थ्यांना समाजच नाही तर पालकही टोमणे मारतात. पण ज्या जगात मुले अपयशी ठरल्यावर त्यांना टोमणे मारणे, शिव्या देणे आणि दबाव आणणे ही एक सामान्य गोष्ट आहे, तिथे कर्नाटकातील एका कुटुंबाने कल्पनेच्या पलीकडे जाऊन त्यांच्या मुलाच्या अपयशाचा दिवस एखाद्या उत्सवासारखा साजरा केला. आता या उत्सवाचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल होतो आहे.

कर्नाटकातील बागलकोट येथील बसवेश्वरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकणारा अभिषेक चोलचागुड्डा याचा दहावीचा निकाल लागला. एसएसएलसी बोर्ड परीक्षेत सर्व सहा विषयांत नापास झाला आणि त्याला एकूण ३२ टक्के म्हणजे ६२५ पैकी २०० गुण मिळाले. त्याचा असा निकाल पाहिल्यानंतर, पालकांनी याला रागवले नाही. तर त्यांनी त्यांच्या मुलासाठी एक सरप्राईज पार्टी आयोजित केली, एका खास केकही तयार केला. ३२ टक्के असे यावर लिहिले होते. अभिषेक त्याच्या संपूर्ण कुटुंबासह केक कापताना, मिठाई वाटताना आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हसताना दिसत आहे.

**तो एकटा नाही याची जाणीव करून दिली**

त्याचे वडील यल्लप्पा चोलाचगुड्डा, म्हणतात की अभिषेकला ३२ टक्के मिळाले असले तरी त्याने खूप मेहनत घेतली होती. या केकद्वारे आम्ही त्याला जाणीव करून दिली की तो एकटा नाही. यल्लप्पा म्हणतात, हा उत्सव अपयश लपवण्यासाठी नव्हता तर प्रयत्नांची कबुली देण्यासाठी होता. त्यांच्या मते, या छोट्याशा सेलिब्रेशनमुळे त्यांच्या मुलाचा आत्मविश्वास परत आला आणि आता तो पुढील प्रयत्नासाठी पूर्णपणे तयार आहे. अभिषेकने असेही म्हटले की, माझ्या कुटुंबाने मला पडू दिले नाही. आता मी पुढच्या वेळी ते पास होईल. (वृत्तसंस्था)

# अजित पवार यांना शरद पवार कधीच माफ करणार नाहीत : राऊत

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.५ मे:**

अजित पवार आणि शरद पवार यांच्या भेटीगाठी होत असतात. कारण दोन्ही नेते अनेक संस्थांवर एकत्र काम करत आहेत. या संस्थांच्या कामांसाठी तसेच कौटुंबिक कारणास्तव त्यांच्या भेटीगाठी त्यांच्या होत असतात. पण शरद पवार राजकीय दृष्ट्या अजित पवार यांना कधीच माफ करणार नाहीत, असे मत शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी सोमवारी व्यक्त केले.



पवार काका पुतण्या यांच्या नात्यांसंदर्भात वक्तव्य करताना ते म्हणाले, संस्थांच्या कामांसाठी तसेच कौटुंबिक कारणास्तव त्यांच्या भेटी होत असतात. कुटुंबाची नाती वेगळी असतात आणि राजकीय संबंध वेगळे असतात, अमित शाह यांनी अजित पवार यांना हाताशी धरुन राष्ट्रवादी पक्ष फोडला. त्याचा त्रास शरद पवार यांना झाला आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या शरद पवार अजित पवार यांना कधीच माफ करणार नाही. असे सांगून अजित पवार यांच्या मुख्यमंत्री होण्याच्या इच्छेबाबत राऊत म्हणाले, अजित पवार हे भाजपमध्ये सहभागी झाल्याशिवाय कधीही मुख्यमंत्री होणार नाही. त्यांना त्यासाठी आपला गट भाजपमध्ये विलीन करावा लागले. त्यानंतरच त्यांना मुख्यमंत्रीपद मिळेल,.

संजय राऊत यांनी रविवारी शरद पवार यांची मुंबईत भेट घेतली. त्यावेळी संजय राऊत यांनी शरद पवार यांना त्यांच्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आमंत्रण दिले. त्याबाबत ते म्हणाले, शरद पवार यांना पुस्तकाची प्रत हवी होती. त्यामुळे ती देण्यासाठी गेलो होता. त्यावेळी अनेक विषयांवर चर्चा झाली. पहलगाम हल्ल्याबाबत आमची चर्चा झाली. पवार यांचे मत संकटकाळात सरकारसोबत असावे, असे आहे. परंतु हे सरकार त्या योग्यतेचे नाही. राजीव गांधी, मनमोहन सिंग यांच्या सरकारपणे हे सरकार नाही. आमचे २७ लोक मारले गेले. त्यानंतरही अमित शाह खुर्चीवर बसले आहेत. या हल्ल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर काहीच दुःख दिसत नाही. सरकारने बोलवलेल्या सर्व पक्षीय बैठकीत का आले नाही? याबाबत शरद पवार यांनी विचारणा केली. त्यांना मी सांगितले की, ज्या सरकारच्या काळात अनेक नरसंहार झाले, त्या सरकारच्या बैठकीत मी गेलो नाही. मी गेलो असतो तर अमित शाह यांचा राजीनामा मागितला असता. मग आपल्या सर्वांची अडचण झाली असती, असे त्यांना सांगितल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# पोलिस बंदोबस्तात काढणार पांदण रस्त्यांवरील अतिक्रमण

- ✔ महसूलमंत्री बावनकुळे यांचे निर्देश
- ✔ शेतकऱ्यांच्या अडचणी होणार दूर

**मुंबई, ५ मे**

शेत व पांदण रस्त्यांचे अतिक्रमण काढताना तसेच, सर्व प्रकारच्या रस्त्यांची मोजणी करण्यासाठी पोलिस बंदोबस्त मोफत देण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. जे शेतकरी अतिक्रमण काढताना व मोजणी करताना अडवणूक करतात त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करा, अशा सूचनाही क्षेत्रीय पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

महसूल, नियोजन व रोहयो विभागाच्या शासन निर्णयानुसार आता गृह विभागाने स्पष्ट निर्देश जारी केल्या आहे. या निर्देशाने, राज्यातील शेतीला आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत रस्ता उपलब्ध होण्यासह पाणंद रस्त्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी हे पाऊल महत्वाचे ठरणार आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाणंद रस्त्यांच्या अंमलबजावणीबाबत मागील महिन्यांत दोन वेळा बैठका घेऊन अंमलबजावणीत स्पष्टता यावी यासाठी प्रयत्न केले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मोफत पोलिस बंदोबस्त देण्याचा निर्णय घेतला. तालुका पातळीवरचे पोलिस निरीक्षक हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार पोलिस बंदोबस्त पुरविण्याचा निर्णय घेतील.

# चीनवर कर लादण्याबाबत ट्रम्पचा यू-टर्न

**वॉशिंग्टन, ५ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेले शुल्क कमी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी कबूल केले की सध्याचे टॅरिफ दर इतके जास्त आहेत की जगातील दोन सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांनी एकमेकांशी व्यापार करणे थांबवले आहे.

ट्रम्प यांनी एनबीसीच्या एका कार्यक्रमात म्हटले होते की, मी कधीही चीनवरील कर कमी करेन, कारण जर असे केले नाही तर त्यांच्यासोबत व्यवसाय करणे शक्य होणार नाही आणि त्यांना व्यवसाय करायचा आहे. ट्रम्प यांनी सूचित केले की चीनची अर्थव्यवस्था सध्या अडचणीत आहे. २०२३ नंतर तेथील कारखान्यांचे कामकाज सर्वात वाईट स्थितीत आहे. निर्यात ऑर्डरमध्येही लक्षणीय घट झाली आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेले शुल्क कमी करण्याचे संकेत दिले आहेत.

# पाकिस्तानच्या आर्थिक नाड्या आवळणार

## एडीबीच्या अध्यक्षांना भेटल्या अर्थमंत्री

**◆ नवी दिल्ली, ५ मे**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्ताविरोधात अनेक मोठ्या कारवाया केल्या आहेत. यात सिंधू करार रद्द करणे, पाकिस्तानी नागरिकांना हाकलून लावणे, यासारख्या निर्णयांचा समावेश आहे. याशिवाय, भारताने पाकिस्तानविरोधात यापेक्षाही मोठी कारवाई करण्यासाठी अनेक देशांचा पाठिंबा मिळवला आहे. अशातच आता भारत पाकिस्तानवर आर्थिक हल्ला करण्याच्या तयारीत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी आशियाई विकास बँकेचे अध्यक्ष मसातो कांडा यांची भेट घेऊन पाकिस्तानला मिळणारी आर्थिक मदत थांबवण्याची मागणी केली आहे. मसाटो व्यतिरिक्त, अर्थमंत्र्यांनी इटलीचे अर्थमंत्री जियानकार्लो जॉर्जेट्टी यांचीही भेट घेऊन याच मागणीचा पुनरुच्चार केला. दहशतवादाचे संरक्षण आणि प्रोत्साहन देणाऱ्यांना आर्थिक निधी देऊ नये, असे भारताने स्पष्ट केले. तसेच, पाकिस्तानला आयएमएफकडून मिळणाऱ्या ७ अब्ज डॉलर्सच्या पॅकेजवरही भारताने प्रश्न उपस्थित केला आहे. (वृत्तसंस्था)

## जपानच्या संरक्षण मंत्र्यांनी घेतली राजनाथसिंहाची भेट

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी सोमवारी नवी दिल्ली येथे जपानी संरक्षण मंत्री जनरल नाकातानी यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली. जपानचे संरक्षण मंत्री भारत दौऱ्यावर आहेत. द्विपक्षीय बैठकीदरम्यान, जपान सरकारच्या वतीने जनरल नकातानी यांनी पहलगाम हल्ल्याबद्दल शोक व्यक्त केला. भारतासोबत संरक्षण सहकार्य वाढवण्याबद्दल संरक्षणमंत्र्यांनी जपानी संरक्षणमंत्र्यांचे कौतुक केले.



दोन्ही देशांच्या शिष्टमंडळांच्या बैठकीत, भारतीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी जनरल नाकातानी यांच्याशी झालेल्या त्यांच्या अलिकडच्या भेटीचा उल्लेख केला. भारत आणि जपानमधील संरक्षण सहकार्य नवीन उंची गाठू शकेल असा विश्वास व्यक्त केला. दोन्ही देशांमधील संरक्षण संबंध मजबूत करण्यासाठी जपानी संरक्षण मंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नांचे राजनाथ सिंह यांनी कौतुक केले. ते म्हणाले की, दोन्ही देशांमध्ये उपकरणे, तांत्रिक सहकार्य आणि माहितीच्या देवाणघेवाणीच्या पातळीवर बरीच प्रगती झाली आहे.

## रशिया भारताच्या पाठीशी, पुतिन यांचा पंतप्रधानांना फोन

पुतिन यांनी पंतप्रधान मोदींशी फोनवरून चर्चा केली आणि पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल चर्चा केली. दहशतवादाविरुद्धच्या लढाईत रशिया भारताला पूर्ण पाठिंबा देणार असल्याचे रशियन राष्ट्राध्यक्षांनी सांगितले. रशिया आणि भारत यांच्यातील संबंध बाह्य प्रभावामुळे प्रभावित होत नाहीत आणि ते विकसित होत राहतील यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करून भारतातील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला. त्यांनी निष्पाप लोकांच्या मृत्युबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आणि दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारताला पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

### स्वीकारले निमंत्रण

पंतप्रधानांनी राष्ट्रपती पुतिन यांना विजय दिनाच्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आणि या वर्षाच्या अखेरीस भारतात होणाऱ्या वार्षिक शिखर परिषदेसाठी त्यांना आमंत्रित केले. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भारत भेटीचे निमंत्रण स्वीकारले आहे.

## अग्रलेख...

# फसवा फतवा आणि बेलगाम जिभा!

कोणत्याही निवडणुकीत सातत्याने होणारा पराभव ही राजकीय पक्षांनी चिंतित होऊन चिंतन करावी अशी बाब असताना, शतकाहूनही अधिक काळाचा इतिहास असलेल्या आणि सहा दशकांहूनही अधिक काळ देशावर सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वास अशी कोणती चिंता भेडसावत असेल अशी कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने, या पक्षाच्या भविष्यावरील प्रश्नचिन्ह अधिकाधिक गडद होत जाणार आहे. यामुळेच, इतिहासातील शीखविरोधी दंगलीसह काँग्रेसकडून झालेल्या सर्व चुकांची जबाबदारी स्वीकारून त्याचे प्रायश्चित्त घेण्याची तयारी आज जवळपास चार दशकांनंतर दाखविण्याची राहुल गांधी यांची नवी चाल देशातील जनतेस किती विश्वासार्ह वाटेल हा प्रश्नच आहे. केवळ जनमानसात फोफावत असलेला काँग्रेसविरोधी भावनेचा उद्रेक शमविण्यासाठी आणि सातत्याने ढासळत चाललेली पक्षाची प्रतिमा कसेही करून पुन्हा उजळण्यासाठी आता राहुल गांधी यांनी आपल्या पक्षाच्या चुकांचे प्रायश्चित्त घेण्याचा कांगावा करून कबुलीसत्र सुरू केले असले, तरी पक्षाच्या जनविरोधी भावनांचा पीळ मात्र अजूनही कायमच आहे. जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे गेल्या २२ एप्रिल रोजी झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यानंतर देशात सर्वत्र पाकविरोधी संतापाच्या लाटा उसळत असताना, राहुल गांधींच्या काँग्रेसचे नेते मात्र, निव्वळ राजकारणापायी सत्ताधारी भाजपवर दुगाण्या झाडत पाकिस्तानच्या भूमिकेस प्रोत्साहन मिळेल अशी बेताल वक्तव्ये करत सुटले होते. जनतेच्या भावना संवेदनशील झालेल्या असताना, दहशतवादासारख्या भीषण समस्येविरोधात संपूर्ण देश एकवटलेला असताना आणि केंद्रातील सरकारने कठोर पावले उचलण्याची तयारी सुरू केलेली असताना काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या प्रत्येक फळीवर बसलेले वेगवेगळे नेते आपापले सरकारविरोधी सूर आळवण्याच्या स्पर्धेत उतरून पाकिस्तानला पोषक ठरणारी वक्तव्ये करीत राजकारणातील संकुचितपणाचे दर्शन घडविण्यात मग्न होते. उभा देश एका संकटाशी सामना करण्यासाठी सज्ज होत असताना आणि या सामन्याच्या आघाडीवर उतरून देशाची सैन्यदले संपूर्ण तयारीनिशी पाकिस्तानसमोर सज्जड आव्हान उभे करत असताना, काँग्रेसचे नेते मात्र, जनतेच्या आणि लष्कराच्या नीतिधैर्याची खिल्ली उडविण्याचे राजकारण करू लागले होते. त्यांच्या अशा राजकारणातून खुद्द पाकिस्तानलाही या हल्ल्यापासून स्वतःस अलग राखण्याच्या केविलवाण्या प्रयत्नांस बळ मिळत असल्याच्या बातम्या पसरू लागल्या, देशात काँग्रेसी राजकारणाविरोधात नव्या संतापाचा उद्रेक दिसू लागला, तेव्हा या पक्षाच्या नेत्यांनी जाग आल्याचे सोंग घेऊन जारी केलेला फतवादेखील किती फसवा आणि देशातील जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणारा आहे, हेही आता स्पष्ट होऊ लागले आहे. पहलगाम हल्ल्यानंतर जावई रॉबर्ट वाड्रा, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, बी. के हरिप्रसाद, महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, वादग्रस्त वक्तव्ये करून स्वपक्षाला सातत्याने अडचणीत आणणारे नेते म्हणूनच प्रसिद्ध असलेले मणिशंकर अय्यर आदी नेत्यांनी जी काही मुक्ताफळे उधळली, त्यामुळे पुन्हा एकदा पक्षाची जनमानसातील उरलीसुरली प्रतिमादेखील पुसली जाण्याची जाणीव झाल्याचे भासवून काँग्रेसने जारी केलेला हा फतवा म्हणजे निव्वळ राजकीय धूळफेक होती, हेच आता मुक्ताफळांच्या नव्या मालिकेतून दिसून येत आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ला ही हिंदुत्वाच्या आक्रमक भूमिकेची स्वाभाविक प्रतिक्रिया असल्याच्या रॉबर्ट वाड्रा यांनी लावलेल्या 'जावईशोधा'मुळे अडचणीत आल्याची जाणीव झालेल्या काँग्रेसने सारवासारवीची तयारी सुरू केलेली असतानाच कर्नाटकच्या सिद्धरामय्या यांनी पक्षाच्या प्रयत्नांवर पाणी फिरवून पाकिस्तानशी युद्ध करण्याची गरज नसल्याचा सल्ला दिला. विजय वडेट्टीवार यांनी तर या नेत्यांच्या वक्तव्यांवर कुरघोडी करून, धर्म विचारून गोळ्या घातल्याच्या पर्यटकांच्या प्रत्यक्ष अनुभवालाच आव्हान दिले. सातत्याने दहशतवादी कारवाया घडवून भारतात असुरक्षितता आणि अस्थिरता माजविण्याच्या प्रयत्नांत पाकिस्तानचा हात असल्याचे पुरावे भारत अथकपणे जगासमोर मांडत असताना, बी. के. हरिप्रसाद नावाच्या एका नेत्यास मात्र पाकिस्तान हा भारताचा शत्रू नाहीच, असा साक्षात्कार झाला होता, तर पहलगाम हल्ला हा फाळणीनंतरच्या असंख्य अनुत्तरित प्रश्नांचा परिणाम आहे, असा थेट निर्वाळा देऊन मणिशंकर अय्यर यांनी हल्ल्यांच्या मानसिकतेचे मनोवैज्ञानिक विश्लेषण करत पाकिस्तानच्या भावना कुरवाळण्याचा प्रयत्न करून पाहिला.

पक्षाला अडचणीत आणण्याची अशी तीव्र स्पर्धा शिगेला पोहोचलेली असताना गेल्या २९ एप्रिलला पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी एक फतवा जारी करून मुखंडांच्या मुक्ताफळांस लगाम घालण्याचा प्रयत्न केला होता. पहलगाम हल्ल्यानंतर काँग्रेस पक्ष देशाच्या ऐक्यभावनेसोबतच असून पक्षाच्या नेत्यांनी बेजबाबदार वक्तव्ये टाळावीत, असा स्पष्ट आदेशही त्यांनी दिला होता. एका बाजूला बेजबाबदार आणि शत्रुपक्षास बळ मिळेल अशी वक्तव्ये करून देशाच्या भवनांची खिल्ली उडविण्याच्या प्रयत्नांस लगाम घालणारी भूमिका दाखविणारे कागदी घोडे नाचवायचे आणि दुसरीकडे नेत्यांच्या जिभांचे लगाम मात्र बरळण्यासाठी सैल सोडावयाचे असे काहीसे धोरण असल्याच्या शंकेस पुष्टी मिळेल असे ताजे दाखले काँग्रेसमध्ये दिसू लागले आहेत. काँग्रेसचे उत्तर प्रदेशातील अध्यक्ष अजय राय यांनी रविवारी पक्षाच्या या आदेशालाच पाने पुसली. भारतीय सैन्यदलाचे बळ असलेल्या राफेल विमानाची खेळण्यातील प्रतिकृती घेऊन त्यांनी या विमानाचा वापर करण्याच्या क्षमतेवरच प्रश्न उभे केले. पहलगामचा दहशतवादी हल्ला ही सुरक्षा यंत्रणांच्या आणि भारतीयांच्या भावनांची वेदना आहे. याचा पुरेपूर बदला घेतला जाईल, अशी ग्वाही देणाऱ्या केंद्र सरकारने सातत्याने पाकिस्तानाची सर्व आघाड्यांवर कोंडी करून वेगळ्या युद्धनीतीचे दर्शन घडविले आहे. समोरासमोरच्या प्रत्यक्ष युद्धाआधीच शत्रुपक्षाचे खच्चीकरण करण्याची ही नीती काँग्रेसला ठावूकच नसल्याने, युद्धज्वराचा उद्रेक होऊन युद्धासाठी उतावीळ झालेल्या अनेकांप्रमाणे वर्तन करणाऱ्या या काँग्रेस नेत्याने देशाच्या, लष्कराच्या आणि सरकारच्या क्षमतेलाच आव्हान देणारे राजकारण करून एक प्रकारे उडविलेली ही खिल्ली म्हणजे, पक्षाच्या फतव्याचा कागदी घोडा खुंटीवर टांगून जिभेचा लगाम सैल सोडण्याचे धाडस दाखविण्यासारखेच आहे. म्हणूनच, पक्षाचा तो फतवा ही दिशाभूल आणि धूळफेक असावी की काय ही शंका बळावते आहे. या फतव्यानंतरही अशी बेताल वक्तव्ये करणाऱ्या कोणत्याही नेत्यावर काय कारवाई करणार ते अजूनही पक्षातर्फे स्पष्ट केले गेलेले नाही. अर्थात, अशा वाचाळांना पदरी बाळगणे ही नीतीच असल्यामुळे त्यांचे काय करावे हा त्या पक्षाचा अंतर्गत मामला असल्याने, अशा प्रसंगी विरोधी पक्षांची वर्तणूक कशी असावी याची इतिहासातील आदर्श उदाहरणे पक्षाने नेत्यांसमोर ठेवावयास हवीत. याआधी जेव्हा जेव्हा देशावर युद्धस्थितीचे सावट दाटले, तेव्हा तेव्हा विरोधी पक्ष या नात्याने तत्कालीन जनसंघ व भाजपच्या नेत्यांनी दाखविलेला संयम, समंजसपणा आणि पक्षभेदाचे राजकारण विसरून घडविलेले ऐक्याचे दर्शन ही नीती काँग्रेसच्या विस्मरणात गेली असावी. स्वातंत्र्यानंतरच्या अशा प्रत्येक आव्हानात, संकटात तत्कालीन विरोधी नेते म्हणून अटलबिहारी वाजपेयी वा अन्य नेत्यांनी दाखविलेला समंजसपणा आणि अय्यर, वाड्रा किंवा वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांचा वाचाळपणा यांची तुलना होणे आता अपरिहार्य आहे. १९६२ च्या चीन युद्धात विरोधी पक्ष या नात्याने सत्ताधारी काँग्रेसला संपूर्ण सहकार्य करण्याची जाहीर ग्वाही तत्कालीन विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांनी दिली होती. १९७१ च्या बांगला युद्धातही अटलबिहारी वाजपेयी यांनी संपूर्ण पक्ष सरकारच्या पाठीशी उभा केला होता. सरकार किंवा तत्कालीन नेतृत्वाच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास दाखविण्याचे राजकीय औदार्य दाखविण्याची वेळ आता विरोधी पक्ष या नात्याने काँग्रेसवर आली आहे. तशी कृती आणि उक्ती करून राजकारणापलीकडच्या देशहिताची भूमिका घ्यावी, हे जेव्हा काँग्रेसला उमगेल, तेव्हा प्रतिमानिर्मितीच्या राहुल गांधींच्या प्रयत्नांवर जनतेचा विश्वास बसेल.

## आंतरराष्ट्रीय

# जगावर वर्चस्वाची पुतिन यांची महत्त्वाकांक्षा

प्रा. जयसिंग यादव

रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यांवर सतत टीका होत आहे. युक्रेन आणि त्याचे अध्यक्ष झेलेन्स्की यांना पाठिंबा देण्यासाठी अनेक देश एकत्र आलेत. अमेरिकेत दुसऱ्यांदा निवडणूक लढवत असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांनी वचन दिले होते की ते अध्यक्ष होताच एका दिवसात ही समस्या सोडवतील. मात्र अध्यक्ष झाल्यानंतर शंभर दिवस उलटूनही युद्ध संपलेले नाही. अर्थात या दिशेने काही पावले निश्चितच उचलली गेली आहेत. ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेनला युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास राजी केले होते. त्यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी दोनदा फोनवरून चर्चा केली. अमेरिकेच्या पुतिन यांच्याबद्दलच्या दृष्टिकोनात बदल दिसून आला आहे. याआधी पुतिन आंतरराष्ट्रीय स्तरावर एकाकी पडले होते; पण ट्रम्प हे पुतिन यांच्याशी चर्चेच्या बाजूने आहेत. ट्रम्प सत्तेत आल्यापासून जागतिक व्यवस्था बदलत असून पुतिन यांना त्यांच्या सत्तेत येण्याचा खूप फायदा झाला आहे. ट्रम्प यांचा विजय पुतिन यांच्यासाठी वरदान ठरला आहे. कारण जागतिक व्यवस्थेबद्दल त्यांचे विचार पुतिन यांच्यासारखेच आहेत. त्यांनी रशियाला हे युद्ध जिंकण्याची संधी दिली आहे. हे आधी शक्य नव्हते, कारण रशिया युद्धभूमीवर जिंकला असता, तरी जगात एकटा पडला असता. युक्रेनला पाठिंबा देण्याच्या बदल्यात ट्रम्प यांनी दोन अटी घातल्या आहेत. एक म्हणजे युक्रेनचे अणुऊर्जा प्रकल्प अमेरिकेच्या नियंत्रणाखाली आणणे आणि दुसरे म्हणजे अमेरिकेला युक्रेनच्या खनिज संपत्तीचा गैरफायदा घेण्याची संधी देणे. ट्रम्प यांना जागतिक व्यवस्थेचे स्वरूप बदलायचे असेल, तर युक्रेन युद्धात रशियासाठी राजकीय विजयाचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

ट्रम्प ज्या पद्धतीने कॅनडा, ग्रीनलॅण्ड आणि पनामा ताब्यात घेण्याबद्दल बोलतात, त्यावरून दिसते की पुतिन आणि त्यांचे विचार समान आहेत; परंतु ट्रम्प प्रशासनातील अराजकता पाहता, ट्रम्प आणि पुतिन जागतिक व्यवस्थेवर चर्चा करतील असे वाटत नाही. या गोंधळात राजनैतिक संतुलन राखणे सोपे नाही. व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प आणि झेलेन्स्की यांच्यातील कटू भेटीत वारा किती लवकर बदलू शकतो, हे आपण पाहिले. शांततापूर्ण आणि सौहार्दपूर्ण चर्चा अचानक संघर्षात रूपांतरित झाली आणि त्यानंतर अध्यक्ष झेलेन्स्की आणि त्यांची टीम व्हाईट हाऊसमधून निघून गेली. यानंतर युक्रेनला अमेरिकेकडून गुप्तचर लष्करी माहिती आणि अनेक शस्त्रे मिळणे बंद झाले. त्यामुळे युक्रेनच्या



युद्धक्षमतेवर परिणाम झाला; पण पुतिन या संघर्षपूर्ण भेटीमुळे खूप आनंदी होते. कारण ट्रम्प हे पुतिन नेहमीच सांगत असलेल्या अनेक गोष्टी सांगतात. प्रथम, त्यांनी सांगितले, की युक्रेनमध्ये निवडणुका झाल्या पाहिजेत अन्यथा, झेलेन्स्कीचे नेतृत्व कायदेशीर असू शकत नाही. अमेरिका आणि रशिया जवळ येत आहेत, असे वाटत असताना पुन्हा कटुता अनुभवायला मिळाली. पुतिन यांना युक्रेन रशियाच्या नियंत्रणाखाली आणायचा आहे आणि ट्रम्प यांना युक्रेनमधून अमेरिकन सैन्य मागे घ्यायचे आहे. हे पुतिन यांच्या पथ्यावर पडणार आहे. सत्तेत आल्यापासूनच पुतिन यांनी १९९० च्या दशकात रशियाच्या आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमधील अपयशाचा मुद्दा उपस्थित करून आपली प्रतिमा उंचावली. सत्ताधारी नेत्याची सिंहासनावर मजबूत पकड आहे हे स्पष्ट आहे. पुतिन यांना नेहमीच देशातल्या साठ टक्क्यांहून अधिक लोकांचा पाठिंबा राहिला आहे. सध्या तो ७५ टक्क्यांपर्यंत आहे. पुतिन हा पाठिंबा टिकवून ठेवण्यासाठी युद्धाद्वारे देशाला एकत्र करतात. सरकारी माध्यमांवर नियंत्रण ठेवून ते जनमतावर प्रभाव पाडतात. २००० मध्ये सत्तेवर येताच त्यांनी प्रथम सरकारी टीव्ही चॅनेल्सवर नियंत्रण मिळवले. त्या वेळी ९० टक्के रशियन लोकांसाठी ते माहितीचा मुख्य स्रोत होते; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटमुळे लोकांना इतर स्रोतांकडूनही माहिती मिळू लागली आहे. तथापि, इंटरनेटद्वारे माहिती मिळवणारे बरेच लोक सरकार समर्थक 'सोशल मीडिया चॅनेल्स'चा अधिक वापर करतात. रशियाच्या शक्तिप्रदर्शनामुळे त्यांच्या नेत्याला जनतेचा पाठिंबा वाढला आहे, असे सर्वेक्षणातून दिसून आले आहे; परंतु युद्धाची वास्तविकता वेगळी गोष्ट सांगते. सरकारी प्रचार असूनही रशियन लोकांना युद्धाचे खरे परिणाम हळूहळू दिसू लागले आहेत. लोक मारले जात आहेत. कुटुंबे त्रास सहन करत आहेत. देश गेल्या तीन वर्षांपासून सर्वांत भयंकर युद्धांपैकी एकात अडकला असून शेवट दिसत नाही. त्याकडे दुर्लक्ष करणे कठीण आहे; परंतु रशियन समाजामध्ये अनेक पूर्वग्रह आहेत. त्यामुळे लोक युद्धाच्या परिणामांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करतात. पुतिन यांचा प्रभाव आणि प्रतिमा केवळ रशियातील लोक त्यांच्याकडे कसे पाहतात, यापुरती मर्यादित नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये रशियन सरकारने जगात एकाकी पडलेल्या किंवा विश्वासार्ह न मानलेल्या सरकारांशी युती करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. याचे एक उदाहरण रशियाच्या उत्तर कोरियाशी असलेल्या संबंधांमध्ये दिसून येते. याशिवाय, रशियाने आफ्रिकेतील एकाकी पडलेल्या सरकारांशीही संबंध निर्माण केले आहेत. त्यात इरिट्रिया, इक्वेटोरियल गिनी यांचा समावेश आहे. या धोरणाची काही उदाहरणे युरोपमध्येही दिसू शकतात. रशियाने मोल्दोव्हा, जॉर्जियामध्ये राजकीय मार्गाने आणि युक्रेनमध्ये लष्करी बळाच्या माध्यमातून आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे; पण दुसरीकडे अनेक आफ्रिकन देशांमध्येही प्रभाव वाढवण्यासाठी जमीन तयार केली. १९९० मध्ये रशियाने युरोपवरून आपले लक्ष दुसरीकडे वळवून आफ्रिकन देशांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचे धोरण स्वीकारले. म्हणजेच, त्याला सोव्हिएत काळातील परराष्ट्र धोरणाऐवजी एक नवीन आधुनिक परराष्ट्र धोरण स्वीकारायचे होते. त्या वेळी त्याला त्याचा फारसा फायदा झाला नाही. २०१७ नंतर रशियन सरकारच्या पाठिंब्याने खाजगी लष्करी कंपनी असलेल्या 'वॅग्नर ग्रुप'ने मध्य आफ्रिकन रिपब्लिकमध्ये लष्करी कारवाई केली, तेव्हा त्याला यश मिळाले. या गटाचे नेतृत्व येवगेनी प्रिगोझिन यांनी केले होते. ते सरकारच्या जवळचे मानले जात होते. त्यानंतर, या गटाने लिबियामध्येही लष्करी कारवाई केली. त्यामुळे रशियन सरकारला वाटले की, आफ्रिकन देशांमध्ये वाढता प्रभाव फायदेशीर ठरू शकतो. सध्या रशिया आफ्रिकन देशांना शस्त्रे आणि इतर मदत देऊन आकर्षित करू इच्छितो. हे देश पूर्वी पश्चिमेच्या जवळचे होते. आज रशिया जगात नवी व्यवस्था आणून लोकशाही हा शासनाचा एकमेव कायदेशीर मार्ग नाही हे दाखवू इच्छितो. एक खंड म्हणून संयुक्त राष्ट्रांमध्ये आफ्रिकेला सर्वाधिक मते आहेत. आफ्रिका हा एक मोठा मतदार गट आहे आणि कोणताही देश आंतरराष्ट्रीय बाबींमधील निर्णयांवर प्रभाव टाकण्यासाठी या मोठ्या मतदारगटाचा पाठिंबा मिळवू इच्छितो. रशियाला संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत आफ्रिकेची ५४ मते आपल्या बाजूने हवी असून आफ्रिकेच्या नैसर्गिक संसाधनांचा फायदाही घ्यायचा आहे. दुसरीकडे, आफ्रिका भौगोलिकदृष्ट्या युरोपच्या जवळ आहे, म्हणूनही रशिया आफ्रिकन देशांना आपले मित्र बनवून युरोपमधील प्रतिस्पर्ध्यांना वेढू इच्छितो. पुतिन यांना रशियाला जगातील एक प्रमुख शक्ती बनवायचे आहे; परंतु त्यांची धारणा १९ व्या शतकातील वसाहतवादी विचारसरणीसारखी आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी ते जगाला कमकुवत करू इच्छितात; जेणेकरून त्यांचे हात अधिक मजबूत होतील. ट्रम्प हे पुतिन यांची भाषा बोलत आहेत; पण हेदेखील खरे आहे की आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टासाठी दोघेही एकमेकांची मदत घेऊ शकतात. हे दोन्ही नेते राजनैतिक संबंधांकडे एक करार म्हणून पाहतात. पुतिन यांना जगात रशियाचा प्रभाव वाढवायचा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करत राहतील; पण जग यावर कसा प्रतिसाद देईल हे स्पष्ट नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## इतस्ततः

# प्रभावी औद्योगिक विकासासाठी...


दत्तात्रेय आंबुलकर

गेल्या काही कालावधीत भारताची औद्योगिक विकासाची वेगवान घोडदौड सुरू आहे. देशांतर्गतच नव्हे, तर जागतिक पातळीवर भारताच्या विकास आणि विकासयात्रेची सकारात्मक नोंद घेतली जात आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानासह उद्योग-विकासाचे सहा मोठे करार होणे, याचीच पुष्टी करतात. असे असले तरी भारताच्या औद्योगिक विकासाला व या विकासयात्रेला गती देण्यासाठी मूलभूत स्वरूपातील बदल आणि बदलांची साथ तातडीने व वेळेत देणे ही काळाची गरज ठरते.

याआधी भारताने गेल्या दशकात पूर्व व दक्षिण आशियाई देश, ब्रिटन, न्यूझीलंड, युरोपीय देशांसह रशिया, मध्य आशियाई देशांसह अमेरिकेशी विविध प्रकारचे व्यापार-करार केले आहेत. याचा फायदा करारांशी संबंधित उभयपक्षी देशांना झाला आहे. यातूनच जागतिक स्तरावर भारतासाठी उद्योग-व्यवसाय व व्यापार अनुकूल वातावरण तयार होत गेले, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, सद्यःस्थितीत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या लहरी स्वरूपातील बदलत्या व बदलणाऱ्या आयातशुल्कासह विविध प्रकारच्या व्यापारी धोरणांच्या पृष्ठभूमीवर भारताने आपल्या औद्योगिक धोरण आणि त्याच्या अंमलबजावणीचा मुळातून विचार करणे गरजेचे ठरते.

जागतिक स्तरावर आर्थिक अस्थिरतेसह वाढती स्पर्धा व राजकीय धोरणांसह घेण्यात येणाऱ्या निर्णयांचा परिणाम इतर देशांप्रमाणेच भारतावरही अपरिहार्यपणे होतो. 'जागतिक व्यापार संघटना', 'जागतिक बँक' आणि जगातील विभिन्न क्षेत्रीय व्यापारी संघटना यांच्या धोरणांच्या परिणामांना आज सर्व देशांना सामोरे जावे लागत आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या आर्थिक धोरणांचा अमेरिका व देशाबाहेर होणाऱ्या परिणामांचा मागोवा घेणे, हे यानिमित्ताने महत्त्वाचे ठरते. नव्याने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिका आणि अमेरिकी उद्योग-व्यवसाय यांना सहकार्यासह प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. ट्रम्प यांच्या नव्या राजवटीच्या या नव्या निर्णयाकडे एक स्वाभाविक प्राधान्यपर निर्णय म्हणून पाहण्यात आले. मात्र, सुरुवातीला आर्थिक-प्रशासनिक निर्णय भासणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा तपशील व परिणाम जगात सर्वांपुढे आला व त्याची आर्थिक-व्यावसायिक दाहकता समोर येत गेली.

वाढत्या आयातशुल्काशी संबंधित या निर्णयामुळे भल्याभल्या देशांचे धाबे दणाणले. आपल्या 'धक्कातंत्रा'साठी प्रसिद्ध असणाऱ्या ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाने अमेरिकेशी आयात व व्यापारव्यवहार करणाऱ्या देशांसमोर मोठे



अर्थसंकट व व्यावसायिक आव्हान निर्माण झाले आहे. त्यानंतर टप्पा सुरू झाला, तो अमेरिकेच्या आयातशुल्कावर वाटाघाटींचा. अर्थात, या वाटाघाटींचे मुख्य सूत्र अमेरिकन प्रशासनाच्याच हाती राहिले. जगातील विविध देशांच्या नेते आणि नेतृत्वाचा यानिमित्ताने नेमका कस लागला, हे विशेष. ट्रम्प यांच्या आयातशुल्क धोरणावर अवास्तव प्रतिक्रिया देण्याचे टाळून, प्राप्त परिस्थितीत अमेरिकेच्या वाढीव व अवास्तव आयातशुल्काबाबत व्यावहारिक भूमिका घेऊन या अकल्पित आर्थिक संकटाची तीव्रता कमी करण्याला धोरणात्मक प्राधान्य देऊन त्यानुसार तातडीने प्रयत्न सुरू केले. मोदी सरकारच्या या प्रयत्नामध्ये अमेरिकेशी व्यापारसंबंध व या संबंधांना मोदी-ट्रम्प यांच्या वैयक्तिक मैत्रीपूर्ण संबंधांची जोड देत तातडीने प्रयत्न केले. या प्रयत्नांसाठी भारताने अमेरिकेशी केलेले व्यापारी करार व प्रयत्न यांची जोड दिली गेली. यादृष्टीने नजीकच्या भूतकाळात केलेल्या करारांचे संदर्भ देण्यात आले. या प्रयत्नांचे एकत्रित व सकारात्मक परिणाम दिसून येऊ लागले. याचाच परिणाम म्हणून अमेरिकेने भारताच्या निर्यातशुल्काचा सहानुभूतिपूर्ण फेरविचार केला. त्यामुळे भारतीय उद्योग आणि कंपन्यांना दिलासा तर मिळालाच, त्याशिवाय भारतीय शेअर बाजाराला वेळेत पाठबळ मिळाले. अशा प्रकारे उद्योजकांपासून गुंतवणूकदारांपर्यंत सर्व संबंधित व महत्त्वाच्या घटकांना या नव्या भूमिकेचा फायदा झाला.

उद्योग-व्यवसायांच्या दृष्टीने या महत्त्वाच्या व सकारात्मक परिणामांचा विश्लेषक कानोसा घेता स्पष्ट होते की, समोर एका वर्षापूर्वी भारताने अमेरिकेशी उभयपक्षी व्यापार-उद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे करार केले. या करार करण्यामागे भारत-अमेरिका यांच्या परस्पर गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व त्यासंदर्भात उभय देशांचे व्यापारी-व्यावसायिक हित साधण्यासाठी उभयपक्षी प्रयत्न करण्यावर एकमत झाले होते. नेमक्या या कराराचा फायदा ट्रम्प यांच्या आयातशुल्कवाढ धोरणानंतर भारताला झाला. अर्थात यामध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मुत्सद्देगिरीसह केलेल्या प्रयत्नांचा व वाटाघाटींचा मोठा वाटा राहिला. या प्रयत्नांच्या परिणामी भारताला मुख्यतः झालेला फायदा म्हणजे, भारत-अमेरिका व्यापारी करारानुसार अमेरिकन कंपन्यांनी भारतात विविध उत्पादनांच्या उत्पादन-प्रकिया उद्योगांना प्रोत्साहन दिले गेले. यामागे पंतप्रधान मोदींच्या 'मेक इन इंडिया' हे धोरणसूत्र होते. याचाच परिणाम म्हणून अमेरिकन कंपन्यांनी भारतात उत्पादन-उद्योग सुरू करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भारतात या उद्योगांशी संबंधित नोकरी-रोजगार व त्याशिवाय विविध क्षेत्रातील गुंतवणूक तर वाढलीच, त्याशिवाय भारत व अमेरिकेच्या दरम्यानच्या या संयुक्त व परस्परांच्या हितसंबंधांवर आधारित या करारांमुळे ट्रम्प प्रशासनाला आयातशुल्क वाढीच्या आपल्या निर्णयाच्या संदर्भात भारताच्या बाबत सामंजस्यपूर्ण भूमिका घ्यावी लागली, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. भारताच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर 'मेक इन इंडिया'च्या प्रयत्नांना पूरक धोरणांची साथ मिळत आहे. यासंदर्भात नोव्हेंबर २०२४ साली सिंगापूर येथे झालेल्या औद्योगिक संमेलनात चीनच्या विरोधाला न जुमानता छोटी साधने आणि उपकरणांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी भारताला प्राधान्य देण्याचा घेण्यात आलेला निर्णय यासंदर्भातील एक महत्त्वाचा निर्णय टप्पा ठरला आहे. भारताने पण याच भूमिकेतून विचार करून केंद्र पातळीवर वाणिज्य मंत्रालयाला उत्पादन प्रक्रिया विभागाची भक्कम साथ दिल्यास भारतीय उत्पादन उद्योग आंतरराष्ट्रीय पातळीवर पण नावलौकिक कमावतील, हे निश्चित.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वेध

नितीन शिरसाट

# भाकितांची परंपरा आणि शेतकऱ्यांचे वास्तव

आज संपूर्ण देश एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला आधुनिक विज्ञान, अंतराळ प्रवास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाने मानवाला भविष्यातील दिशा दाखवली आहे, तर दुसऱ्या बाजूला मानवनिर्मित युद्ध, पर्यावरणीय संकट, भूकंप, महापूर, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्ती मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. यात भर म्हणजे देशभरात काही भागांत होणाऱ्या भविष्यवाणी, भाकिते ज्या महायुद्ध, जगबुडीची शक्यता वर्तवतात. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील भेंडवळ या गावात ३०० वर्षांपूर्वीच्या अक्षय्य तृतीयेच्या मूहूर्तावर शेतीविषयक पीक पाणी, राजकीय परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, देशाची सुरक्षा व्यवस्था अशा महत्त्वाच्या जनमानसांत उत्कंठा निर्माण करणाऱ्या या घट मांडणीची प्रतीक्षा संपूर्ण राज्याला असते. भेंडवळ मांडणीची भविष्यवाणी गेल्या काही वेळा वास्तवात उतरताना दिसल्या आहेत. परिणामी, आजही हजारो लोक त्या भविष्यवाणीकडे गांभीर्याने पाहतात. २०२० नंतरच्या काळात जगभरात तणावाची स्थिती वाढलेली दिसते. युक्रेन-रशिया युद्ध, इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, चीन-तैवान तणाव आणि अमेरिकेचे इतर राष्ट्रांशी असलेले राजनैतिक व लष्करी मतभेद या सर्वांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर तिसऱ्या महायुद्धाची भीती निर्माण केली आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आजच्या महायुद्धात फक्त सैनिक किंवा रणभूमीच नाही, तर संपूर्ण देश नष्ट होऊ शकतात. अण्वस्त्र, सूक्ष्म क्षेपणास्त्रे आणि जैविक युद्धसामग्रीमुळे एकाच वेळी लाखो-कोट्यवधी लोक मृत्युमुखी पडू शकतात. ही भीती अनेकांनी व्यक्ती केली आहे. भेंडवळ मांडणी ही एक पारंपरिक धार्मिक सामाजिक प्रक्रिया आहे. २०२० मध्ये मांडणीत रोगराई व जगभर संकट येईल असे म्हटले गेले होते. त्यानंतर काही महिन्यांत कोविड-१९ महामारीचा उद्रेक झाला. या वर्षीच्या भेंडवळ मांडणीत कापूस, गहू, तांदूळ व इतर पिके साधारण तर काही पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली आहे. देशात आर्थिक स्थिती अडचणीची राहणार असून काही भागात राष्ट्रपती राजवट लागू शकते, गुरे ढोरे यांच्यावर रोगराईचा प्रादुर्भाव असेल असे हजारो शेतकऱ्यांसमोर जाहीर केले हे ऐकून अनेक लोक चिंतेत आहेत. या भविष्यवाण्यांपेक्षा अधिक भयावह वास्तव म्हणजे शेतकऱ्यांचे सध्याचे जीवन. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात शेतकरी पावसासह चांगल्या हवामानावर अवलंबून आहेत. मात्र गेल्या काही वर्षांत हवामानाचे स्वरूपच बदलले आहे. यामुळे पुढील गंभीर संकटे निर्माण झाली आहेत. एका बाजूला काही भागांत जून-जुलै महिन्यांमध्ये अपेक्षित पाऊस होत नाही. त्यामुळे खरीप पिकांची पेरणी होऊ शकत नाही किंवा केलेली पेरणी वाया जाते. जमिनीत दमटपणा नसल्यामुळे पिके निघत नाहीत. दुसऱ्या बाजूला, ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यांत एकाच आठवड्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी पाऊस पडतो. परिणामी, शेतात पाणी साचते, पिके सडतात, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ज्या ठिकाणी पाऊस कमी आहे तिथे पाण्याची तीव्र टंचाई आहे. जलसाठ्यांमध्ये पाणी कमी असून, सध्या राज्यातील अनेक गावांत विहिरी आटल्यात. काही भागात महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागते. शेतकरी पीक विमा घेतात, पण नुकसान झाल्यावर तेव्हा त्यांना वेळेवर किंवा योग्य भरपाई मिळत नाही. अनेक वेळा विमा कंपन्यांची टाळाटाळ, प्रशासनाची उदासीनता आणि दस्तावेजातील त्रुटी यामुळे शेतकऱ्यांना कायदेशीर लढाया कराव्या लागतात. बहुतेक शेतकऱ्यांचे उत्पन्न शेतीपुरते मर्यादित आहे. दुसऱ्या कोणत्याही उत्पन्न स्रोताचा अभाव असल्यामुळे दुष्काळ किंवा पूर यामुळे ते पूर्णपणे आर्थिक संकटात सापडतात. यामुळे आत्महत्यांचे प्रमाणही वाढते.

जगबुडीच्या भविष्यवाण्या आणि भेंडवळ परंपरेवर विश्वास ठेवणारे लोक विज्ञानाच्या नजरेत अंधश्रद्धाळू ठरतात. मात्र हे वास्तव नाकारून चालणार नाही की सामाजिक मानसशास्त्रात अशा परंपरांचा खोल परिणाम होतो. संकटाच्या काळात लोक मार्गदर्शन व आधारासाठी अशा परंपरांकडे वळतात. दुसरीकडे, विज्ञान स्पष्टपणे सांगतं की पर्यावरणीय असमतोल, अति लोकसंख्या, प्रदूषण हे पृथ्वीवरच्या नैसर्गिक आपत्तींसाठी जबाबदार घटक आहेत. शाश्वत शेतीची दिशा, नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती, मिश्र शेती अशा पद्धतींना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. जगबुडी, महायुद्ध किंवा पर्यावरणीय संकट ही फक्त भविष्यवाणी नाही, तर मानवाच्या वर्तनाचा वाईट परिणाम आहे. विज्ञान, शाश्वतता, आणि परंपरेतील शहाणपण यांचा समन्वय साधूनच आपण सुरक्षित संतुलित भविष्याकडे जाऊ शकतो.

९८८१७१७८२८

## वाचक पत्रे

### काँग्रेसने 'आंतरराष्ट्रीय' व्हावे

भारतात काँग्रेस पक्ष सर्वांत जुना आहे. साठ वर्षे देशावर राज्य केले आणि स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसच्याच नेत्यांचे योगदान होते असे ते सांगत असतात. अशा विशाल पक्षाने आता खरे तर राष्ट्रीय न राहता आंतरराष्ट्रीय व्हायला हवे. काँग्रेसजवळ मजबूत नेतृत्व करणारे नेते आहेत, वरचेवर माध्यमांसमोर जाऊन जबरदस्त विधान करणारे आक्रमक नेते आहेत शिवाय राहुलबाबासारखे उच्चशिक्षित व सर्व कामात तरबेज म्हणजे गाडी रिपेअरिंग, फळे विकणे, ट्रक चालविणे वगैरे असा नेता आहे. शिवाय राहुल गांधी यांना आज जग बऱ्यापैकी ओळखू लागले आहे आणि जगाला त्यांच्यासारख्या नेत्यांची गरजपण आहे. आता उदाहरण द्यायचे झाल्यास तिकडे पाकिस्तानात बलुचिस्तान, खैबर पख्तुनवा येथे आजादीची लढाई सुरू आहे. काँग्रेस पक्षाला आजादी कशी मिळवायची याचा चांगलाच अनुभव आहे त्यामुळे त्यांनी पाकिस्तानात निवडणूक लढवली तर त्यांना हमखास यश मिळणार यात शंका नाही. शिवाय मणिशंकर अयर, दिग्विजयसिहग, कपिल सिब्बलसारखे हिंदुस्थानातील हालचावींवर गरळ ओकणारे प्रखर नेते प्रचारासाठी आहेच. भारतात कोणीही केव्हाही यावे अशी भावना ठेवणारे चन्नी साहेब आहेतच. त्यामुळे पाकिस्तानात विजय तर पक्का आहे. तसेच तिकडे कॅनडा, इंग्लड येथे खलिस्तान चळवळ चालविणारे नेते आहेत. त्यांनाही आजादी हवी आहे. तेव्हा त्यांना तेथेच आजादी मिळवून देण्याचे महान कार्य काँग्रेसच्या नशिबी असेल तर काय सांगता येते. अशा राष्ट्रीय पक्षाने आता आंतरराष्ट्रीय झेप घेण्याची वेळ आली आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

●● ●●

### लढाऊवृत्ती कायम ठेवणे आवश्यक

पहलगाममध्ये पाकिस्तानी अतिरेक्यांनी २६ हिंदूंची धार्मिक क्रूरतेतून हत्या केली. या घटनेचे विश्लेषण अनेक अंगांनी केले जाते. हिंदू समाज क्षात्रतेज विसरत चालला असल्याचे अनेकदा जाणवते. क्षात्रतेजाची प्रेरणा प्राप्त व्हावी अशी अनेक उदाहरणे आपल्याला माहीत असूनही प्रत्यक्ष जीवनात त्याचा अंगीकार अभावानेच होताना दिसतो. लवकुश या दोन बालकांनी लक्ष्मणासारख्या योद्ध्याला मूर्च्छित केले. अभिमन्यूसारखा बालक त्याचे काका युधिष्ठिर यांना चक्रव्यूह भेदण्यासाठी रणांगणात जाण्याची परवानगी मागतो. आदिलशाही, मोगल यांची जुलमी राजवट असतानाही छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्याची शपथ घेतात. अहल्यादेवी होळकर यांचे यजमान युद्धात कामी आले असतानाही शोक करीत न बसता शत्रूला परास्त करण्यासाठी कंबर कसतात. झाशीची राणी लक्ष्मीबाई कोवळ्या वयाच्या पुत्राला पाठीशी बांधून झाशी किल्ल्याच्या तटावरून घोड्यासह उडी घेते. हुतात्मा भगतसिंह, राजगुरू, चंद्रशेखर आझाद, चाफेकर बंधू या सशस्त्र क्रांतिकारकांना त्याच्या कृतीचे परिणाम माहीत असतात. राष्ट्र सर्वोपरी मानणे आणि स्वतःचा जीव दुय्यम मानणे ही भूमिका क्षात्रतेज निर्माण करणारी ठरते.

अतिशय प्रेरणादायी इतिहास, देशाप्रति तन, मन, धन आणि प्राण अर्पण करणारे महात्मे माहीत असूनही अनेक भारतीयांना रणांगण तर सोडाच खेळाच्या मैदानाचाही परिचय नाही अशी स्थिती आहे. भारतीय लष्करातील जवान, अधिकारी स्वतःच्या मरणाला भीत नाहीत म्हणून त्यांचे क्षात्रतेज टिकून आहे. परमवीरचक्र, महावीरचक्र सन्मानित योद्ध्यांचे चरित्र अभ्यासले तर त्यांनी जीवाची पर्वा केली नाही हे समानसूत्र सापडते. अनेक भारतीयांना परीक्षेतील गुणांची टक्केवारी महत्त्वाची वाटते, अनेकांना खूप पैसे संग्रही असावे असे वाटते तर अनेकांना आरोग्यविमा सारख्या बाबी महत्त्वाच्या वाटतात.

काळ बदलत आहे. अतिरेक्यांची विध्वसंकवृत्ती नवे स्वरूप धारण करीत आहे. एकेकाळी अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगलादेश हे अखंड हिंदुस्थानचा भाग होते आणि भविष्यात तिथे हिंदू नामशेष होतील असे सध्याचे चित्र आहे. आपण या सर्व घटनांचा अभ्यास करून मैदानी खेळ खेळणे, शरीर बलदंड करणे, चपळता वाढविणे यावर भर दिला तरच आपले भविष्य उज्ज्वल राहू शकेल. क्षात्रतेजाचा विसर हा आपल्या अस्तित्वाशी निगडित आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**/९४२२२१५३४३

### सुखी राहण्याचे काही उपाय

आपल्या उत्पन्नावर पहिला आपला हक्क. मस्त मजा करावी, आरोग्याकडे लक्ष असावे, नियमित व्यायाम करावा. मनातील सुख-दुःख हितचिंतकांनाच सांगावे. अन्यथा चांगल्या दुधात मिठाचा खडा पडल्यासारखे होईल. जवळील पैसे कुणालाही कधीही देऊ नये. जोवर जवळ पैसे आहेत, तोवरच सर्व विचारतील. उंच इमारती पाहून विनाकारण दुःखी होऊ नका. सुख आणि दुःख हे सोबतच येते आणि जातेदेखील. नेहमी मनमोकळ्या गप्पा मारा, झोपेतून उठल्यावर आणि झोपताना ईश्वराचे स्मरण करा. विचारल्याशिवाय कुणालाच सल्ला देऊ नका. कारण कुणालाच त्याची गरज नसते. शेवटी सांगायचे म्हणजे मनातील काही गुपिते कुणालाच सांगू नका.

**लक्ष्मण कुऱ्हेकर**/९५४५११२६४६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### आपुलकी बेघर निवारा केंद्रात बसव जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर महानगरपालिका व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान अंतर्गत आपुलकी बेघर निवारा केंद्र, कुमठा नाका क्रीडा संकुल मागे सोलापूर येथे जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती निमित्त जागतिक लिंगायत सम ाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे, सेवानिवृत्त एस आर पी पोलीस सिद्धेश्वर गुरुभेटी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी भीम क्रांती संघटनेचे अध्यक्ष रुद्राप्पा कांबळे, सोलापूर म हानगरपालिका समुदाय संघटन वसीम शेख, राहुल धिमधिमे, जीवन सोनवणे, इफ्तार शेख, व्यवस्थापक अशोक वाघमारे, धर्मा कांबळे, सत्यनारायण मूर्ती, दिलशाद शेख, शक्ती जाधव, राजू गदग, रगडे मामा, राघवेंद्र बोरकर आदी उपस्थित होते. यावेळी गरीब व निराधार लोकांना खाऊवाटप केले तसेच सिद्धेश्वर गुरुभेट्टी यांनी एक महिन्याचे राशन देऊन दासोह केले. महात्मा बसवेश्वर जयंती आपुलकी बेघर निवारा केंद्रातील गरीब व निराधार लोकांसोबत आनंदी व उत्साहात साजरा करण्यात आले.



# चांगला माणूस बनणे महत्त्वाचे : महसूल आयुक्त डॉ. गेडाम

## विवेकानंद केंद्राचे प्रांत संस्कार वर्ग प्रशिक्षण शिबिर सुरू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

जीवनात कोणत्याही क्षेत्रात केवळ उच्चपदस्थ होणे उपयोगाचे नाही, तर चांगला माणूस बनणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन नाशिकचे विभागीय महसूल आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी केले.

शुक्रवारी (ता. २) विवेकानंद केंद्र कन्याकुमारी महाराष्ट्र प्रांताच्या वतीने केंद्राच्या पिंपळद (त्र्यंबकेश्वर) येथील सेवा व प्रशिक्षण प्रकल्पात आयोजित प्रांत संस्कार वर्ग प्रशिक्षण शिबिराची डॉ. गेडाम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सुरवात झाली. यावेळी ते बोलत होते. युवकांनी स्वामी विवेकानंदांना अपेक्षित भारत घडविण्यासाठी चारित्र्यसंपन्नता प्राप्त करावी, असे आवाहन डॉ. गेडाम यांनी केले. त्यांचा केंद्राचे प्रांत सहसंचालक अरूण जोशी यांच्या हस्ते स्वामी विवेकानंदांची प्रतिमा व ग्रंथ संपदा देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रांत कार्यपद्धती व शिबिर प्रमुख मदगोंडा पुजारी, प्रांत प्रमुख अभय बापट, संघटक सुजाता दळवी, सहसंघटक सुमीत शिवहरे, देवगिरी विभागाचे संचालक प्रा. डॉ. विश्वास देवकर यांची प्रमुख उपस्थिती होती. विवेकानंद केंद्र देशभरात मनुष्यनिर्माणातून राष्ट्र पुनरुत्थानासाठी संस्कार वर्ग चालविते. संस्कार वर्ग चालविणारे शिक्षक घडविण्यासाठी हे शिबिर घेतले जात आहे. सात मे पर्यंत हे शिबिर चालणार आहे.

या शिबिरात मुलांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनात्मक व आध्यात्मिक या पंचस्तरीय विकासासाठी पहाटे पाच ते रात्री १० या वेळेत प्रार्थना, सूर्यनमस्कार, योगासने, बौद्धिक सत्र, चर्चासत्र, नैपुण्यवर्ग, खेळ व भजन संध्या अशा उपक्रमांची रचना केली आहे. तसेच भारत माता पूजन व आरती होणार असून सर्व विद्यार्थी हे याठिकाणी मोबाईलविना राहणार आहेत.

### २१७ मुलांचा सहभाग

प्रास्ताविकात शिबिर प्रमुख मदगोंडा पुजारी म्हणाले, मुलांमध्ये नेतृत्वगुण रुजवतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे हा शिबिराचा उद्देश आहे. या शिबिरानंतर ते संस्कार वर्ग शिक्षक म्हणून प्रत्यक्ष नेतृत्व करणार आहेत. यात महाराष्ट्र आणि गोवा प्रांतातील २२ जिल्ह्यांमधील २१७ मुले सहभागी झाली आहेत.

# जिल्ह्यात पाच कृषी पर्यटन केंद्रांच्या उभारणीसाठी १५ मे पर्यंत अर्ज करा

**सोलापूर, दि. ५ मे-**

जिल्हा प्रशासन व प्रकल्प संचालक (आत्मा), सोलापूर कार्यालयाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यांतर्गत, जिल्ह्यातील स्थानिक संस्थांच्या माध्यमातून एकूण ५ पथदर्शी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी १५ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर यांनी केले आहे.

ही प्रस्तावित कृषी पर्यटन केंद्रे पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी आणि करमाळा या ४ प्रमुख मंदिरांच्या परिसरात प्रत्येकी एक केंद्र, तसेच उजनी धरणाच्या जलाशयालगतच्या गावात एक केंद्र उभारणे अभिप्रेत आहे. ही केंद्रे संबंधित मंदिराच्या सुमारे १० कि.मी. त्रिज्येतील मुख्य रस्त्यालगत किंवा जवळच्या ठिकाणी असावीत. उजनीच्या बाबतीत जलाशयालगतच्या गावांमध्ये स्थळ असावे. प्राप्त अर्जांवर जिल्हास्तरीय तांत्रिक समितीमार्फत ठरवलेल्या निकषानुसार निवड केली जाईल.

अर्ज व इतर अनुषांगिक माहिती प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालय नवीन आरटीओ ऑफिसच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर येथे उपलब्ध असणार आहे. फुटाणे विक्रम मो. ९४२३२३२५६९ यांच्या कडून प्राप्त करून घ्यावा.


## अुत्तम सेवा — मंगळवार दि. ६ मे २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **सोलापूर महानगरपालिका, सोलापूर** | | | |
| १ | परिचारीका (१८ पदे) | दहावी व ANM नर्सिंग कोर्स उत्तीर्ण | ५९ पर्यंत | ०९/०५/२५ |
| २ | अधिपरिचारीका (०७ पदे) | बारावी व GNM नर्सिंग कोर्स उत्तीर्ण | ५९ पर्यंत | |
| ३ | फार्मासिस्ट (०२ पदे) | पदवी/पदविका (फार्मासी) उत्तीर्ण | ५९ पर्यंत | |
| ४ | MPW पुरुष (०५ पदे) | बारावी व आरोग्य निरीक्षक कोर्स | ५९ पर्यंत | |
| **२)** | **शासकीय महाविद्यालय नांदेड** | | | |
| १ | गट-ड (६९ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १६/०५/२५ |
| २ | प्रयोगशाळा परिचर (१७ पदे) | सातवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | |
| **३)** | **बँक ऑफ बडौदा, BOB** | | | |
| | शिपाई (५०० पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २६ पर्यंत | २३/०५/२५ |
| **४)** | **नोंदणी व मुद्रांक विभाग पुणे** | | | |
| | शिपाई (२८४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | १०/०५/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **५)** | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| | वाहन चालक (११ पदे) | दहावी व हलके मोटार वाहन परवाना व ३ वर्षे अनुभव असावा | ३८ पर्यंत | ०९/०५/२५ |
| **६)** | **नवी मुंबई महानगरपालिका** | | | |
| १ | स्टाफ नर्स (१३१ पदे) | GNM/B.Sc (नर्सिंग) उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ११/०५/२५ |
| २ | लिपीक (१३५ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ३ | लेखा लिपीक (५८ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग | ३८ पर्यंत | |
| ४ | परिचारिका (३८ पदे) | दहावी व ANM कोर्स उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| ५ | औषध निर्माता (१२ पदे) | पदवी (फार्मासी) व अनुभव असावा | ३८ पर्यंत | |
| **७)** | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | असि. लोको पायलट (९९७० पदे) | पदवी/पदविका (मेकॅ/इले/इलेक्ट्रॉ / ऑटो) अभियांत्रिकी उत्तीर्ण किंवा ITI (इले / फिटर / इन्स्ट्रु / टर्नर /रेडिओ /इलेक्ट्रॉ/मोटार/वायरमन/ट्रॅक्टर/ डिझेल/मशिनीस्ट/ए. सी.) उत्तीर्ण | ३० पर्यंत | ११/०५/२५ |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org


# धाराशिवच्या दत्तात्रय चौरे यांचा आदर्श अमृत महोत्सव सोहळा उत्साहात

**घरी शिक्षणाची परंपरा नसतानाही इतराचे आधाराने शिक्षण पुर्ण करुन दत्तात्रय दिगंबर चौरे यांनी शासकिय सेवेत प्रवेश केला. ३३ वर्षांपेक्षा जास्त शासकीय सेवेत इमाने इतबारे कोणताही डाग लागू न देता कामकाज करत असताना इतरांना कसे सहकार्य करता येईल, सम ाजासाठी आपण काही तरी देणे लागतो या भावनेने अखंडपणे कार्यरत राहिले. श्री.चौरे हे मुळचे धाराशिव तालुक्यातील राघुचीवाडी येथील रहिवाशी. नुकताच त्यांचा अमृत अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**

दत्तात्रय चौरे यांचा जन्म १४ एप्रिल १९५० रोजी राघुचीवाडी येथे सामन्य कुटूंबात झाला. ते धनगर कुटूंबातील असल्याने परिस्थिती अगदीच बेताची, प्राथमिक शिक्षण राघुचीवाडी येथे झाले. त्यापुढील माध्यमिक शिक्षण राघुचीवाडी ते धाराशिव पायी येणे जाणे करुन केले. इयत्ता ८ वी त शिकत असताना डॉ. श्री. श्रीराम जिंतुरकर यांचे वडील कै. ॲड. दिगंबरराव जिंतुरकर हे प्रसिध्द विधिज्ञ व थोर स्वातंत्र्य सेनानी यांनी आश्रय दिला. पुढील शिक्षण श्रीपतराव भोसले हायस्कुल व आर.पी. कॉलेज येथे झाले. ते १९७४ साली सहकार खात्यामध्ये क्लार्क म्हणुन दाखल झाले. ३३ वर्षांपेक्षा जास्त वर्षे निष्कलंक सेवा करुन मुख्य लिपिक पदावरून सेवानिवृत्त झाले. सेवा कालावधीमध्ये त्यांना सहकार अधिकारी कै. प्रभाकरराव इर्लेकर यांचे ही मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखुन आपल्या ८ वी पास पत्नीस लग्नानंतर दहावी व मुक्त विद्यापीठातून बी.ए. पर्यंत शिक्षण देऊन एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात सुपरवायझर पदापर्यंत पोहचवले. आपल्या तिन्हीही मुलांना गुणवत्तेच्या बळावर उच्च शिक्षित करुन मोठा मुलगा दादासाहेब यास संरक्षण विभागात शास्त्रज्ञ, दुसरा मुलगा धनंजय अभियंता असुन बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत तर तिसरा मुलगा डॉ.दयानंद चौरे धाराशिव शहराम ध्ये पोटविकार तज्ञ व सर्जन म्हणुन प्रसिध्दच आहे. आपल्या मुला बरोबर त्यांनी आई वडीलाचे लहानपणीच छत्र हारवलेल्या साडुच्या मुलासही उच्च शिक्षित केले. तो संदिप गवळी सध्या बहुराष्ट्रीय नामांकित कंपनीमध्ये फ ुड मॅनेजर म्हणुन व्हियतनाम येथे कार्यरत आहे. वानप्रस्त अवस्थेत आपणही कुटूंब व समाज यांचे सोबत राहुन समाजाचे ऋण व्यक्त करण्यासाठी १९६८ पासुन आजतागायत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद या म ाध्यमातून कार्यरत आहेत. त्यांनी सात वर्ष विश्व हिंदू परिषदेचे धाराशिद जिल्हाध्यक्ष म्हणुन यशस्वी जबाबदारी पार पाडली आहे. सध्या त्यांच्याकडे देवगिरी प्रांत सेवा विभाग कार्यकारी चमुचे सदस्यांची जबाबदारी



आहे. मुलांच्या आग्रहातुन दिनांक १४ एप्रिल रोजी त्यांचा अमृत अभिष्टचिंतन कार्यक्रम पार पाडला. यावेळी ह.भ.प.श्री. पांडुरंगराव लोमटे महाराज, श्री. बाबुराव पुजारी महाराज, ॲड. श्री. खंडेराव चौरे व छत्रपती प्राथमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक श्री.शिंदे यांनी श्री. चौरे यांच्या कार्यालयाचे केले.

मा.श्री.गोविंद देव गिरी म हाराजाकडुन अयोध्येवरुन प्रसाद राम जन्म भुमी ट्रस्टचे कोषाध्यक्ष श्री.गोविंद देव गिरी महाराज यांनी श्री.चौरे व विश्व हिंदु परिषदेचे जेष्ठ कार्यकर्ते ह.भ.प.श्री.बाबुराव पुजारी यांना शिवप्रताप ग्रंथ भेट दिला होता. त्यांचे श्री.चौरे यांनी दोन वेळा पारायण केले व याच प्रेरणेतून छत्रपती शिवाजी महाराजाचे जिवन चरित्र इतर मान्यवरांना वाचता यावे म्हणुन अमृत अभिष्ट चिंतन सोहळ्यात शिव प्रताप ग्रंथ व आपली संस्कृती ग्रंथ व शाल भेट म्हणुन दिले. या सोहळ्याची माहिती मिळताच श्री. गोविंद देव गिरी महाराजानी त्यांचे शिष्य ह.भ.प.श्री. निलेशजी झरेगावकर यांच्याजवळ रामजन्मभुमीचा प्रसाद पाठवून दिला तो या आनंदमय प्रसंगी श्री.झरेगावकर महाराजानी समक्ष श्री.चौरे यांना दिला.

तसेच श्री.चौरे कुटुंबियानी अमृत अभिष्टचिंतन कार्यक्रमात केक अथवा इतर पश्चिमात्य संस्कृतीचे अनुकरण न करता ७५ दिव्यांनी औक्षण करून आपली संस्कृती जोपासली. या अमृत महोत्सवाचे प्रसंगी आपले विचार मांडताना मा.बाबुराव पुजारी यांनी असे म्हटले की, राजा दशरथच्या सुना प्रमाणेच दत्तात्रय चौरे यांना ४ सुना खालीलप्रमाणे आहेत. १ ) सौ. सारीका बी.एस.सी.एम.बी.ए. मार्केटिंग उत्तम गृहिणी २) सौ. क्षितिजा आयटी मध्ये एमटेक करून कंपनीमध्ये कार्यरत ३) डॉ. सौ. प्रियंका आयुर्वेदा मध्ये एम. डी. ( त्वचा व आहार तज्ञ ) ४ ) सौ.वैशाली गवळी एम. एस.सी. कॉम्प्युटर कंपनीमध्ये कार्यरत या वरील सुना उच्च शिक्षित श्री.चौरे यांना मिळाल्या असून त्या सासु-सास आई वडीलाप्रमाणे वागणुक देतात . एवढेच नव्हेतर बहुतांश उच्च शिक्षित समजले जाणारे यांना धार्मिक संस्कारीत गोष्टी आवडत नाहीत . परंतु सदरच्या चौरे कुटूंबात त्या सुना घराण्याची धार्मिक परंपरा जपतात . एवढेच नव्हे त्या सुनानी आपल्या मुला मुलींना घरात गायनाच्या मास्तर मार्फत भजन शिकविले जाते त्यामुळे चौरे यांचे घरातील वातावरण मंदिरसमान दिसते . म्हणुनच संत तुकोबारायांनी म्हटले आहे की कुळी कन्या पुत्र होते जे सात्वीक तयाचा हरीक वाटे देवा या संत वचनाप्रमाणे चारे यांच कुटुंबिय धन्य आहेत . शेवटी श्री चौरे यांनी मनोगत व्यक्त करताना त्यानी त्यांच्या कुटूंबाचे व मुलांच्या शैक्षणिक प्रगती बद्दल बोलताना सांगितले की माणसाच्या जिवनामध्ये योग्य मार्गदर्शन मिळाले तर स्वतः बरोबर कुटूंबाचीही योग्य दिशेने प्रगती होते . त्याप्रमाणे त्याचे प्रगतीमधील मार्गदर्शक के . ॲड . दिगंबरराव जिंतुरकर कुटुंबियाकडुन आधार मार्गदर्शन व प्रोत्साहन तर के . अँड . वासुदेवराव शहापूरकर यांचेकडुन नियमितपणा सातत्य व मा . श्री . एम . डी . देशमुख सर छत्रपती हायस्कुलचे माजी मुख्याध्यापक यांचे एक वाक्य कायम आठवणीत आहे ते म्हणजे वर्गामध्ये नेहमी सांगायचे की घडी गेली की पिढी गेली त्यानुसार वेळेचे महत्व मिळाले . या तिन्हीही मान्यवरांकडुन मि ळालेल्या अमुल्य मार्गदर्शनाच्या जोरावर व यांचे तंतोतंत पालन केल्यामुळेच माझे कुटूंबाची व म ुलांची यशोगाथा दडलेली आहे. असे सांगुन वरील मार्गदर्शकाचे सोहळयास हजर राहुन आशीर्वाद दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानून धन्यवाद ही दिले.

**शब्दांकन : बाबुराव पजारी**

## ऋतिक व राकेश पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र

**सोलापूर, दि. ५ मे-**

एक्सॉनमोबिल ल्युब्रिकण्ट्स प्रा. लि. या भारतातील मोबिल ब्रॅण्डेड ल्युब्रिकण्ट्सची विक्री करणाऱ्या एक्सॉनमोबिल सहयोगी कंपनीने नवीन जाहिरातीच्या लाँचची घोषणा केली. यात बॉलिवुड आयकॉन ऋतिक रोशन आणि त्याचे वडिल भारतीय चित्रपट निर्माते व दिग्दर्शक राकेश रोशन पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र आले आहेत. यात जगातील आघाडीचा सिन्थेटिक इंजिन ऑईल ब्रँड मोबिल १वर विशेष प्रकाश टाकण्यात आला आहे.


### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमलेली तारीख १२/६/२०२५
दि. कि.अ. नं. ५६/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज जुनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

१. **कमल बापुराव उर्फ भैरू घोडके,** वय- ७५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. रूई, ता. बार्शी जि. सोलापूर
२. **लक्ष्मण बापुराव उर्फ भैरू घोडके,** वय- ६० वर्षे, धंदा - शेती, रा. रूई, ता. बार्शी जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** --- **सा.वाला**

ज्याअर्थ अर्जदार नं.१ व २ हे आई व मुलगा आहे अर्जदार नं.१ चे मयत पती बापुराव उर्फ भैरू प्रल्हाद घोडके आहेत अर्जदार नं.२ यांचे वडील म्हणजे अर्जदार नं.१ चे पती आहेत. अर्जदार नं.२ चे वडील व अर्जदार नं.१ चे पती हे दिनांक २०/११/२००९ रोजी चार्शी येथे मयत झालेले आहेत. हे की अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामकाजाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्र.१ व २ हे मयत बापुराव उर्फ भैरू प्रल्हाद घोडके यांचे कायदेशीर वारस असल्याचे घेषित होऊन वारस प्रमाणपत्राची मागणीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचया वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दी करण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली ता.१२/०६/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितीगार वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील योग्य ते आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख ०२/०५/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

### जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने, आमचे अशिलांतर्फे खाली सही करणार यांजकडून कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : जिल्हा व उप जिल्हा सोलापूर पैकी, तालुका अक्कलकोट पैकी, मौजे डोंबरजवळगे ग्रामपंचायत हद्दीतील बागायत शेतजमीन, यांसी जूना सर्व्हे नंबर- १३९, यांसी नवीन गट नंबर- ३०८, यांसी एकूण क्षेत्र ११ हेक्टर १५ आर, पोटखराब हेक्टर १ हेक्टर १ आर, असे एकूण मिळून १२ हेक्टर १६ आर अर्थात ३० एकर १६ आर. क्षेत्राची शेतजमीन, यांसी आकार रु. १३.०५ पैसे, असे वर्णन असलेली शेतजमीन, यांसी चतुःसिमा : पूर्वेस : गट नंबर ३११, दक्षिणेस : गट नं. १४०/२, पश्चिमेसः गट नंबर ३०४, ३००, २९९, २९८, २९७ व २९६, उत्तरेस : गट नंबर ३०५, ३०६ व ३०७, येणेप्रमाणे चतुःसिमेतील शेतजमीन व त्यातील तदंगभूत वस्तुसह. तसेच सदर शेतजमीनीत एक चालू पाण्याची विहीर असून त्यावर एक ऑईल इंजीनचे संपूर्ण हक्कासह.

वर वर्णन केलेली शेतजमीन ही वडिलार्जित आहे. सदर शेतजमीन ही दिनांक १३/०७/१९५९ रोजी आमचे अशिल श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर, रा. मु. पो. डोंबरजवळगे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांचे पणजोबा श्री. सिद्राम महादू कोकणे यांनी नोंदणीकृत खरेदीखत क्र. ६५९/१९५९ ने खरेदी घेतली. खरेदीचे तारखेपासून सदर शेतजमीनीवर श्री. सिद्राम महादु कोकणे यांचा कब्जा होता व वहिवाट मालकी हक्काने होती, त्यांचे मृत्युपश्चात सदर शेतजमीनीमध्ये आमचे अशिल श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर यांचा व इतर सर्व संबंधित वारसदारांचा अविभक्त हिस्सा आहे. असे असताना सुधाकर नरसिंह कटकधोंड, डी/५, एव्हरेस्ट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, ब्लॉक नं. ३०९, गोल्डन पार्क, बेतुरकर पाडा, कल्याण (पश्चिम), ठाणे याने दि. १४/११/२०१३ रोजी अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे वर नमूद शेतजमीनीबाबत बक्षीसपत्र म्हणविणारा दस्त करुन घेतल्याचे आमचे अशिलांना प्रथमतः दि. ११/०३/२०२५ रोजी समजले. आमचे अशिल श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर यांनी वर नमूद चतुःसिमेतील वर्णनाच्या शेतजमीनीतील त्यांचा अविभक्त हिस्सा पृथक करुन त्याचा प्रत्यक्ष कब्जा मिळणेसाठी व उपरोक्त नमूद बक्षीसपत्र हे रद्दबातल व बेकायदेशीर असल्याबाबत ठरवून मिळावे, निरंतरचे ताकीद देवविणेसाठी व दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून व कब्जा पृथक होवून कब्जा मिळावा, या सर्व मागणीसाठी सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, यांचे न्यायालयात स्पे. मु.नं. २४२/२०२५ चा दावा केला आहे. त्यामध्ये आमचे अशील श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर हे वादी आहेत तर सुधाकर नरसिंह कटकधोंड इतर ३१ प्रतिवादी आहेत.

तरी, सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद चतुःसिमेतील शेतजमीनीबाबत सुधाकर नरसिंह कटकधोंड यांचे बरोबर कोणत्याही प्रकारे करार-मदार, वा अव्य इतर मार्गाने व्यवहार करु नयेत. याउपर, सुधाकर नरसिंह कटकधोंड याचे बरोबर कोणीही व्यवहार केल्यास अगर करार केल्यास ते सर्व व्यवहार सदर शेतजमीनीत असलेले आमचे अशिल श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर यांचे अविभक्त हिस्स्यावर मुळीच बंधनकारक होणार नाहीत, याची नोंद घ्यावी. कळावे. ही जाहीर नोटीस दिली तारीख : ०६/०५/२०२५.

**सही/-**
**अशिल**
**श्री. देवेंद्र दशरथ नारायणकर**
**रा. मु. पो. डोंबरजवळगे,**
**ता. अक्कलकोट, जि. सोलापूर**

**सही/-**
**अशिलांतर्फे ॲडव्होकेट,**
**ॲड. लक्ष्मीकांत वसंत काटकर**
**बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट.**
**रा. प्लॉट नं. ८, लक्ष्मी नगर, जानकी नगरचे मागे, जूळे सोलापूर, सोलापूर- ४१३००८.**
**मो. नं. ९८८१०९३२०९**

### सोलापूर जनता सहकारी बँक लि.,सोलापूर
SJSB
Solapur Janata Sahakari Bank Ltd.,Solapur
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप.बँक — Multi-State Scheduled Coop.Bank
मुख्य कार्यालय Head Office | 'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, 'Gaganbharari' Shivsmarak Sankul, Goldfinch Peth, सोलापूर Solapur 413 007 फोन क्र. Ph. No. : 0217- 274 1100 ते to 06 Visit us : www. sjsbbank.com

**टेंडर नोटीस**

**सोलापूर जनता सहकारी बँक लि. तर्फे २०० संगणक खरेदीसाठी निविदा मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी सोलापूर जनता सहकारी बँकेच्या http://www.sjsbbank.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. ९४/२०२४
नि.नं.५

**बार्शी येथील मे.सि.ज. ज्यु. डि.साहेब यांचे कोर्टात**

३) **श्री. श्रीकांत देवदत्त गोरे,** वय- ३६ वर्षे, धंदा- शेती, रा. आगळगांव ता. बार्शी जि. सोलापूर
४) **सौ. कांचन हनुमंत पवार,** वय- ३८ वर्षे, धंदा- घरकाम रा. पंढरपुर ता. पंढरपूर जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** --- **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ व २ यांचे वडिल देवदत्त तुकाराम गोरे हे दि. १६/०२/२०२१ रोजी मयत झाले तसेच आई निर्मला देवदत्त गोरे या दि. ०३/०४/२०१४ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत देवदत्त तुकाराम गोरे व मयत आई निर्मला देवदत्त गोरे यांचे अर्जदार नं. १ व २ हे जवळचे व कायदेशीर वारस आहेत, त्यांचे शिवाय मयतास अन्य कोणीही वारस नव्हते व नाहीत. अर्जदार यांना मयत देवदत्त तुकाराम गोरे व मयत निर्मला देवदत्त गोरे यांचे पश्चात मिळणारे भविष्यातील सर्व लाभ वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार हे मयत देवदत्त तुकाराम गोरे व मयत निर्मला देवदत्त गोरे यांचे कायदेशीर वारस आहेत असे ठरवुन जाहीर होवून मिळणे साठी यातील अर्जदार यांनी सदरील मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार नं. १ व २ यांचे शिवाय मयत देवदत्त तुकाराम गोरे व मयत निर्मला देवदत्त गोरे यांचेशी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १२/०६/२०२५ रोजी या कामी मे कोटांत सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत धावी अथवा कोणाचेही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदरील मयत देवदत्त तुकाराम गोरे व मयत निर्मला देवदत्त गोरे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २२/०४/२०२४

**सही/-**
**क.लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**सार्वजनिक आरोग्य अभियंता - जलवितरण विभाग**

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेकडील विभागीय कार्यालय क्र.३ कडील प्रभागातील दुषित पाणी पुरवठा सुधारणे कामी नव्याने पाईप लाईन टाकणे करीता नागरी दलितेत्तर सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत कामाचे ई-निविदा बाबत.

**1) Tender ID : 2025_SMC_1177128_1**
**2) Tender ID : 2025_SMC_1177156_1**
**3) Tender ID : 2025_SMC_1177173_1**
**4) Tender ID : 2025_SMC_1177183_1**

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०६/०५/२०२५ सकाळी १०.०० वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

**सही/-**
**प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील म्यु.पल. हद्दीतील विभाग **क्र. ३८ मधील मिळकत गट नं. ११७७/३ यापैकी बिनशेती प्लॉट नं. ४ याचे क्षेत्रफळ चौ.मी. ९५.१५ आहे. याचा विनशेती आकार ६२ रु. ०० पैसे आहे याचे मोजमाप पूर्व बाजू मी ७.८८, दक्षिण बाजू मी. ११.९५, पश्चिम बाजू मी ८.१५ व उत्तर बाजू मी ११.८६ आहे. यासी चर्तुः सिमा पूर्वेस-प्लॉट नं. ३, दक्षिणेस स.ग.नं. पैकी क्षेत्र, पश्चिमेस ९ मी रुंदीचा रस्ता व उत्तरेस प्लॉट नं. ५ याची पाणी व वागणुक पश्चिम रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे मिळकत आतील तदंगभुत वस्तुसह.**

यात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही संगिता गोकुळ जाधव यांचे मालकी वहिवाटीची असून सदर प्लॉट मालकांनी सदरची मिळकत आमचे अशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून तशी बोलणी करुन तसा लेखी ठराव केलेला आहे. सदर प्लॉट निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

तरी सदर प्लॉटबाबत अन्य कोणाचे गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, ॲटेचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क अधिकार हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसाचे मुदतीत खालीलपत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत दयावी. मुदतीत कोणाचीही कांहीही हरकत न आल्यास सदर प्लॉट हे निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर प्लॉट मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार करतील मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

**कळावे ही जाहीर नोटीस दिली, तारीख ०५/०५/२०२५.**

**सही/-**
**श्री. प्रशांत विश्वासराव शेटे (ॲडव्होकेट)**
**''राजगड'', आगळगांव रोड, बार्शी,**
**जि. सोलापूर-४१३४०१ मो.नं. ९८२२११४६६८**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### पर्व चौधरीला आयडब्ल्यूएफ स्पर्धेत कांस्य पदक



**नवी दिल्ली** :भारतीय वेटलिफ्टर पर्व चौधरीने येथे झालेल्या आयडब्ल्यूएफ युथ ॲण्ड ज्युनियर वर्ल्ड वेटलिफ्टिंग अजिंक्यपदमध्ये कांस्यपदक जिंकले. मुलांच्या युवा गटात ९६ किलो वजन गटात पर्वने एकूण ३१५ किलो वजन उचलले. त्याने स्नॅचमध्ये १४० किलो वजन उचलले. क्लीन ॲण्ड जर्कमध्ये त्याने १७५ किलो वजन उचलून कांस्यपदक जिंकले. चालू स्पर्धेत भारताचे हे तिसरे पदक आहे. गेल्या आठवड्यात ज्योत्स्ना साबर (४० किलो) आणि हर्षवर्धन साहू (४९ किलो) यांनीही आपापल्या वजन गटात कांस्यपदके जिंकली. ऑलिम्पिक खेळांप्रमाणे, जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत स्नॅच, क्लीन ॲण्ड जर्क आणि एकूण वजनासाठी वेगवेगळी पदके दिली जातात.

### मुलींचे लैंगिक शोषणप्रकरणी फुटबॉल प्रशिक्षकाला अटक

**नवी दिल्ली** : मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात एका फुटबॉल प्रशिक्षकाला त्याच्या अकादमीत प्रशिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे. प्रशिक्षकाने गेल्या काही महिन्यांत किमान ११ खेळाडूंचे लैंगिक शोषण केले. हीनगांग विधानसभा मतदारसंघातील अकादमीच्या बोर्डिंग सुविधेत राहणाऱ्या ११ अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप प्रशिक्षकावर आहे. या प्रकरणाबाबत पालक आणि स्थानिक लोकांमध्ये प्रचंड संताप आहे. पालकांच्या बैठकीत तरुण खेळाडूंनी त्यांच्या पालकांना प्रशिक्षकाच्या गैरवर्तनाबद्दल माहिती दिली तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. घटना समोर आल्यानंतर पालकांनी पोलिसांशी संपर्क साधला, त्यानंतर हीनगांग पोलिस ठाण्यात औपचारिक गुन्हा दाखल करण्यात आला. पालकांनी फुटबॉल अकादमीचा परवाना तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

### भारताकडून श्रीलंकेचा ५-०ने एकतर्फी पराभव

**बंगळुरू** : भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने पीडी दीपक लोहिया मेमोरियल ट्रॉफी पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत श्रीलंकेचा ५-० असा पराभव केला. पाच सामन्यांची मालिका २६ एप्रिल ते ५ मे दरम्यान किनी क्रिकेट मैदानावर खेळवण्यात आली. पाचव्या सामन्यात, भारताने प्रथम फलंदाजी करताना पाच गडी बाद १९१ धावा केल्या आणि श्रीलंकेला १५ षटकांत ८८ धावांवर गुंडाळले. भारताने पहिला सामना १०३ धावांनी, दुसरा सहा गड्यांनी, तिसरा तीन गड्यांनी आणि चौथा सामना ६६ धावांनी जिंकला. विजेत्या भारतीय संघाला २ लाख रुपये आणि श्रीलंकेला ५०,००० रुपये पुरस्कार स्वरूपात मिळाले.

### बिलियर्ड्समध्ये विजयाची पंकज अडवाणीची हॅट्ट्रिक

**मुंबई** : अव्वल क्यूइस्ट (बिलियर्ड्स आणि पूल) पंकज अडवाणीने संथ सुरुवातीवर अंतिम फेरीत ध्रुव सितवालाचा ५-२ असा पराभव केला आणि त्याचे तिसरे सीसीआय बिलियर्ड्स क्लासिक जेतेपद जिंकले. पंकजने सितवालाचा १०-१५०, १५०-१४८, ८१-१५०, १५०-९६, १५०-१३६, १५०-१४७, १५०-१३७ असा पराभव केला. रविवारी रात्री उशिरा खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्याच्या पहिल्या तीन फ्रेम्समध्ये अडवाणी त्याच्या सर्वोत्तम कामगिरीपासून खूप दूर होता, परंतु दुसऱ्या फ्रेममध्ये सितवालाने दिलेल्या संधींचा त्याने पुरेपूर वापर करून विजय नोंदवला. अडवाणीने चौथी फ्रेम जिंकून २-२ अशी बरोबरी साधली आणि वेग वाढवल्यानंतर खेळावर नियंत्रण मिळवले. त्याने पुढील तीन फ्रेम जिंकून विजय निश्चित केला आणि २.५ लाख रुपयांची बक्षीस रक्कम आपल्या नावावर केली. उपविजेत्या सितवालाला १.५ लाख रुपयांचे बक्षीस मिळाले. हा विजय माझ्यासाठी खास असल्याचे पंकज अडवाणीने सांगितले. त्याने यापूर्वी २०२३ आणि २०२४ मध्येही हे विजेतेपद जिंकले होते.

### मोहन बागान एसजीला नवीन खेळाडूंच्या नोंदणीस बंदी

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलियन स्ट्रायकर जेसन कमिंगच्या ट्रान्सफरशी संबंधित 'तांत्रिक त्रुटी'मुळे इंडियन सुपर लीग चॅम्पियन मोहन बागान सुपर जायंट्सवर नवीन खेळाडूंच्या नोंदणीवर देशभरात बंदी घालण्यात आली आहे. फिफाच्या (जागतिक फुटबॉल संघटना) न्यायिक संस्था संचालकांनी अखिल भारतीय फुटबॉल महासंघाला (एआयएफएफ) पाठवलेल्या अधिकृत पत्रव्यवहारानंतर ही घटना घडली. फिफाच्या पत्रव्यवहारात मोहन बागान सुपर जायंट या क्लबवर राष्ट्रीय स्तरावर नवीन खेळाडूंची नोंदणी करण्यापासून तात्काळ बंदी घालण्याची मागणी केली आहे.

# प्लेऑफसाठी मुंबई, गुजरात लढत

### दोन्ही संघ चुरशीच्या सामन्यासाठी सज्ज

◆ **मुंबई, ५ मे**

आयपीएलमध्ये मंगळवारी प्लेऑफचा फेव्हरिट मुंबई इंडियन्स गुजरात टायटन्सशी भिडणार आहे. फॉर्ममध्ये असलेल्या गुजरातच्या तीन अव्वल फलंदाजांसाठी एका जबरदस्त गोलंदाजीचा सामना करणे हे एक कठीण आव्हान असेल. सर्व संघांमध्ये सर्वोत्तम नेट रन रेट असलेल्या मुंबईला प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी उर्वरित तीनपैकी दोन सामने जिंकावे लागतील.

पाच वेळा विजेता असलेला मुंबई संघ यापैकी दोन सामने त्यांच्या घरच्या मैदानावर खेळेल. त्या मैदानावर त्यांनी पाचपैकी चार सामने जिंकले आहेत. चौथ्या क्रमांकावर असलेल्या गुजरातचे अजून चार सामने बाकी आहेत, त्यापैकी दोन अहमदाबादमध्ये खेळले जाणार आहेत. तेथे त्यांनी पाचपैकी चार सामने जिंकले आहेत.





शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघाला प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी आणखी दोन सामने जिंकावे लागतील. गुजरातचे बी साई सुदर्शन (५०४ धावा), जोस बटलर (४७०) आणि कर्णधार गिल (४६५) हे उत्तम फॉर्ममध्ये आहेत. त्यांना आता मुंबईच्या ट्रेंट बोल्ट (१६ बळी), हार्दिक पंड्या (१३), जसप्रीत बुमराह (११) आणि दीपक चहर (९ ) यांचा सामना करावा लागणार आहे. हे एक आव्हान असणार आहे.

मुंबई विजयी मार्गावर परतल्यापासून त्यांनी कोणत्याही सामन्यात विरोधी संघाला २०० पेक्षा जास्त धावा करू दिलेल्या नाहीत. खराब सुरुवातीनंतर सलग सहा सामने जिंकल्याने मुंबईचा आत्मविश्वास वाढला आहे. गुजरातच्या यशाचे गमक त्यांच्या फलंदाजांची कामगिरी आहे. दुसरीकडे, लक्ष्यांचा पाठलाग करताना गुजरातच्या उत्कृष्ट रेकॉर्डबद्दल मुंबईलाही चिंता असेल.

गुजरातने मोठ्या फरकाने लक्ष्याचा पाठलाग करताना तीन सामने जिंकले आहेत. गुजरातच्या पहिल्या तीन फलंदाजांच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे, इतर फलंदाजांची कसोटी लागलेली नाही. मधल्या फळीत शेरफेन रदरफोर्ड (२०१) ला काही संधी मिळाली आहे. मुंबईच्या गोलंदाजांचे लक्ष्य आता गुजरातच्या टॉप ऑर्डरला स्वस्तात बाद करणे असेल. तीन हंगामांपूर्वी, हार्दिकच्या नेतृत्वाखाली, गुजरातने पदार्पणातच आयपीएलचे विजेतेपद जिंकले. तोच हार्दिक आता मुंबईचा कर्णधार आहे, ज्याने अगदी सरासरी सुरुवातीनंतर पुनरागमन केले आहे. ◀(*वृत्तसंस्था*)

**आजचा सामना**

**मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात टायटन्स**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



रविवारी टेक्सासमधील फोर्ट वर्थ येथील टेक्सास मोटर स्पीडवे येथे एनएएससीएआर कप सीरिज ऑटो रेस जिंकल्यानंतर जॉय लोगानो याने त्याच्या कारवर उभे राहून आनंद साजरा केला

# जिल्हा तायक्कांदो स्पर्धेत एन. पी. अकॅडमीचे वर्चस्व; 10 पदके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

तायक्कांदो असोसिएशनच्या वतीने पिलीव येथे झालेल्या जिल्हा तायक्कांदो कॅडेट, ज्युनियर व सीनियर स्पर्धेत एन. पी. तापक्कॉन्दो अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात आणि क्युरोगी व पुमसे या प्रकारात ६ सुवर्ण, ३ रौप्य व १ कास्य अशी १० पदकांची कमाई केली.

सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची नाशिक येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना मुख्य प्रशिक्षक नेताजी पवार, विश्वजीत मारबे, वैष्णवी सुरवसे, लक्ष्मी पवार, यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे सोलापूर तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष शहाजीबापू पाटील, उपाध्यक्ष शिवराज मुंगळे, सचिव प्रमोद दौडे, खजिनदार गुरुलिंग गगनहळी, एन. पी. तायक्कांदो अकॅडमीच्या उपाध्यक्ष महादेव होमकर, सचिवा अरुणा राठोड, मुख्याध्यापक तानाजी माने, विद्यापीठ सिनेट सदस्य सचिन गायकवाड, मास्टर शिवराम भोसले यांनी शुभेच्छा दिल्या.



**कामगिरी केलेले खेळाडू असे**

**सुवर्ण : कॅडेट पुमसे :** श्रीपाद कंधारे. **क्युरोगी :** सार्थक कंधारे, आदित्य बलदवा, प्रज्वल साठे, समीक्षा बंडा, संग्राम जगताप. **रौप्य :** पूर्वा घोडके, स्वराली भोसले, शाहिद शेख. **कास्य :** बिलानी गुंडे.

# शालेय राज्य युनिफाईट स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजला चार सुवर्ण

**सोलापूर, दि. ५ मे-**

नातेपुते येथे झालेल्या १९ वर्षाखालील शालेय राज्य युनिफाईट स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या चार खेळाडूंनी विविध गटांमध्ये सुवर्णपदक पटकावले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



**सुवर्ण पदक प्राप्त :** संस्कृती अंजीखाने (४८ ते ५० किलो) पौर्णिमा पुजारीने (५१ ते ५५ किलो) श्रावण वालीकर (४८ ते ५० किलो), संगमेश्वर शिरवळकर (५१ ते ५३किलो).

# मास्टर व नीलेश गायकवाड अकादमीचे शानदार विजय

**उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट**



**सोलापूर, दि. ५ मे-**

उदगीरी चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मास्टर व नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने शानदार विजय मिळविले.

मास्टर अकादमीने आयोजिलेली ही स्पर्धा दयानंद कॉलेजच्या मैदानावर सुरू आहे. सोमवारी झालेल्या सामन्यात एनजीसीएने विहान संघावर ९ गडी राखून विजय मिळविला. पृथ्वीराज मुंडे सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या सामन्यात मास्टर्स संघाने उस्मानाबादला ११० धावानी हरविले. आर्यन हंगे सामावीर ठरला. हे पुरस्कार राम हिरापुरे, राजेश येमुल, राजवर्धन जिल्हा व श्री. माने यांच्या उपस्थितीत देण्यात आला.

**संक्षिप्त धावफलक : विहान संघ** : २८ षटकात ७ बाद ११५( अवधूत घोटकर ३३, धावा केल्या. पृथ्वीराज मुंडे २-१८) पराभूत विरुद्ध : **एन.जी.सी.ए.** : २१.१ षटकात १ बाद ११६ ( विहान येवनकर नाबाद ४९, रणबीर सिंग भूमरा नाबाद ३९, दक्ष मोरे १-१८)

**मास्टर्स अकादमी** : ३० षटकात ६ बाद २१२ (आर्यन हंगे ६८, वेदांत गोंजारी नाबाद ४३, सिद्धार्थ मदने २-२४) वि. वि. **उस्मानाबाद** : सर्व बाद १०२ (सिद्धार्थ मदने १७, नीतिकेश गज्जम ३-८, आर्यन हंगे २-१

# बार्शीत उन्हाळी व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबिरास सुरवात



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे-**

येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्यावतीने उन्हाळी व्हॉलीबॉल प्रशिक्षण शिबिरास सुरवात झाली. बार्शीतील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्रांगणात याचे उद्घाटन शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे माजी प्राचार्य सुग्रीव गोरे, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य दीपक गुंड, प्रा.डॉ. सुरेश लांडगे, प्रसिद्ध व्हॉलीबॉलपटू किरण देशमुख आदी उपस्थित होते. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ व्ही.पी. शिखरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

दि. २ ते १६ मे या कालावधीत होत असलेले हे शिबीर सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रात होणार असून १० ते १७ वर्ष वयोगटातील सुमारे ६० पेक्षा अधिक मुला-मुलींनी या शिबिरात सहभाग नोंदवला आहे. प्रा डॉ सुरेश लांडगे, किरण देशमुख, प्रा खंडू चव्हाण, विजय ढगे, शिवराज बारंगुळे यांचे मार्गदर्शन शिबिरार्थीना लाभणार आहे. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर जगदाळे मामा यांच्या प्रतिमा पूजन व मैदानाचे पूजन करुन शिबिराचे उदघाटन झाले. सूत्रसंचालन प्रा. एस.पी. अंधारे, आभार पी. पी. नरळे यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. बारसकर, प्रा. डॉ. सोनटक्के, श्री. उपलकर, विकास पाटील आदी उपस्थित होते.

# मॉडेल अकादमीची बार्शीवर मात

### रेल्वेची ७८वी स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : शिवप्रसाद रावळे सामनावीर

**सोलापूर, दि. ५ मे-**

मध्य रेल्वे सोलापूरच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मॉडेल क्रिकेट अकॅडमीने बी.टी.सी.ए. बार्शीवर ८ गडी राखून मात केली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सोमवारी झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या बार्शीच्या डाव मॉडेल अकादमीने ६६ धावांत गुंडाळला. विजयी ६७ धावांचे सोपे लक्ष्य मॉडेलने २ गडी गमावित गाठले. चार बळी टिपणारा शिवप्रसाद रावळे सामन्याचा मानकरी ठरला. त्यास इन्स्टिटयूटचे खजिनदार विक्रांत पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून दयानंद नवले व नितीन गायकवाड तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड यानी काम पाहिले.



**संक्षिप्त धावफलक : बी.टी.सी.ए., बार्शी:** १५ षटकांत सर्व बाद ६६ (मयूर लाकल नाबाद १४, समर्थ देशमुख १३, शिवप्रसाद रावळे ४ बळी, सुधान्व मनुर ३ बळी, सुदेश राठोड २ बळी) पराभूत विरुद्ध **मॉडेल क्रिकेट अकॅडमी ब संघ :** ८.१ षटकांत २ बाद ६७ (अक्षय हावळे ३३, संदीप राठोड नाबाद २६, भगवंत आदलींगे १ बळी)

# ए. जी. पाटील श्री शरीरसौष्ठव स्पर्धा गुरुवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन संलग्न सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशनच्या वतीने गुरुवार दिनांक ८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापूर येथील के.एल. ई शाळेच्या समोरील मैदानात येथे ए. जी. पाटील श्री २०२५ शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले आहे, अशी माहिती सचिव प्रमोद काटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्पर्धेसाठी या स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातून दीडशेहून अधिक स्पर्धक सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी २ लाख रुपयाची रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेचे आयोजन सिद्धेश्वर पाटील यांनी आयोजित केली आहे. या स्पर्धा सहा वजनी गटात घेण्यात येणार आहेत. प्रत्येक गटात पाच बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. रोख रक्कम सन्मान चिन्ह व सन्मानपत्र असे बक्षिसाचे स्वरूप आहे. सहा गटातील प्रथम विजेत्या मधून ए. जी. पाटील श्री २०२५ निवडला जाणार आहे. त्यास रोख रक्कम ३१ हजार रुपये सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन तर उपविजेत्यास १५ हजार रुपये सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. बेस्ट पोझर, मोस्ट इम्प्रुड यांना प्रत्येकी ५ हजार रुपये सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येईल. प्रत्येक सहभागी स्पर्धकास सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देण्यात येणार आहे. यामध्ये जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे आणि सचिव प्रमोद काटे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गोरख राजसिंग, प्रतीक भागवत, रतिकांत पाटील, पृथ्वी सुरवसे, शफी शेतसंदी आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# कॉरिडॉरसाठी बाधितांचे सहकार्य मिळेल का?

## विकासाच्या बाजूने असलेल्या पंढरपूरकरांचा सवाल

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.५ मे -**

जे नागरिक बाधित होणार आहेत त्यांच्या पुर्नवसनाची संपुर्ण जबाबदारी राज्य शासनाकडून घेतली जात आहे. ज्या नागरिकांची घरे जाणार आहेत त्यांना सर्वोच्च मोबदला तर ज्यांची दूकाने जाणार आहेत त्यांना दुकानाला दुकान आणि शासकीय मोबदला देखील दिला जाणार आहे. याशिवाय कॉरिडॉर झाल्यानंतर कोणत्याही खासगी जागांवर आरक्षण टाकले जाणार नाही, कॉरिडॉरनंतर मंदिरा भोवताली कुठलीही भिंत येणार नाही. शहरात दहा ते बारा ठिकाणी बहुमजली पार्किंगची सुविधा पुरविली जाणार आहे. शहराकडे येणारे सर्व रस्त्यांचे रुंदीकरण केले जाणार आहे. शहरातील अंतर्गत रस्त्यांचा देखील नगरपरिषदेतर्फे विकास केला जाणार आहे. असे आश्वासक पाऊल राज्य शासनाकडून उचलले जाणार असल्याची माहिती स्वत: जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संभाव्य बाधित होणाऱ्या नागरिकांशी बोलताना दिलेली आहे. त्यामुळे आता तरी कॉरिडॉरबाबत बाधितांचे सहकार्य मिळेल का? असा सवाल विकासाच्या बाजूने असलेल्या पंढरपूरकरांकडून विचारला जात आहे.

पंढरपूर येथे कॉरिडॉर विषयी वेगवेगळे तीन मतप्रवाह आहेत. यामध्ये जे बाधित होणार आहेत त्यांचा सहाजिकच कॉरिडॉरला विरोध दिसत आहे. मात्र याच कॉरिडॉरमुळे ज्या नागरिकांची दुकाने, घरे विठ्ठल मंदिराच्या जवळ किंवा कॉरिडॉर पासून हाकेच्या अंतरावर आता येणार आहेत त्यांना कॉरिडॉर हवा आहे. याबरोबरच तिसरा वर्ग जो मंदिरा पासून कोसोदूर तसेच उपनगरीय भागात राहतो आहे अशा मंडळींना पंढरपूरचा विकास हवा आहे. आपल्या मुलाबाळांच्या भविष्याच्या दृष्टीने पंढरपूरचा कायापालट होणे या नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे आहे. पंढरपूरचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाच्या मदतीने राज्य शासनाने देखील दोन पावले पुढे टाकली आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक ठिकाण असलेल्या पंढरपूरचा विकास करण्याचा संकल्प देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोडलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी सहाजिकच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर आहे. राज्यासह, आसपासच्या इतर राज्यातून वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांचा ओढा पंढरपूरकडे वाढेल. केवळ यात्रेच्या वेळीच गर्दी होणार नाही तर बाराही महिने पंढरीत वारकरी पर्यटकांची गर्दी राहिल. पंढरपूरात आल्यावर वारकरी भाविकांचे इथले वास्तव्य सुखकर होईल असा केंद्र आणि राज्य शासनाला विश्वास आहे. सहाजिकच इथल्या बाजारपेठा गजबजल्या तर पंढरपूरातील नागरिकांना देखील याचा फायदा होवून पंढरपूर आणि पंचक्रोशीतील नागरिकांचे जीवनमान यामुळे उंचावेल. मात्र हे घडवण्यासाठी पंढरपूरकर नागरिकांच्या सहकार्याची गरज आहे. मात्र १९९८२ तसेच १९९६ मध्ये शहरात झालेल्या रस्ता रुंदीकरणात ज्या नागरिकांवर बाधित होण्याची ही वेळ आली त्यांनी जर त्यावेळी विरोध केला असता तर आजपर्यंत जो पंढरपूरचा विकास झाला तो झाला असता का ? हजारोंच्या संख्येत भरणारी यात्रा लाखोंच्या संख्येत भरली असती का ? जर अगोदरच्या दोन्ही रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यांनी विरोध केला असता तर आज ज्यांची घरे, दुकाने मुख्य रस्त्यावर आलेली आहेत त्यांना तीस, चाळीस वर्षात जे उत्पन्न मिळाले ते मिळाले असते का ? याचा देखील विचार होणे आवश्यक आहे. विकास होत असताना कुणाच्या जमीनी गेल्या, कुणाची घरे, दुकाने गेली याचा देखील विचार पंढरपूर शहरवासियांनी केला पाहिजे. जर विकास पाहिजे असेल तर थोडा त्याग देखील करणे आवश्यक आहे.




**पंढरपूरात १९८२ पूर्वी विठ्ठल मंदिराच्या मुख्य अशा पश्चिमव्दाराकडे जाणाऱ्या मार्गावरुन एकाचवेळी तीन नागरिक देखील जाऊ शकत नव्हते. मात्र याच रस्त्याचे त्यावेळी रस्ता रुंदीकरण केल्यानंतर शेकडोच्या संख्येने या मार्गावर नागरिकांची आज वर्दळ होताना दिसत आहे.**

दरम्यान पंढरपूरात यापूर्वी १९८२ मध्ये पहिल्यांदा विठ्ठल मंदिर परिसरात मास्टरप्लँन झाला होता. हा मास्टरप्लँन होण्याअगोदर विठ्ठल मंदिराकडे जाणारा मुख्य रस्ता (पश्चिमव्दार) हा अत्यंत चिंचोळा होता. साधारणपणे या रस्त्यावरुन एका वेळी तीन ते चार माणसे सुध्दा सहज जाऊ शकत नव्हती. त्याकाळी आषाढी, कार्तिकी सारख्या यात्रेच्या वेळी देखील कमी प्रमाणावर वारकरी भाविक येत असत. मात्र हळु हळु परिस्थिती बदलली. यात्रांचे स्वरुप व्यापक बनले. त्यामुळे कालांतराने पुन्हा १९९६ मध्ये नगरप्रदक्षिणा रस्त्याचे तसेच इतर एक, दोन रस्त्यांचे रुंदीकरण करावे लागले. त्यावेळी देखील या रस्त्यांवरील शेकडो नागरिकांची घरे, दुकाने बाधित झाली होती. आषाढी यात्रेच्या वेळी संत ज्ञानेश्वर माऊली आणि जगतगुरु तुकोबारायांच्या पालखी सोहळ्यासह इतर संतांच्या पालख्यांतून देखील लाखोंच्या संख्येने वारकरी भाविक सहभागी होवून पंढरपूरला यात्रेसाठी येऊ लागलेले आहे. त्यामुळे पूर्वी हजारोंच्या संख्येत येणारे वारकरी आता लाखोंच्या संख्येने येथे जमु लागले. यात्रेच्या काळात होणाऱ्या लाखांच्या गर्दीमुळे मुळातच लाख, सव्वालाख लोकसंख्या असलेल्या पंढरपूर शहरावर कमालीचा भार पडू लागला. त्यामुळेच गेल्या सात ते आठ वर्षापूर्वी राज्य शासनाने जिल्हा प्रशासनाला मार्गदर्शन करुन पंढरपूर शेजारीच चंद्रभागा नदीच्या पैलतिरावर शेगावदुमाला परिसरा जवळ पासष्ठ एकर परिसराची निर्मिती केली आहे. या पासष्ठ एकर परिसराच्या ठिकाणी यात्रेसाठी शेकडोच्या संख्येने येणाऱ्या दिंड्यांच्या वास्तव्याची सोय केली जात आहे. त्यामुळे यात्रांच्या काळात आता पासष्ठ एकर परिसरातील नागरिकांना देखील उत्पन्नाचा नवीन स्त्रोत निर्माण झाला आहे. त्यामुळे पंढरपूरातील नागरिकांचे आयुष्य उध्दवस्त करण्याची कोणतीही हौस शासनाला नाही. मात्र अशा प्रकारचा काँरिडोर करण्याची काळाची गरज बनलेली आहे.

## महत्वाचे...





### शिवरत्न पॅटर्नच्या यशाची परंपरा कायम

**अकलूज, दि.५ मे-**

सलग १६ व्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत याही वर्षी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या शंकरराव मोहिते पाटील इंग्लीश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, शिवरत्न पॅटर्नच्या विद्यार्थ्यांनी बारावीत भरघोस यश संपादन केले आहे. इ.१२ वी मार्च -२५ चा निकाल आज जाहीर झाला असून यामध्ये आयेशा सचिन लोहकरे ८५ टक्के गुण मिळवत प्रथम आली. सनिधी वैभव फडे ८३.६७ टक्के गुण मिळवत द्वितीय आली तर स्वयम पंकज किटुकाले ८३ टक्के गुण मिळवत तृतीय आला. येथील सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता श्रेणी मिळवली आहे. शिवरत्न शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक, माननीय खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचे शिवरत्न संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, सर्व स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य प्राचार्य सम न्वयक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### जवळा विकास सोसायटीच्या चेअरमनपदी सुनीलआबा साळुंखे बिनविरोध

**सांगोला, दि.५ मे-**

सांगोला तालुक्यातील जवळा विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांचे निकटवर्तीय असणारे सुनीलआबा रावसाहेब साळुंखे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सोमवार दि.५ मे रोजी संस्थेच्या कार्यालयात या निवडी पार पडल्या. संस्थेचे माजी चेअरमन मानसिंग साळुंखे यांनी राजीनामा दिल्याने चेअरमनपद रिक्त झाले होते. चेअरमन पदासाठी सुनीलआबा साळुंखे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध पार पडली. सुनीलआबा साळुंखे यांची नियुक्ती होताच त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अरुण घुले, पंडित साळुंखे, दत्ता बर्वे, सरपंच सज्जन मागाडे, उपसरपंच नवाज खलिफा, ग्रा.पं.सदस्य अनिल सुतार, वैभव देशमुख यांच्यासह संस्थेचे संचालक तानाजी आगलावे, सखाराम कोरे, नशीर तांबोळी, प्रशांत शिवाजी साळुंखे, युवराज घुले, गिरीश साळे, रामचंद्र आगलावे, मानसिंग साळुंखे, लक्ष्मी तरंगे, सखुबाई खांडेकर उपस्थित होते.

### हगलगुंडे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**अणदूर, दि.५ मे-**

येथील जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत हगलगुंडे यांना राहुरी (जि. अहिल्यानगर) येथील गरुड फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांचा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाला असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



गेली ३० वर्षे पत्रकारिता करीत असलेले हगलगुंडे यांनी अणदूर व परिसरातील गोरगरीब, पीडित वंचित, शेतकरी, मजूर आदी घटकांना आपल्या बातमीदारीतून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. लवकरच राहुरी येथे या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे, त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल खडकाळी मॉर्निंग क्लब, फार्मा ग्रुप व जयमल्हार पत्रकार संघाने त्यांचे अभिनंदन केले आहे.



### सांगोला विद्यामंदिरमध्ये सेवापूर्ती सत्कार समारंभ संपन्न

**सांगोला,दि.५ मे-**

सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले, सहशिक्षक मारुती बोरकर, मिलिंद फाळके तसेच नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे पर्यवेक्षक मधुकर धायगुडे यांचा सेवापूर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके व सदस्या शीलाकाकी झपके यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सचिव म.शं.घोंगडे, सदस्य चंद्रशेखर अंकलगी, सांगोला विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड, नाझरा विद्यामंदिरचे प्राचार्य बिभीषण माने, कोळा विद्यामंदिरचे प्राचार्य श्रीकांत लांडगे, सांगोला विद्यामंदिरच्या उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, कोळा विद्यामंदिरचे पर्यवेक्षक चारुदत्त जगताप उपस्थित होते. यावेळी प्रा.प्रबुद्धचंद्र झपके,मकरंद अंकलगी, प्रा.गणेश घेरडीकर, उन्मेष आटपाडीकर, अमोल महिमकर, प्रा.धनाजी चव्हाण, दीपक शिंदे, मोहन भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बिभीषण माने, अमोल गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन महालिंग पाटील यांनी तर आभार प्रा.महेश विभुते यांनी मानले.

## निधन वृत्त...

### मथुराबाई चव्हाण



**सोलापूर, दि. ५ मे -**

अक्कलकोट तालुक्यातील चुंगी येथील श्रीमती मथुराबाई विश्वंभर चव्हाण (वय ९५) यांचे दीर्घ आजाराने सोमवारी पहाटे सोलापूर येथे निधन झाले.मोदी स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# माळशिरस तालुक्याचा बारावीचा निकाल ९६.१६ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.५ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी मार्च २०२५ मधे घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा निकाल शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून यामध्ये माळशिरस तालुक्याचा निकाल ९६.१६ टक्के इतका लागला आहे.गतवर्षीच्या तुलनेत बरोबरीने निकाल लागला आहे. तालुक्यातून ५ हजार ७६४ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. त्यापैकी ५ हजार ५४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामधे विशेष प्राविण्यासह ७२१, प्रथम श्रेणीत २ हजार८०, व्दितीय श्रेणीत २ हजार ३१८ तर पास श्रेणीत ४२४ विद्यार्थी आहेत. तालुक्यातील शाळांची कंसातील शाखानिहाय व एकूण निकालाची टक्केवारी पुढीलप्रमाणे : नातेपुते कनिष्ठ म हाविद्यालय (शास्त्र ९९:४५,कला ८३.७२, वाणिज्य १००) ९४.१०, शंकरराव मोहिते महाविद्यालय,अकलूज (शास्त्र ९८.९५ कला ८४.०० वाणिज्य १००) ९५.४६, महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर (शास्त्र १००,कला ९३.४४) ९७.६१, सदाशिवराव माने विद्यालय अकलूज (शास्त्र १००,कला ९५.२०, वाणिज्य १००) ९८.२९, मॉडेल विविधांगी प्रशाला माळीनगर(शास्त्र ९८:२२,कला ७९:५४)९४.३३, कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर(शास्त्र १००, कला ८९:१४,वाणिज्य ९७:२९)९७.१०, हनुमान विद्यालय शिंदेवाडी(शास्त्र १००,कला ९५:४५,वाणिज्य १००) ९८.४१, आर्ट्स कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालय माळशिरस १००,कर्मवीर भाऊराव.पाटील विद्यालय पिलीव(शास्त्र १०० कला ९०.९०) ९६.६१, श्रीनाथ माध्यमिक विद्यालय बोरगाव (शास्त्र ९८:७६ कला,५२:६३. वाणिज्य ८६:३६)८९:३४,गोपाळराव देव प्रशाला माळशिरस(शास्त्र ९९.३५,कला ८४.६१,वाणिज्य ९८) ९६.७०,सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर कला ६५:९०,श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील कन्या प्रशाला नातेपुते कला.९२:५९, चंद्रशेखर विद्यालय श्रीपुर (शास्त्र ९२.४०, कला ७८.९४,वाणिज्य ९०:३२)९०.८६,हनुमान हायस्कूल तांदुळवाडी ५३.३३,श्रीमान शेठ एचएम दोशी विद्यालय खुडूस १००, शंकरराव म ोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते(शास्त्र ९२.४०,कला ७८.९४,वाणिज्य ९०.३२) ९३:२५,शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल शंकरनगर १००,चंद्रकांत घुगरदरे प्रशाला नातेपुते (शास्त्र १००,कला ८०.७६)९४.०४,क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले विद्यालय माळशिरस (शास्त्र १००,कला १००)१००, श्रीनाथ विद्यालय तरंगफळ (शास्त्र १०० ,कला १००)१००,विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालय जाधववाडी (शास्त्र १००,कला १००) १००,इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज वेळापूर ९८:६४, कनिष्ठ म हाविद्यालय पिरळे(शास्त्र ९९.२८,कला १००) ९९.३६,श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पानीव (शास्त्र १००, वाणिज्य १००)१००,गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूल म ाळीनगर(शास्त्र१००,वाणिज्य१००)१००,जनता विद्यालय मळोली ८०,शिवछत्रपती कनिष्ठ महाविद्यालय नेवरे ९७:५०, शिवशंभो ज्युनिअर कॉलेज (शास्त्र ९९.४९,कला ९६:५५)९९.२९,जिजामाता कन्या प्रशाला अकलूज १००, निमगाव विद्यामंदिर(शास्त्र १००,कला १००)१००,लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूल वेळापूर(शास्त्र ९९:४९,कला ९६:५५) ९९:२९,विवेकानंद ज्युनिअर कॉलेज माळशिरस १००,श्रीनाथ विद्यालय म ाळशिरस(शास्त्र ९६:५६ ,कला १००, वाणिज्य १००)९९:६१,श्री विठ्ठल रुक्मिणी कॉलेज तिरवंडी ९३:३३, रत्नत्रय विद्यालय बनकरवस्ती १००, सदाशिवराव निवासी प्रशाला(शास्त्र ९९:०४,कला९४:७३,वाणिज्य१००)९८.४१, राजेंद्र पाटील विद्यालय पानीव १००,श्रीराम आयटीआय पानीव ६२:५०,शासकीय आरटीआय १००,शंकरराव मोहिते महाविद्यालय व्होकेशनल ९०:४७,सदाशिवराव माने प्रशाला व्होकेशनल ९२::१५,महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर व्होकेशनल ९३:०५,मॉडेल विविधांगी प्रशाला माळीनगर व्होकेशनल ८६.४८ टक्के एवढा लागलेला आहे.

### तालुक्यातील १४ शाळांचा निकाल शंभर टक्के

आर्ट्स,कॉमर्स ज्यु.कॉलेज माळशिरस, श्रीमान शेठ एच एम दोशी विद्यालय खुडूस, शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल शंकरनगर, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले ज्यु.कॉलेज माळशिरस, श्रीनाथ विद्यालय तरंगफळ, विजयसिंह मोहिते पाटील ज्यु.कॉलेज जाधववाडी, श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय पानीव, गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूल म ाळीनगर, जिजामाता कन्या प्रशाला व ज्युनिअर कॉलेज अकलूज, निमगांव विद्यामंदिर निमगांव, विवेकानंद ज्यु.कॉलेज माळशिरस, रत्नत्रय विद्यालय बनकरवस्ती, कै.राजेंद्र पाटील विद्यालय पानीव, शासकीय आयटीआय माळीनगर.

# खेडगी कॉलेजचा निकाल ७३.६२ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.५ मे**

येथील सी.बी. खेडगी कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ७३.६२ टक्के लागला. अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट विभागातील सोनाली प्रमोद पाटील हि ५१० (८५ टक्के) गुण मिळवून म हाविद्यालयात सर्वप्रथम आली आहे. विशेष म्हणजे यावर्षी देखील महाविद्यालयात मुलीनीच बाजी म ारली आहे. खेडगी महाविद्यालयातील विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय प्रशिक्षण या चारही शाखेतून एकूण ७०९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ५२२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंटमध्ये आकाश सूर्यकांत डांबरे (७८.८३ टक्के ) द्वितीय तर पुष्पा चंद्रकीर्ती खानापुरे (७४.८३ टक्के) तृतीय आली. विज्ञान शाखेत ३३८ पैकी ३१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ९१.७१ टक्के निकाल लागला. मुझ्झम्मील शेख (७७.३३ टक्के), तहेझिब शेख (७३.८३ टक्के) व सौंदर्या म्हेत्रे (७२ टक्के) हे अनुक्रमे प्रथण, द्वितीय, तृतीय आले. वाणिज्य शाखेत १४३ विद्यार्थी परीक्षेत बसले होते त्यापैकी ११६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८१.११ टक्के निकाल लागला. यामध्ये मुलींनी बाजी मारली सारिका बहिरेवार (७७ टक्के), रेणुका कलशेट्टी व अश्विनी निंबाळ (७४ टक्के), प्रगती पाटील (७३.५० टक्के) हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले. कला शाखेत २२८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. यातील ९६ (४२.१० टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले. स्नेहल बेळ्ळे (६८ टक्के), अंकिता लोंढे (६५.८३ टक्के), पूजा कांबळे (६५.५० टक्के ) हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आले. व्यवसाय शिक्षण विभागातील ९२ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी ६२ ( ६७ टक्के)विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी विभागात समर्थ सुतार (६८.८३ टक्के), वैभव सुतार (६३.६७ टक्के), प्रणिता सुतार (५७.५० टक्के) हे अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय आले. ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी विभागात विजय गवंडी (५२.६७ टक्के), सचिन कोष्टी (४८.९३ टक्के), समर्थ मैंदर्गी (४७.५० टक्के) हे अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय आले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी, चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे, यांनी अभिनंदन केले.



# माढा तालुक्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करा

## संजय पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.५ मे-**

माढा तालुक्यात तहसीलदार, प्रांतअधिकारी व गटविकास अधिकारी नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे होत नाहीत. १७ फ ेब्रुवारीपासून तालुक्याचे तहसीलदार नसल्यामुळे तसेच प्रांताधिकारी बदलून गेलेमुळे इतर तालुक्यातील तहसीलदाराकडे व प्रांतअधिकारी यांच्याकडे चार्ज असल्याने सर्वसामान्य लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे माढा तालुक्यात प्रशासकीय अधिकारी यांची त्वरित नेमणूक करावी अशी मागणी जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे माढा तालुक्यात सध्या तहसीलदार, प्रांताधिकारी, गटविकास अधिकारी हे आठवड्यातून १ ते २ दिवस येतात. तसेच गटविकास अधिकारी कुर्डुवाडी यांच्याकडेहि बार्शी तालुक्याचा जादा चार्ज असल्यामुळे ते पण आठवड्यातून २ ते ३ दिवसच असतात. त्याम ुळे माढा तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी रेग्युलर नसल्यामुळे तालुक्यातील सर्वसाम ान्य लोकांची कामे होत नाहीत. तरी तालुक्याला तहसीलदार, प्रांत अधिकारी व गटविकास अधिकारी तालुक्यासाठी रेगुलर मिळाले तर सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास म दत होईल अशा मागणीचे निवेदन जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय पाटील भिमानगरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेले आहे.



# अर्जंट रेशन कार्ड मिळाले अन बाळाचे प्राण वाचले

## स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे मंडलिक यांची तत्परता आली कामी

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि.५ मे-**

रेशन कार्ड मिळत नसल्याने माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील एका वीस दिवसाच्या बाळाचे हृदयाचे ऑपरेशन थांबले होते पण तत्परता दाखवत स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी माळशिरस पुरवठा खात्यातून त्या कुटुंबाला तात्काळ रेशन कार्ड मिळवून दिले आणि त्या बाळावर उपचार होऊन त्याचे प्राण वाचले. त्यामुळे तांदुळवाडीतील वाघमोडे कुटुंबाने समाधान व्यक्त केले.

रेशन कार्ड मिळत नसल्याच्या तक्रारी असंख्य आहेत. अनेक हेलपाटे घालून सुद्धा रेशन कार्ड मिळत नसल्याने अनेकांच्या जीवावर बेतताना दिसत आहे. कारण महात्मा फुले आरोग्य जीवनदायी योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर अगोदर रेशन कार्ड मागितले जाते आणि तेच मिळवण्यासाठी पुरवठा खात्यात प्रयत्नाची पराकाष्ठा करावी लागते. यामुळे रुग्णांना नाहक सोसावा लागतो. रेशन कार्ड ऑनलाइन होऊन त्याचा बारा अंकी नंबर जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत त्याला योजनेचा लाभ घेता येत नाही. कित्येक वेळा ऑफलाईन पुरवठा खात्यातून दाखला घेतला तरी अनेक डॉक्टर्स तो दाखला चालत नसल्याचे सांगतात किंवा त्याची महात्मा फुले आरोग्य जीवनदायी योजनेच्या साइटवर नोंदणी होत नसल्याने अडचण निर्माण होते. कित्येक वेळा तातडीने रुग्णावर उपचार करायचे असतात आणि रेशन कार्डच नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागते मग अशा काळात पळापळ होते पण पुरवठा खात्यात गेल्यावर सर्वर डाऊन अशी कारणे ऐकावी लागतात आणि त्यांचाही नाईलाज असतो. तांदुळवाडी (ता.माळशिरस) येथील वाघमोडे नामक एका कुटुंबावरबाका प्रसंग आला या कुटुंबातील वीस दिवसाचे बाळ आणि त्याला हृदयाचा प्रॉब्लेम असल्यामुळे त्याचे तातडीने ऑपरेशन करावे लागणार होते मात्र त्या बाळाच्या वडिलांनी अनेक हेलपाटे घालून सुद्धा त्याला रेशन कार्ड मिळत नसल्याने तोही हतबल झाला.त्याची ही समस्या दिसल्यानंतर स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक यांनी तातडीने तात्काळ अर्जंट रेशन कार्ड काढून दिले आणि त्यावर त्या बाळाचे पंढरपूर येथील शहा हॉस्पिटलमध्ये हृदयाचे ऑपरेशन झाले. आता बाळ सुखरूप असून त्याला घरी आणण्यात आले आहे दि. १४ रोजी डॉक्टरांनी त्याला तपासासाठी बोलवले आहे. मंडलिक यांच्या तत्परतेमुळे या कुटुंबाला रेशन कार्ड मिळाले आणि बाळाचे प्राण वाचलेने कुटुंबाने मंडलिक यांचे आभार व्यक्त करत धन्यवाद दिले.



वैद्यकीय अडचण असताना जर रेशन कार्ड मिळत नसतील तर माझ्याशी संपर्क साधावा. स्वस्त धान्य दुकानदार संघटना या कामी प्रत्येक नागरिकांना मदत करेल. त्याला रेशन कार्ड काढून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले जातील यासाठी संपर्क साधावा.

**- विजय मंडलिक, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र स्वस्त धान्य दुकानदार संघटना**

# बारावी : विविध शाळांचे निकाल



## कुमठे महाविद्यालय ९४.१२ टक्के : हुंडेकरी प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**

कुमठे (ता. उत्तर सोलापूर) येथील कुमठे प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य ९४.१२ टक्के, कला शाखेचा ६६.१० टक्के लागला आहे. कला वाणिज्य शाखेचा निकाल ७६.८४ टक्के लागला आहे. सानिया हुंडेकरी ७३.५० टक्के, संतोष शिंगे ७२.३३ टक्के, सनत चव्हाण ६०.८३ टक्के तर वाणिज्य शाखेतून सिद्धाराम कांबळे ७०.३३ टक्के, सागर हविनाळे ६३ टक्के, पूजा क्षीरसागर या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमाकांने यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थचे अध्यक्ष माजी आमदार दिलिपराव माने, मुख्य विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त स्वाता माने यांनी प्राचार्य जयसिंग गायकवाड, पर्यवेक्षक वसंत गुंगे यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी ज्यु. कॉलेज प्रमुख प्रा. संजय जाधव, प्रा. दादाराव डांगे, प्रा. हणमंत शिंदे, प्रा. दिपक शिंदे, प्रा. विजयकुमार वाळके, प्रा. विनोद थोरात, प्रा. राजीव नीकम, प्रा. बंडोपंत बाबर उपस्थित होते.



## सुरवसे ९०.९४ टक्के : कस्तुरे, पारवे प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**

होटगी रोडवरील सुरवसे कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल विज्ञान शाखेचा १०० टक्के लागला असून कला शाखेचा निकाल ९०.९४ लागला आहे. कला : प्रतीक्षा कस्तुरे ७७.६७ टक्के, अमृता कांबळे ७६.८३ टक्के, अंजली घंटे ७१.६७ टक्के. विज्ञान : वैष्णवी पारवे ६९.६७ टक्के, जानवी पनघंटी ६८.३३ टक्के, प्रमोद लोहार ६३.६७ टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थापक अध्यक्ष दत्ता सुरवसे, अध्यक्ष राजकुमार सुरवसे, सचिवा विजयाताई सुरवसे, प्राचार्या उज्वला साळुंखे यांनी अभिनंदन केले.



## हिराचंद नेमचंद ९९.३५ टक्के : निमाणी प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**

बारावी (वाणिज्य शाखा) परीक्षेत हिराचंद नेमचंद महाविद्यालयाने ९९.३५ टक्के इतक्या उत्तम निकालासह शहरात आघाडी घेतली आहे. अकाउंटन्सी विषयात सहा विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. प्रथम पूर्वा निमानी ९५.६७ टक्के, द्वितीय ईशा सोमानी व विराज राठी ९५.१७ टक्के, तृतीय अक्षता शिरढोणे ९४.८३ टक्के. याशिवाय धवल भुतडा (९४.६७ टक्के) आणि राघव करवा (९४.३३ टक्के) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले. अकाउंटन्सी विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेले विद्यार्थी ईशा सोमानी, धवल भुतडा, विराज राठी, सई कुलकर्णी, यश कंधारी, पूर्वा निमानी. गणित विषयात ईशा सोमानी १०० पैकी ९९ गुण, माहिती तंत्रज्ञान विषयात उदयसिंग घुले-१०० पैकी १०० गुण प्राप्त केले. बारावी (वाणिज्य शाखा) परीक्षेत हिराचंद नेमचंद महाविद्यालयाने ९९.३५ टक्के इतक्या उत्तम निकालासह शहरात आघाडी घेतली आहे.प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी अभिनंदन केले.

# सीनेचा पाणी प्रश्न पेटला; नदीत पाणी सोडण्यासाठी शेतकऱ्यांचा ठिय्या

### ✔ सिंचन भवन येथे शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना धरले धाऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ मे-**

सीना नदीत पाणी सोडण्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातील शिवणी, पाकणी, तिऱ्हे, पाथरी, तसेच मोहोळ तालुक्यातील शिरापूर, टाकळी, शिंगोली, तरटगांव आदी गावातील ग्रामस्थांनी व शेतकऱ्यांनी सोलापूर शहरातील उजनी सिंचनभवन मधील प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले.

सोलापूर जिल्ह्यातील पाणी पातळी घटली आहे. अशा परिस्थितीत पिण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे मुक्या जनावरांसाठी सीना नदीत पाणी सोडावे अशा मागणीचे निवेदन उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी यापूर्वी उजनी सिंचन भवन कार्यालय येथे संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. परंतु यावर संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा पत्राद्वारे दिला होता. तरी देखील संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे डोळेझाक केल्याने आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी सोमवार दि.५ मे रोजी सिंचन भवन येथे ठिय्या आंदोलन करत विविध घोषणा दिल्या.

**वारंवार निवेदन देऊनही दुर्लक्ष**

सीना नदीवरील पाकणी बंधारा, तरटगांव (तिरे) बंधारा व अकोले बंधारा हे बंधारे विरवडे बुद्रुक येथील महादेव ओढा येथून कॅनालमधून पाणी सोडून भरून द्यावे. या मागणीसाठी हे आंदोलन केले आहे. वाढत्या उन्हामुळे पाणी पातळी घटलेली आहे. माणसांना प्यायला पाणी तसेच मुक्या जनावरांना देखील चारा व पाणी नाही. अशा स्थितीमध्ये जगण्या अवघड आहे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अधिकाऱ्यांनी पाहणी करावी. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आंदोलनासाठी आलेल्या शेतकऱ्यांना भेटायला वेळ नाही. या आंदोलन सुरू असताना देखील निवेदन स्वीकारण्यासाठी कोणताही अधिकारी येथे उपस्थित नाही. तीव्र आंदोलनाचा इशारा यापूर्वी निवेदनातून दिला होता. तरीदेखील याकडे अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत. पाटबंधारे प्रशासनाच्या कारभारावर शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**- विशाल जाधव, ग्रामस्थ तिऱ्हे**





## सकारात्मक विचाराने सर्वांगीण प्रगती शक्य : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०५ मे-**

आपल्या कर्तृत्वाने गुणवत्ता वाढली पाहिजे; जेणेकरून आपल्या कामांमध्ये सातत्य वाढेल. विश्वासाहर्ता असणे फार गरजेचे आहे, संस्थेने एखाद्या व्यक्तीला मदतीचा हात दिल्यास त्या संधीचं सोनं करा. इतकेच नाहीतर प्रत्येकाने सकारात्मक विचार ठेवा कारण सकारात्मक विचाराने सर्वांगीण प्रगती शक्य असल्याचे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

लोकमंगल कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा लोकमंगल कॉलेज, वडाळा येथे आयोजित करण्यात आली. यावेळी आमदार सुभाष देशमुख हे मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी सर्व विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दीपक करंजीकर, सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे नूतन संचालक मनिष देशमुख, भाजपाचे युवा नेते रोहन देशमुख व विभाग प्रमुख यांच्याहस्ते दीप प्रज्वलनाचे कार्यक्रम सुरू झाला. यावेळी पुढे बोलताना आ. देशमुख यांनी आपल्या विचारधारेतून येणारे सर्व विचार मांडले.

सकारात्मक विचार केल्याने पुढील मनुष्यामध्ये स्फूर्ती निर्माण होते. वेगवेगळ्या कौशल्याचे नावीन्यपूर्ण काय करता येईल याकडे सर्वांनी लक्ष द्यावे असे आवाहन केले. पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ‘आमदार आपल्या भेटीला’ उपक्रमातून देवेंद्र कोठे यांनी साधला शेकडो नागरिकांशी थेट संवाद

### ✔ तब्बल ३ कोटी रुपयांच्या विकासकामांच्या यादीचे वाचन : अडचणींचे तत्काळ निराकरण करणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०५ मे-**

‘आमदार आपल्या भेटीला’ उपक्रमातून देवेंद्र कोठे यांनी रविवारी शेकडो नागरिकांच्या थेट भेटी घेतल्या. विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्याशी थेट संवाद करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांनी तिसऱ्यांदा आमदार आपल्या भेटीला हा उपक्रम राबवला.

आमदार आपल्या भेटीला उपक्रमात रविवारी आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रभाग क्र. ११ मधील राजीव नगर, किसाननगर मुख्य रस्ता, विष्णुपंत नगर, गंगाधर नगर, तुळशांती नगर, तुळजाभवानी नगर, फैज दवाखाना ते समाधान नगर रस्ता तसेच अभिषेक नगर बुद्ध मंदिर ते वेलकम हॉल रस्त्याची परिसरातील नागरिक आणि कार्यकर्त्यांसमवेत दुचाकीवर फिरून पाहणी केली.

शहर मध्य मतदारसंघासाठी शासनाच्या २०२४ -२५ च्या निधीतून आमदार देवेंद्र कोठे यांनी १२ कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे. या निधीतून वरील परिसरातील अनेक रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. यातील तब्बल ३ कोटी रुपयांची कामे प्रभाग क्रमांक ११ च्या परिसरात करण्यात येणार आहेत. यावेळी आमदार कोठे म्हणाले, प्रभाग क्रमांक ११ मधून माजी महापौर स्व. महेश कोठे, माजी नगरसेवक राजकुमार हंचाटे, अनिता रामदास मगर यांना नागरिकांनी नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी दिली. या काळात त्यांनी परिसराचा विकास करण्याचा प्रयत्न केला. परंतु मागील पंधरा वर्षांमध्ये प्रभाग क्रमांक ११ आणि परिसरातील नागरिकांना विकासाच्या बाबतीत वनवास भोगावा लागला आहे. हा परिसर विकासकामांपासून सुमारे दोन दशके वंचित राहिल्यामुळे या भागाला भरघोस निधी देण्याचा निश्चय केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझे राजकीय पालकत्व स्वीकारल्यामुळे आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा भक्कम पाठिंबा असल्यामुळे या परिसराला सर्व सोयीसुविधा देण्याकरिता प्रभाग क्रमांक ११ आणि परिसरासाठी आगामी पाच वर्षात २५ कोटी रुपयांचा निधी देऊ, असेही आमदार देवेंद्र कोठे म्हणाले.

**सबका साथ सबका विकास हेच धोरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीने ‘सबका साथ सबका विकास’ हे धोरण अवलंबले आहे. त्यामुळे संपूर्ण शहर मध्य मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मध्य मतदारसंघाच्या विकासासाठी लागेल तितका निधी शासनाकडून खेचून आणू.

**- देवेंद्र कोठे,**
**आमदार, शहर मध्य**

याप्रसंगी महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, राजकुमार हंचाटे, रामदास मगर, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, अक्षय अंजिखाने, मनोज कलशेट्टी, संगीता खंदारे, अप्पू कडगंची, चन्नया हिरेमठ, गणेश माळी, विश्वनाथ प्याटी, गिरीश कोटा, सिद्धेश्वर कमटम, अभिषेक चिंता, प्रभाकर गंपले, गणेश चौटे आदी उपस्थित होते.

# भाजपा शहर, जिल्हाध्यक्षपदाच्या निवडी लवकरच जाहीर होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

भाजपमध्ये केंद्र तसेच राज्य पातळीवर संघटनात्मक बदलाचे वारे वाहत आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर शहाराध्यक्षपदी कोण विराजमान होणार? याची उत्सुकता आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी मंडल अध्यक्षांची नियुक्ती झाल्यानंतर आता शहर आणि जिल्हाध्यक्ष निवडीसाठी मतदान प्रक्रिया देखील घेण्यात आली आहे. यामुळे आता लवकरच या निवडी जाहीर होणार आहेत.

बाजार समिती निवडणुकीदरम्यान दोन्ही देशमुखांमधील कटुता आता संपली आहे. आतापर्यंत दोन्ही देशमुख पदाधिकारी निवडीत शह-काटशह करत होते. आता मात्र दोन्ही देशमुख एकत्र आल्यामुळे निवडीमध्ये कोणतेही राजकारण होणार नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे दोन्ही देशमुखच शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष ठरवतील अशीही चर्चा भाजपाच्या गोटातून सुरू आहे. भाजपकडून राज्यातील ७८ शहर आणि जिल्हाध्यक्षांची नावे एकाच वेळी जाहीर करण्यात येणार आहेत. या शहर आणि जिल्हाध्यक्षांच्या निवडीसाठी काही दिवसांपूर्वी भाजपने परिवेक्षकांची नियुक्ती केली होती.

सोलापूर शहराध्यक्ष पदाच्या रेसमध्ये सध्याचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, उपाध्यक्ष अनंत जाधव यांच्यासह शशी थोरात, चन्नवीर चिट्टे, रुद्रेश बोरामणी इच्छुक आहेत. मात्र या सर्वांमध्ये नरेंद्र काळे आणि अनंत जाधव यांच्यातच रस्सीखेच होणार आहे. जिल्हाक्षपदासाठी पुन्हा विद्यमाल आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहाजी पवार, शशीकांत चव्हाण हे इच्छुक आहेत. आ. कल्याणशेट्टी हे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मर्जीतील आहेत. नुकतेच त्यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर बाजार समिती निवडणूकही जिंकली आहे. त्यामुळे त्यांनाच पुन्हा संधी मिळेल असे बोलले जात आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसात कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होणार? याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे.

# महाएकता संस्थेतर्फे बेघर नागरिकांना फळे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाएकता बहुउद्देशीय संस्थेतर्फे महाराष्ट्र दिन, बसवेश्वर जयंती, अक्षय्य तृतीयेनिमित्त कुष्ठरोगी व बेघर नागरिकांना फळे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम हिंदूराव गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी जावेद डिग्गे, विनोद जाधव, औदुंबर काळे, प्रशांत तोरवी, मोबीन शेख व रॉबिनीहूडचे आर्मीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोलापूर शहरात उष्माघाताचा एकही रुग्ण नाही

### ✔ नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी : डॉ. माने
### ✔ उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर महापालिका आरोग्य विभाग सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०५ मे-**

शहरातील तापमान ४१ अंश पार झाले आहे. त्यामुळे उष्माघाताचा लोकांना त्रास होऊ नये यासाठी महापालिका आरोग्य विभागाने शहरातील सर्व आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात रुग्ण आल्यास त्यांच्यावर उपचार करण्यासाठी स्वतंत्र कक्ष सुरू केले आहेत. दरम्यान, सोलापूर शहरात उष्माघाताचा एकही रुग्ण नाही, अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

शहरात दुपारी उन्हामध्ये फिरल्याने लोकांना उष्माघाताचा फटका बसण्याची सर्वाधिक शक्यता असते. अशा रुग्णांना त्वरित उपचार मिळावेत. यासाठी आरोग्य विभागाने शहरातील सर्व आरोग्य केंद्रे, महापालिका रुग्णालये येथे स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू केले असून याची उपचाराची व्यवस्था करण्यात आली आहे. शहरात उन्हाळी झळा वाढल्या असून तापमान ४१ अंशावर जात आहे. तप्त उन्हात नागरिक उष्माघाताला बळी पडू नयेत. त्यांचे आरोग्य जपले जावे यासाठी सोलापूर महापालिका आरोग्य विभाग उष्माघात कृती आराखडा राबवित आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली आहे.



**आरोग्य केंद्रातील उष्माघात कक्षात सुविधा उपलब्ध**

प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रात उष्माघात कक्षात रुग्णांसाठी बेड, सलाईनची व्यवस्था , ओ.आर.एस कॉर्नर या सह औषधोपचारासाठी आवश्यक असलेली सर्व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच वाढत्या उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या आजारांसह होणारे दुष्परिणामाबाबत जनजागृतीही करण्यात येत आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. नागरिकांनी कुलरसह, उष्णतारोधक पेंट घराच्या छतावर मारल्यास २ ते ३ डिग्री तापमान कमी होण्यास मदत होईल. नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेतील तीव्र उन्हात फिरु नये तसेच नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने केले आहे.

**ही आहेत उष्माघाताची कारणे, लक्षण**

उन्हाळयात हमाल, शेत मजूर, विट भटटी कामगार फार वेळ कामे करणे, कारखान्याच्या बॉयलर रूम मध्ये काम करणारे, अधिक तापमानाच्या खोलीत काम करणे, घट कपडयांचा वापर आदी. तर उष्माघाताची लक्षणे म्हणजे थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, पोट-यात वेदना किंवा गोळे येणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी अस्वस्थता, बेशुध्द अवस्था ही लक्षणे आहेत.


**हे आहेत प्रतिबंधात्मक उपाय**

सकाळी किंवा सायंकाळी शक्यतो कमी तापमापान असताना कामे करावीत. सैल पांढऱ्या रंगाचे कपडे वापरावे. सरबत, पन्हे किंवा साधे पाणी अधून मधून घेत राहावे. उन्हात बाहेर जाताना डोक्यावर टोपी, टॉवेल किंवा उपरणे वापरणे. उन्हात बाहेर पडताना गॉगल किंवा चष्माच्या वापर करावा. लहान मुलं किंवा प्राण्यांना कार मध्ये बंद करून जाऊ नये. विशेषतः लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि ज्येष्ठ नागरिक यांनी शक्यतो सकाळी किंवा सायंकाळीच कामानिमित्ताने घराबाहेर पडावे. बाहेरील ज्युस, पाणी व खाद्यपदार्थांचा वापर टाळावा. शक्यतो फिल्टरचे पाणी, ताक, लिंबू शरबत, नारळ पाणी याचा वापर करावा, असे आवाहन महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.

# इनामदार गुरुजी यांच्या पुण्यतिथी निमित्त उद्या धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर व परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज यांचे परमशिष्य श्री दिगंबर पांडुरंग इनामदार गुरुजी यांच्या ४१व्या पुण्यतिथी निमित्त वैशाख शुद्ध दशमीला बुधवारी (दि.७) सम्राट चौक येथील सद्गुरु श्री प्रभाकर स्वामी महाराज मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता गुरु गीता पारायणाची समाप्ती होणार आहे. तसेच सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत भजन होईल. दुपारी १२ वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर भाविकांना खीर, वांगेचा महाप्रसादाचे वाटप होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित रहावे, असे आवाहन श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्टचे चीफ ट्रस्टी मोहन बोड्डू यांनी केले आहे.



हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## ए. डी. जोशी १०० टक्के निकाल : क्षीरसागर व मोरे प्रथम


योगेश क्षीरसागर


हर्षाली मोरे

**सोलापूर, दि. ५ मे-**
ए.डी. जोशी ज्यु. कॉलेजचा क्षीरसागर योगेश उमेश ८९.३३ टक्के गुण व मोरे हर्षाली प्रशांत ८९.३३ टक्के मिळवून प्रथम आले. बागलकोट हर्षवर्धन अरविंद ८८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तसेच इंगळे हर्षाली शैलेशकुमार ८६.६७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. महाविद्यालयातील एकूण २३३ विद्यार्थी प्रविष्ट झाले असून सर्व विद्यार्थी उत्कृष्ट रित्या उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला. याचबरोबर कै. अलकनंदा जोशी ज्युनिअर कॉलेजचाही शंभर टक्के निकाल लागला. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रा.ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी व प्राचार्य प्रविण देशपांडे यांनी अभिनंदन केले.

# बारावीचा जिल्ह्याचा निकाल ८८.६२ टक्के

## कॉफीमुक्त अभियानामुळे टक्केवारीत घट | कला शाखेत अनुत्तीर्णांचे प्रमाण आधिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**
सोमवारी ५ मे रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकचा निकाल जाहीर केला . सोलापूर शहर जिल्ह्यातील बारावीचा निकाल लागला असून गतवर्षीपेक्षा यावर्षी उत्तीर्ण विद्यार्थी संख्येत घट झाली आहे. जिल्हा प्रशासनाकडून कॉफीमुक्त अभियानासह विविध नवीन संकल्पना राबविल्याने उत्तीर्ण विद्यार्थी टक्केवारीत घट झाल्याचे सांगण्यात येत आहे. गतवर्षी जिल्ह्याचा निकाल ९३ टक्के लागला होता, तर यावर्षी त्यामध्ये घट होऊन तो ८८.६२ टक्यावर आला आहे. या परीक्षेत कला विभागातील अनुत्तीर्ण विद्यार्थी प्रमाण अधिक आहे. बारावीच्या परीक्षेत मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण प्रमाण अधिक आहे.

सोलापूर शहर जिल्ह्यात यावर्षी ५४८७५ विद्यार्थ्यांपैकी ५४३५३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ४८१६८ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. बारावीत शिकणाऱ्या ५४८७५ पैकी ३०५७४ मुले व २४३०१ मुली शिकत होते. यापैकी ३०२९३ मुले तर २४०६० मुली असे एकूण ५४३५३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते.त्यापैकी २५६४१ मुले व २२५२७ मुले असे एकूण ४८१६८ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यावर्षी जिल्ह्यातून ८८.६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून गतवर्षीपेक्षा यावर्षी ५ टक्के निकाल कमी लागले आहे. यावर्षी ११ फेब्रुवारी ते १८ मार्चपर्यंत बारावीच्या परीक्षा पार पडल्या. बारावी परीक्षादरम्यान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी कॉफीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी नवनवीन संकल्पना राबविले.


**सोलापूर : बारावीचा निकाल जाहीर होताच सोमवारी दुपारी सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील उत्तीर्ण विद्यार्थिनींनी प्राचार्यासमवेत जल्लोष केला. (छायाचित्र : केवल तिवारी)**

ड्रोनद्वारे परीक्षा केंद्रावर नजर, व्हीडीओ रेकॉर्डींग, परीक्षा केंद्रात मोबाईल कॅमेराद्वारे नियंत्रण, पर्यवेक्षक व कर्मचारीसह परीक्षा केंद्र आदलाबदल, बैठे पथक यासारख्या संकल्पनेमुळे बारावी परीक्षा कालावधीत कॉफी आढळले नाही. त्याचा परीणाम उत्तीर्ण विद्यार्थ्यांवर झाल्याचे दिसून येते. कला, विज्ञान व वाणिज्य विभागात कला विभागात अनुत्तीर्णचे प्रमाण अधिक आहे. जिल्हा प्रशासनाच्या नियोजनामुळे बारावी परीक्षेदरम्यान अनुचित प्रकार न घडल्याने विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा दिली. उच्च शिक्षण घेण्यासाठी बारावी वर्गातील परीक्षांचे गुण म हत्वाचे मानले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचे बारावीच्या निकालाकडे लक्ष लागले होते. सोमवारी निकाल लागताच पालकांनी पाल्याचा निकाल हाती पडताच पुढील शिक्षणासाठी धावपळ सुरू केल्याचे दिसून येत होते. सोलापूर शहरामधील अनेक उच्च माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजमधील उत्तीर्ण विद्यार्थी प्रमाण अधिक आहे.

### कॉफीमुक्त अभियान यशस्वी

“ जिल्हा प्रशासनाच्या विविध संकल्पनेमुळे कॉफीवर नियंत्रण ठेवण्यात यश आले. परीक्षा केंद्रावर मोबाईलद्वारे व्हीडीओ रेकॉर्डींग करण्यात आल्याने कॉफी प्रकार आढळून आले नाही. जिल्हा प्रशासनाच्या कॉफीमुक्त अभियानामुळे बारावीचा निकाल गुणवत्तापूर्ण व पारदर्शक निकाल आहे.
**- सचिन जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर**

### विज्ञान ९७, वाणिज्य ८९, कला ७३ टक्के

सोलापूर शहर जिल्ह्यातून विज्ञान शाखेतून ३१२०४ परीक्षार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ३०१९५ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा निकाल ९७ टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेतून ६१११ परिक्षार्थ्यांपैकी ५४६० परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून वाणिज्य शाखेचा निकाल ८९ टक्के लागला आहे. तर कला शाखेतून १५६६१ परीक्षार्थीपैकी ११४७९ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले असून ७३ टक्के निकाल लागला आहे.

### कूसूरमधील स्वामीला सर्व विषयात ३५ गुण



मंद्रुप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महा विद्यालयात शिकणाराकूसूर येथील निरंजन श्रीशैल स्वामी या विद्यार्थ्यांने सर्व विषयात ३५ गुण घेऊन ३५ टक्के निकालाने उत्तीर्ण झाला आहे. त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ▸▸ शाळांची कामगिरी...



### शांती कॉलेजचा १०० टक्के निकाल; सय्यद प्रथम



**सोलापूर, दि. ५ मे-**
संतोषनगर, विजापूर रोड येथील शांती ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा १०० टक्के निकाल लागला आहे. प्रथम क्रमांक मुन्नावर आखतार सय्यद ८१.१७ टक्के, द्वितीय अमुल्या गणप्पा ७७.१७ टक्के, तृतीय सिद्धी बुलबुले ७६.१७ टक्के गुण मिळविले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सिध्देश्वर अण्णाराव पाटील, संस्थेचे अन्य सदस्य, प्राचार्य रजुला मॅक कॉलेजम धील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### नागेश करजगी ऑर्किड १००टक्के : मलानी प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
बारावी परीक्षेत नागेश करजगी ऑर्किड ज्युनिअर कॉलेजने उल्लेखनीय यश संपादन केले जानव्ही मलानी हिने ८९.८३ टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळविला. सोहम पुजाळ याने ८६ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला तसेच जानव्ही कल्याणकर व संकेत ज्योतिबा घाडगे यांनी ८३.५० टक्के घेवून तृतीय क्रमांक मिळविला. दरवर्षाप्रमाणे याही वर्षी कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभूते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्य स्मिता कुलकर्णी, प्राचार्या रुपाली हजारे यांनी अभिनंदन केले.

### हरिभाई देवकरण ९१.९४ टक्के

**सोलापूर, दि. ५ मे-**
हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९४.२४ टक्के लागला आहे. कला शाखेचा निकाल ८१.४१ टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ९७.२० टक्के लागला असून ४४७ पैकी ४११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण निकाल ९१.९४ टक्के लागला आहे. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, पर्यवेक्षक एस. एस. कुंभार, बी. डी.बनसोडे, ए. सी. राऊत यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे पेढे देऊन कौतुक केले.

### रखमाबाई हत्तुरे ९६.३६ टक्के : अंकिता सुतार प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
बारावी परीक्षेत रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९६.३६ टक्के लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.७३ टक्के तर कला शाखेचा ९०.३२ टक्के निकाल लागला. विज्ञान शाखेत अंकिता सुतार ८५.१७ टक्के, सुरेश माने ८२ टक्के, तृतीय अपूर्वा स्वामी ७८ टक्के मिळविले. कला शाखेत प्रथम दिव्या स्वामी ७१.३३ टक्के, द्वितीय सावित्री पांढरे ६६.१७ टक्के, तृतीय राधिका लोहार ६०.८३ टक्के क्रमांक मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे संस्थेचे संस्थापक अप्पासाहेब हत्तुरे, अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, सचिव नागप्पा सिंदगी, प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे यांनी अभिनंदन केले.





### सेवासदन ९३ टक्के : डांगे, गायकवाड प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९३ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९८.२७ टक्के, वाणिज्य शाखेचा ९० टक्के तर कला शाखेचा ७७ टक्के निकाल लागला आहे. महाविद्यालयातील ९ विद्यार्थिनी विशेष प्राविण्य, २१ विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत तर ६१ विद्यार्थिनी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत.

विज्ञान शाखेची प्रज्ञा डांगे हिने ८४.५० टक्के गुण घेऊन महाविद्यालयात आणि विज्ञान शाखेत सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला. पूजा नामदेव ढवळे या विद्यार्थिनीने ८१.८३ टक्के गुण मिळवत महाविद्यालयात द्वितीय आणि वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मिळविला. मानसी संतोष गायकवाड या विद्यार्थिनीने ८१ टक्के गुण मिळवत महाविद्यालय तृतीय क्रमांक तर कला विभागात प्रथम क्रमांक मिळविला. महाविद्यालयाचा शाखानिहाय निकाल- कला शाखा : प्रथम मानसी गायकवाड (८१ टक्के), द्वितीय राणी शिंदे (७४.६७). वाणिज्य : प्रथम पूजा ढवळे (८१.८३), द्वितीय तृप्ती चोपडे (७८). विज्ञान : प्रथम प्रज्ञा डांगे (८४.५०), द्वितीय भक्ती कल्पवृक्ष (८०.३३). यावेळी गुणवंत विद्यार्थिनींचा प्राचार्यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे सेवासदन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती शीला मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, शालेय समिती अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, सचिव सौ. वीणा पतकी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा.पद्मकुमार उपाध्ये, प्रा. मधुरा गोगटे यांनी अभिनंदन केले.

### एसव्हीसीएस ८९.६९ टक्के : अंबुलगी, वाघमोडे प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
होटगी येथील एसव्हीसीएस कनिष्ठ म हाविद्यालयाचा बारावीचा निकाल ८९.६९ टक्के लागला आहे. कला शाखेचा ८५.४८ टक्के निकाल असून ६२ पैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा ९७.१७ टक्के निकाल लागला असून ३५ पैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

त्यांचे काशी पीठाचे जगद्गुरु श्रीश्रीश्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे अध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, सचिव एस.जी. स्वामी, प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्रविभाग प्रमुख केदार गंगदे यांनी अभिनंदन केले.

**प्रथम तीन : कला :** ऐश्वर्या अंबुलगी (८५.५३ टक्के), लक्ष्मी चव्हाण (८४.६७), निशा प्रचंडे (७७.५०). **वाणिज्य :** चतुरा वाघमोडे (७९.६७), राधिका सरसंबे (७७.८३), दिक्षा गायगवळी (७७.५०).

### गांधी नाथा रंगजी महाविद्यालयाचा ९४ टक्के निकाल; शर्वरी चव्हाण प्रथम



**सोलापूर, दि. ५ मे-**
उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत गांधी नाथा रंगजी कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स ज्युनियर कॉलेज सोलापूर येथील विद्यार्थांनी घवघवीत यश संपादन करत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा निकाल ९४ टक्के लागला आहे. शर्वरी चव्हाण ७६.६७ टक्के (प्रथम) शिवानंद हिरेमठ ७०.५० टक्के (द्वितीय) स्वयंम मंडलिक ७०.३३ टक्के ( तृतीय) यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच अध्यक्ष संजय गांधी, प्राचार्या स्मिता पुरवत, अमोल कांबळे आदींनी अभिनंदन केले.



### वालचंद कला शास्त्र ९८.८५ टक्के प्रणिती दासरी, सानिया शेख प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
सोलापर : वालचंद आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८.८५ टक्के तर कला शाखेचा ७५.६४ टक्के इतका लागला. या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, समन्वयिका सारिका महिंद्रकर आदी उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी : **(विज्ञान)** प्रणिती दासरी (८८.८३%, प्रथम), अथर्व गौर व अमुल्या पाटील (८७.८३, द्वितीय), सक्षम फडे व साई किरण कुडक्याल (८७.१७, तृतीय). **कला:** सानिया शेख (९२.६७% प्रथम), प्रज्ञा बांगड (९२.१७,द्वितीय)नंदिनी स्वामी (८९.८३तृतीय)



### कुचन ८६.९१ टक्के सतीश बोड्डू प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
कुचन प्रशाला कनिष्ठ म हाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागाचा बारावी परीक्षेचा निकाल ८६.९१ टक्के लागला. कला विभाग ५३.१६ टक्के,वाणिज्य विभाग ९४.१७ टक्के, शास्त्र विभाग ९८.१३ टक्के, व्यवसाय विभाग ८१.९८ टक्के.

परीक्षेसाठी कला, वाणिज्य व शास्त्र विभागातून ३५९ विद्यार्थी विधार्थिनीनी परीक्षा दिली. त्यापैकी ३१२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कनिष्ठ महाविद्यालयातून सतिश सदानंद बोड्डू यांनी ८५.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, अभिषेक किसन नल्ला ह्याने ८१.३३ गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळवला तर वेन्नेला अंबादास बोडा याने ७९.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कम टम व शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर यांनी अभिनंदन केले.

### सुयश गुरुकुल १०० टक्के श्रावणी सारणे प्रथम

**सोलापूर, दि. ५ मे-**
सुयश गुरुकुल, ज्युनिअर कॉलेजचा बारावी (सायन्स)बोर्ड निकाल १०० टक्के लागला आहे.

परीक्षेस एकूण २० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी सहा विद्यार्थ्यांना PCM² ग्रुप मध्ये ८० टक्के पेक्षा अधिक गुण मिळाले. ९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत आहे. श्रावणी सारणे प्रथम.(PCM² ग्रुपमध्ये ९२.६७% Physics- ९४) श्रद्धा वाकडे - Mathematics ९५, सायली भोसले- Chemistry ९१ गुण संपादन केले.




पवित्र तुमची स्मृती, अनंत तुमची माया ।।
नित्य असु द्या आम्हावरती, अखंड तुमची छाया ।
तुमच्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली ।

**कै. सरोजना सिद्धेश्वर वंगारी**
निर्वाण : शनिवार दि. २६.०४.२०२५, चैत्र कृ. १४ शके १९४७

**।। अकरावा दिवस ।।**

आमचे आई कै. सरोजना सिद्धेश्वर वंगारी यांचे दि. २६-०४-२०२५ रोजी सकाळी देवाज्ञा झाली. आमचे कृपाछत्र हरपले. आमच्यावर कोसळलेल्या दु:खद प्रसंगी आपण जो धीर दिलात त्याबद्दल आम्ही शतशः ऋणी आहोत. मंगळवार दि. ०६-०५-२०२५ रोजी '**अकरावा दिवस**' करीत आहोत. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

✻ शोकाकुल ✻
**समस्त वंगारी परिवार**

✻ स्थळ ✻
**स्वगृही, गेट नं. १, ए-२, महेश थोबडे नगर, शेळगी, सोलापूर.**
भोजन : दुपारी १ ते ३ कार्यस्थळी


## शालेय विद्यार्थ्यांना दोन दिवसात दाखले मिळणार!

### ✔ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ०५ मे-**
आज (दि. ०५) १२ वी परीक्षेचा निकाल लागला असून, इ. १० वीचाही निकाल लवकरच लागणार आहे. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्पन्न दाखले, रहिवासी दाखले व इतर दाखल्याची पुढील शिक्षणासाठी आवश्यकता असते. यामुळे या विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यास दोनच दिवसात दाखले दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.



फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा निकाल सोमवारी लागला आहे. जवळपास ४८ हजार हुन अधिक विद्यार्थी पास झाले आहेत. त्यांना पुढील वर्गात किंवा इतर ठिकाणी प्रवेश घेण्याकरीता विविध दाखले, प्रमाणपत्रांची गरज असते. यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांचीही पळापळ होवू नये, म्हणून महा ई सेवा केंद्र,सेतू कार्यालय अथवा आपले सरकार, ग्राहक सेवा केंद्रात त्यांनी अर्ज केल्यास दोनच दिवसात त्यांनी मागणी केलेले दाखले मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. इतकेच नाहीतर या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पही घेण्यात येणार आहेत. विहीत नमुन्यातील अर्ज, आवश्यक ती कागदपत्रे ऑनलाईन जमा केल्यावर त्यांना दाखले ऑनलाईन पध्दतीने दिले जाणार आहेत. दरम्यान, दाखल्यांसाठी शासनाने ठरवून दिलेल्या फी व्यतिरिक्त जादा फी मागितल्यास 'क्यू आर कोड' स्कॅन करून तक्रार करावी, असे आवाहन देखील विद्यार्थी व पालकांना करण्यात आले आहे.




### वाढदिवसानिमित्त नम्र निवेदन



नुकताच पहलगाम येथे अतिरेक्यांनी भ्याड हल्ला करून निरपराध २६ नागरिकांचा जीव घेतला. या हल्ल्यामुळे व निरपराध पर्यटकांच्या मृत्यूमुळे संपूर्ण देश, सर्व जाती धर्मातील लोक शोक सागरात बुडाले. अशा परिस्थितीत माझा वाढदिवस साजरा करणे योग्य वाटत नाही. त्यामुळे उद्या ७ मे रोजी माझ्या वाढदिवसानिमित्त मी कोणत्याही शुभेच्छा तसेच हारे तुरे स्वीकारणार नसून आपल्या सर्वांच्या शुभेच्छा, शुभ आशीर्वाद, सदिच्छा माझ्यासोबत नेहमीच असतात, याबद्दल मी आपल्या सर्वांचा ऋणी असून आपल्या शुभेच्छा नेहमी माझ्यासोबत राहावेत हि विनंती.

**आपला**
**ब्रिजमोहन फोफलिया**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०७

**पतिव्रतेचे हृदय जैसे । पती वांचूनि न स्पर्शे ।**
**मी सर्वस्व या तैसे । सुभटांसी ॥**

दुर्योधनाबद्दल बोलतांना माऊलींनी येथे पतिव्रता स्त्रीचा दृष्टांत दिला आहे. वारकरी सांप्रदायाने स्त्रीला अत्यंत महत्वाचे स्थान दिले आहे. पत्नीव्रतेचे हृदय न म्हणता पतिव्रतेचे असा दृष्टांत येथे दिला आहे. पतिव्रता स्त्री आपला पती गरीब, खुळा, काळा, बुटका कसा जरी असला तरीही कोणत्याही परिस्थितीत किंवा कोणत्याही लालसाला बळी न पडता ती आपल्या पतीशीच एकरुप राहाते. आपल्या शरीराला ईतराचा किंवा ईतराच्या शरीरीला स्वत:चा स्पर्श होण्याची भाषा तर दुरच राहीली पण पतिव्रता स्त्री हृदय, मन सुध्दा ईतराशी स्पर्श होऊ देत नाही. असे सांगुन माऊलींनी पतिव्रता स्त्रीची महानता येथे स्पष्ट केली आहे. पतिव्रता स्त्री महानच असते यात दुमत असण्याचे कारणच नाही. असो, संजयाने राजा धृतराष्ट्राला पांडव सैन्याच्या बाजूने सविस्तर सांगून त्रस्त केले, तेव्हा राजाने कौरव बाजू सांगण्यास सांगीतले. त्यावर संजयाने सांगीतले की दुयोर्धनाच्या बाजुलाही काही कमी महावीर नाहीत. मोठ-मोठे यौध्दे दुर्योधनाच्या बाजूला आहेत. दुर्योधनाला पांडव सैन्याची अजिबात भिती वाटत नाही असे दुर्योधनाचे युध्दभूमीवरचे वर्तन आहे. अन्यायाच्या बाजूला किंवा नितीनियमाच्या विरुध्द आपण आहेत असे दुर्योधनाला अजिबात वाटत नाही. आपण असत्याच्या बाजूला असल्याने आपला पराजय होईल ही भावनाही त्याच्या मनाला शिवत नाही. अज्ञानी, अहंकारी, स्वार्थी, नितीभ्रष्ट माणसाचेही असेच असते. आपण चुकत आहोत किंवा आपण अन्याय करीत आहोत असे यांना वाटत नाही. आपणच योग्य असल्याने आपण जिंकणार असेच यांना वाटत असते. केवळ सत्ता, पैसा, बळ म्हणजे सर्वस्व नसते. त्यासाठी नितिमत्ताही असावी लागते. दुर्योधन हे एक असे पात्र आहे की ज्याकडे पाहून माणसाने आपल्यात परिवर्तन करुन घेतले पाहिजे, चुकांच्या दुरुस्त्या केल्या पाहिजेत. व्यास महर्षिनी या पात्राला अत्यंत बारकाईने प्रस्तुत केले आहे. आमच्यातील दुर्योधनीवृती निघून जावी हा या पाठीमागचा हेतू आहे. स्वत:ची चूक मान्य करायला मनाचा मोठेपणा लागतो याचा विसर पडता कामा नये. दुर्योधन जरी अनितीच्या बाजूने असला तरीही स्वार्थ, द्वेष, मोह, अभिमान, लोभ अशा अंतर्गत व मानसिक शत्रूंनी त्याला आपण म्हणजे सर्वस्व या विचारापर्यंन्त आणून सोडले आहे. आपल्या बाजूच्या सर्व वीर यौध्दयाबद्दल, सैन्याबद्दल बोलतांना त्यास प्रचंड आत्मविश्वास आहे की, आपण म्हणजे या सर्वांसाठी जीव की प्राण आहोत. जसे पतिव्रता स्त्रीसाठी तीचा पती म्हणजे सर्वस्व, पतीशिवाय तीचे हृदय, मन सुध्दा ईतरांना स्पर्श करीत नाही. त्याप्रमाणे सर्व सैन्यासाठी, महावीरासाठी मी म्हणजे पतिव्रता स्त्रीच्या पतीप्रमाणे सर्वस्व आहे असे दुर्योधनाचे गुरुजवळ म्हणणे आहे. सर्व सैन्याच्या बळावर व विश्वासावर दुर्योधनाला सत्याच्या विरुध्द लढण्याची भीती सुध्दा वाटत नाही. अनेकांचेही असेच असते. सत्ता, धनाच्या बळावर वाटेल ते करण्याची मानसिकता ते ठेवतात.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - चांगला दिवस, राजर्षी छ. शाहू महाराज पुण्यतिथी |
| दि. ६ मे २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसू | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - वैशाख | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. नवमी (०८.३८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - मघा (१५.५०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - ध्रुव (२४.२८) | |
| करण - तैतिल (२१.२४) | |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या कामातील नियमितपणाच आपल्याला यश देणार आहे. दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.
**वृषभ :** शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल. आळस झटकून कामास लागा.
**मिथुन :** धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी महत्वकांक्षा पूर्ण होईल. साहस, पराक्रमात वाढ होईल. फुकटचा मोठेपणा स्तुतीपासून दूर रहा.
**कर्क :** घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका. व्यापार व्यवसायात प्रगती होईल.
**सिंह :** गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. तणावाकडे लक्ष न देता कामे करा.
**कन्या :** प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागण्याचा योग आहे.
**तुळ :** संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील.
**वृश्चिक :** अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.योजलेले कामे पार पडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.
**धनु :** फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.
**मकर :** मान सन्मान मिळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. मुलांच्या कामाच्या बाबतीत समाधानी रहाल.
**कुंभ :** स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. काही निर्णय चूकीचे ठरण्याची शक्यता आहे.
**मीन :** जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

# शिक्षकांच्या बदली प्रक्रियेसाठी मागवली माहिती

## पालिकेच्या एकाच शाळेत १० वर्ष सेवा झालेल्यांची माहिती होणार संकलित ; ७० शिक्षक बदली प्रक्रियेस प्राप्त

### तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत महापालिका शाळांमधील शिक्षकांची बदली प्रक्रिया राबविण्यासाठी आवश्यक ती माहिती प्रपत्रकातून सादर करण्याच्या सूचना मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. दरम्यान, एका शाळेत १० वर्ष सेवा झालेल्या संबंधित शिक्षकांची माहितीही संकलित करण्यात येत आहे. बदली प्रक्रियेला आता गती मिळत असल्याचे दिसून येते. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी यांनी यासंदर्भात महापालिकेच्या सर्व शाळा मुख्याध्यापकांना सूचना दिल्या आहेत. दोनची मे पर्यंत ही माहिती प्रपत्राद्वारे सादर करण्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार विविध शाळांच्या मुख्याध्यापकांनी ही माहिती ही दिली आहे. सुमारे ७० शिक्षक या बदली प्रक्रियेसाठी पात्र ठरणार असल्याचे दिसून येते.

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाअंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या एकूण ५८ शाळा आहेत. महापालिका शाळांमध्ये एकूण २२७ शिक्षक कार्यरत आहेत. प्राथमिक शिक्षण मंडळाचे तत्कालीन प्रशासन अधिकारी संजय जावीर यांनी सन २०२३ मध्ये महापालिका शाळांमधील शिक्षकांचे बदली धोरण निश्चित केले होते. तत्कालीन महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांच्या आदेशानुसार हे बदली धोरण नेटक्या पद्धतीने राबविण्यात आले होते. एकाच शाळेत १० वर्ष सेवा करणाऱ्या शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर त्यानुसार नियमित बदल्या धोरण राबविणे आवश्यक होतो होते मात्र यामध्ये खंड पडला असल्याचे दिसून येते. सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या मनपा शाळांच्या शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया अद्याप राबविण्याच्या हालचाली दिसून येत नसल्याने प्रसार माध्यमाने याकडे लक्ष वेधले होते. त्यानंतर या बदली प्रक्रियेसाठी महापालिका प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू झाल्या आहेत. संकलित माहितीच्या आधारावर ही बदली प्रक्रिया राबविण्यात येईल.

सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी प्रशासन अधिकारी पदाचा कार्यभार सध्या महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे आहे. तर नियंत्रण अधिकारी म्हणून उपायुक्त किरण मोरे हे आहेत. यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने याकडे लक्ष घातले असल्याने बहुतांश शिक्षकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

> **काही शिक्षकांना शाळा सुटवेना; प्रक्रिया रद्दसाठी प्रयत्न !**
>
> दरम्यान, काही शिक्षकांना त्यांच्या शाळा सुटवेना झाले असल्याचे चित्र आहे. शिक्षकांच्या बदल्या करू नये यासाठी शिक्षक संघटनेने महापालिका उपायुक्त किरण मोरे यांना निवेदनही दिले आहे. प्रशासकीय धोरण महत्त्वाचे असून नियमानुसार बदली करणे गरजेचे आहे. कोणताही संभ्रम न ठेवता महापालिकेच्या कर्तव्यदक्ष वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बदली प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता आहे.

# मंद्रुप ग्रामपंचायत दप्तर तपासणीची मागणी

## तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी पुजारी यांच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे -**

मंद्रुपचे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी सोमण्णा पुजारी यांच्या कार्यकाळात विकासकामे न करता बिल काढल्याचे आरोप असून दक्षिणचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

वर्षभरापूर्वी एप्रिल महिन्यात सोमण्णा पुजारी यांनी ' राजकीय वजन ' वापरून मंद्रूप ग्रामपंचायत पदभार स्वीकारला. मात्र त्यानंतर ग्रामपंचायत सदस्य व नागरीकांकडून पुजारी यांच्याविरोधात वारंवार तक्रारी वाढतच गेले.त्यामुळे पुजारी यांनी शरीर अस्वास्थ्यामुळे मंद्रुप ग्रामपंचायत पदभार सोडत असल्याचे वरिष्ठांना कळविले . प्रभारी ग्रामपंचायत अधिकारी म्हणून नागेश जोडमोटे यांच्याकडे पदभार देण्यात आले आहे . मात्र पुजारी यांच्या आठ महिन्याच्या कार्यकाळात विकासकामे न करता बिल काढल्याचे व इतर कर रक्कमेत घोटाळा झाल्याचे तक्रार करण्यात आले आहे. फेब्रुवारी महिन्यात पुजारी यांच्या आठ महिन्याच्या कार्यकाळातील दप्तर तपासणीची मागणी करण्यात आली आहे. मात्र पंचायत समितीकडून तक्रारदारांना दप्तर तपासणीचे अद्याप माहीती देण्यात आले नाही. त्यामुळे प्रशासनाबद्दल संशय व्यक्त करण्यात येत आहे.

> **दप्तर पंचायत समिती कार्यालयात**
>
> मंद्रुपचे तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी सोमण्णा पुजारी यांच्या कार्यकाळातील दप्तर तपासणीसंदर्भात तक्रार करण्यात आल्यानंतर गेल्या आठवडयात मंद्रुप ग्रामपंचायतला भेट देऊन पंचायत समिती कार्यालयात ग्रामपंचायत दप्तर जमा करण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान घोटाळा आढळल्यास पुजारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल.
>
> **- संदिप खरबस,**
> विस्तार अधिकारी, पंचायत समिति, दक्षिण सोलापूर

### सासूकडून जावयास दगडाने मारहाण

**सोलापूर** - मागील भांडणाचा राग मनात धरून सासूकडून जावयाला दगडाने मारहाण करण्यात आल्याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नितीन बाबू भोसले (वय ३०, रा. दामले वस्ती, मुळेगाव रोड, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन उषा समीर शिंदे, वैशाली बंडू पवार, बंडू पवार, पृथ्वीराज शिंदे (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मे रोजी रात्री दहाच्या सुमारास गुरुनानक चौक येथे उषा शिंदे व इतरांनी मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून जावई नितीन भोसले यास हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून दगडाने मारून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# श्राविका संस्थेत महाराष्ट्र, कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ मे-**

सम्राट चौक येथील श्राविका संस्थानगर येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त देवई शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव यतीन शहा, विश्वस्त देवई शहा, करण शहा, वरिष्ठ दिप्ती शहा, विभाग प्रमुख सुकुमार मोहोळे, स्वाती कांबळे, मुख्याध्यापिका राखी देशमाने, पाटील, लेंगरे, रत्नपारखे आदी उपस्थित होते.प्रास्ताविक आळंगे यांनी केले. सूत्रसंचालन सविता जाधव यांनी केले. विश्वकांत क्षीरसागर यांनी आभार मानले.

# संभाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

## सोलापुरात प्रथमच फोक आख्यान पोवाड्याचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंतीनिमित्त दि. १२ ते १४ मे दरम्यान विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष राम जाधव आणि उत्सव अध्यक्ष निशांत सावळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महामंडळाच्या वतीने सोमवार दि. १२ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील शिंदे चौक येथे मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. याच दिवशी सायंकाळी ६.३० वाजता शिंदे चौक येथे फोक आख्यान पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शाहीर चंद्रकांत माने हे हा कार्यक्रम सादर करणार आहेत. शनिवार दि. १० मे रोजी अवंती नगर सोलापूर येथे आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. रविवार दि. ११ मे रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे तलवारबाजी उपक्रम आयोजित केला आहे. त्याचबरोबर विविध भागात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात येणार आहे. बुधवार दि. १४ मे २०२५ रोजी छत्रपती संभाजी महाराज चौक येथून महामंडळाच्या वतीने मिरवणूक काढणाऱ्या सर्व मंडळांचा सत्कार करण्यात येणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक आणि बाळीवेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक हा मिरवणूक मार्ग राहणार आहे, असे राम जाधव आणि आतिश बनसोडे यांनी सांगितले.

दरम्यान, यंदाच्या वर्षी शंभूराजे मनामनात-शंभू जयंती घराघरात हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यातील अठरापगड जातीच्या शिवशंभू भक्तांनी १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आपल्या घरात साजरी करावी, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष राम जाधव यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सोहन लोंढे, राज सलगर , संदीप चेळेकर, पवन आलूरे, राहुल दहिहांडे, सुरज पाटील आदी उपस्थित होते.

# रविवारी ढोर समाजातील वधू-वरांचा मेळावा

**सोलापूर, दि. ५ मे-**

समस्त कक्कया समाज महासंघ आणि समस्त वीरशैव कक्कया बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने ढोर समाजातील वधू- वरांचा मेळावा आणि स्नेहसंमेलन रविवार दि. ११ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष जितेंद्र होटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापुरातील शिव छत्रपती रंगभवन सभागृहात हा मेळावा होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे राहणार आहेत. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. विठ्ठल कटकधोंड , राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल, निवृत्ती सावळकर, शीला शिंदे, उद्योजक दत्ता सुरवसे, मल्लिकार्जुन गजरे , क्रांती सावळकर, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवने , शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे , अमरावती विभागाचे उद्योग सहसंचालक रंजना बोराडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस संगीता कोकणे, सुनंदा इंगळे, हर्षा शिंदे आदी उपस्थित होते.

**शहर गुन्हे शाखेची कारवाई**

# घरफोड्या करणाऱ्या पेंटरला अटक

## पाच गुन्हे उघडकीस; पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मे -**

घरफोड्या व चोऱ्या करणाऱ्या पेंटरला शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून घरफोडी-चोरीचे ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. या पेंटरकडून पोलिसांनी २ लाख ६४ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शिवा सत्यनारायण अलवाल (वय २९, रा. पद्मशाली चौक, दाजी पेठ, सोलापूर सध्या रा. शिवसेना नगर, नवीन विडी घरकुल, हनुमान मंदीराजवळ, कुंभारी, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. शिवाकडून जेलरोड, सलगर वस्ती, फौजदार चावडी व सदर बझार पोलिस ठाण्यातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

रविवार पेठेतील २५६ गाळा येथील संतोष अंबादास येरला व त्यांचे कुटुंबिय २० जानेवारी २०२५ रोजी देवदर्शनासाठी पंढरपूर येथे गेले असता त्यांच्या घरी चोरट्याने चोरी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला होता. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर या गुन्ह्याचा समांतर तपास शहर गुन्हे शाखेच्या पथकांकडून सुरु होता.

त्यावेळी पोलिस पथकास खबऱ्यामार्फत येरला याच्या घरी त्याच्याच नातेवाईक असलेल्या शिवा अलवाल याने चोरी केली असून तो व्यवसायाने पेंटर असल्याची माहिती मिळली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शिवा अलवाल यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी अलवाल याने चोरी केल्याचे सांगितले. त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने चालू वर्षात शहरातील इतर ठिकाणीदेखील चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी शिवा अलवाल याच्याकडून विविध पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील ३५ ग्रॅम सोन्याचे दागिने, ४१५ ग्रॅम चांदीचे दागिने, १ लाख रूपये रोख रक्कम, १ गॅस टाकी, १ पितळी हांडा असा २ लाख ६४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अलवाल यास जेलरोड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, अमंलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, योगेश सावंत, सतिश काटे यांनी केली.

> **कर्जबाजारी झाल्याने पेंटर वळला गुन्हेगारीकडे...**
>
> शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केलेला शिवा अलवाल हा पेंटरचा व्यवसाय करतो. त्यातच त्याला व्यसन लागले असून तो कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे शिवाने पेंटरचा कष्टाचा व्यवसाय सोडून चोरी, घरफोडी करण्याच्या गुन्हेगारी वृत्तीकडे वळला अन् आपल्याच नातेवाईकाच्या घरी चोरी केल्याप्रकरणात अडकला.

### शहरातून दोन दुचाकींची चोरी

**सोलापूर :** शहराच्या वेगवेगळ्या भागातून दोन दुचाकींची चोरी करण्यात आली आहे. संभाजी रोहिदास कसबे (वय ४५, रा. दत्त मंदीर बाजूला, २५६ गाळा, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ डीए ९५२२ क्रमांकाची दुचाकी घरासमोर लावली होती, ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत अतिश रामचंद्र चौधरी (वय ३१, रा. न्यु बुधवार पेठ, बॉबी चौक, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ सीएल ४१६८ क्रमांकाची दुचाकी ही २८ एप्रिल रोजी रात्री बॉबी चौक येथे पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिसांकडे करण्यात आली आहे.

# सर्वांना एकत्र घेऊन काम करणारा कक्ष अधिकारी चंद्रकांत होळकर

## सीईओ कुलदीप जंगम; सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे -**

जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विभागाची सर्वात मोठी आस्थापना आहे, अशा विभागात होळकर काम करत असताना शासन निर्णय, परिपत्रके यांचा अभ्यास करून योग्य ते प्रकरणे सादर करत असत. यापुढेही त्यांच्या ज्ञानाचा उपयोग जिल्हा परिषदेला आवश्यकता भासेल, तेव्हा आम्ही घेत राहू. जनता, कर्मचारी व लोकप्रतिनीधी या सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची शैली चंद्रकांत होळकर यांच्याकडे आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले. ते कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या कक्ष अधिकारी चंद्रकांत होळकर यांचा सेवापूर्ती सत्कार कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे होते. समृद्धी सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय सांवत, अरुण क्षीरसागर, नागसेन कांबळे, सुरेश पवार , अविनाश गोडसे, सचिन जाधव, सिद्धेश्वर निंबर्गी, बापूसाब जमादार, पूर्वा वाघमारे यांच्यासह सर्व विभागाचे कर्मचारी, संरपच, जिल्हा परिषद पंचायत समिती पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते .

जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले म्हणाले, महिला बालकल्याणच्या विविध योजना राबवण्यासाठी होळकर यांनी परिश्रम घेतले. ते सर्व संघटना बरोबर संबंध ठेवून सर्वांना बरोबर घेऊन कामकाज करत होते. डेप्युटी सीईओ स्मिता पाटील म्हणाल्या, शिक्षण विभागाची आस्थापना होळकर यांनी यशस्वीपणे सांभाळले. म्हणून शिक्षण विभागाचे सर्व कामे चांगले प्रकारे करणारे अधिकारी म्हणून होळकर यांचे नाव अग्रक्रमावर आहे. भविष्यात प्रशासनला गरज भासेल तेव्हा कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन व सहकार्य करावे. शिक्षण अधिकारी कादर शेख म्हणाले की, तळागाळातील शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी त्यांचे कार्य कौतुकास्पद आहे. यावेळी होळकर म्हणाले कि, सेवा कालावधीत वंचित घटकाला न्याय देण्यासाठी प्राधान्य दिले आहे. नवनवीन योजना यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेत विविध विभागात काम करण्याची संधी मिळाले. सूत्रसंचालन भगवान बनसोडे यांने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उमाकांत राजगुरू, मकरंद बनसोडे, भगवान चव्हाण, औंदुबर बंडगर, धोंडप्पा रूपनुरे, सूर्यकांत लोखंडे यांनी प्रयत्न केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# श्री भगवंत महोत्सवाचे थाटात उद्घाटन



## हिंदी मराठी गीतांनी बार्शीकर मंत्रमुग्ध

### वर्षा उसगावकर, बेला सुलाखे, सपना अवस्थी व मोहम्मद आयाज यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.५ मे-**

बार्शी नगरपरिषद, श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था व श्री भगवंत देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'श्री भगवंत महोत्सव २०२५'चे थाटात उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर अभिनेत्री वर्षा उसगावकर, पार्श्वगायिका बेला सुलाखे, सपना अवस्थी व मोहम्मद आयाज यांनी हिंदी, मराठी फिल्मी गीते, बहारदार भावगीते व युगल गीते सादर करून बार्शीकरांना मंत्रमुग्ध केले.

महोत्सवाच्या उदघाटनावेळी या कलाकारांसह माजी आ. राजेंद्र राऊत, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, डीवायएसपी जालिंदर नालकुल, तहसीलदार एफ. आर. शेख, पोनि बालाजी कुकडे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, आसिफ तांबोळी, अनिल डिसले, कौरव माने, ॲड. अनिल पाटील, संतोष निंबाळकर, बाबासाहेब मोरे, शिवाजीराव गायकवाड, प्रशांत कथले, अविनाश मांजरे, केशव घोगरे, देवस्थान समितीचे अध्यक्ष दिलीप बुडूख, महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, बाजार समितीचे प्रशासक विजय राऊत, भारत पवार, विनायक घोडके, सुनील झालटे पाटील, प्रकाश मनगिरे, अरुण कापसे आदी उपस्थित होते. ज्याप्रमाणे महाराष्ट्रातील इतर देवदेवतांना प्रसिद्धी मिळाली आहे. त्याच पद्धतीने बार्शीतील ग्रामदैवत भगवंताचे मार्केटिंग होणे गरजेचे आहे. त्यामुळे बार्शीच्या उद्योग व्यवसायात वृद्धी होईल, असे विचार माजी आमदार राऊत यांनी यावेळी व्यक्त केले. दरम्यान गायनाच्या मैफलीची सुरूवता पहेलगाम मधील शहिदांना श्रध्दांजली वाहून झाली. यावेळी महंमद अय्याज यांनी अब तुम्हारे हवाले वतन साथीयो हे गीत सादर केले. दर्शन देरे देरे भगवंता, देवा तुझ्या दारी आलो गुणगान गाया..मोरया.. मोरया.. गीताने जोरदार सुरुवात केली. बार्शीची कन्या सुप्रसिद्ध गायिका बेला सुलाखे यांनी ईश्वर सत्य है.. सत्य ही शिव है.. सत्यम शिवम सुंदरम. आजी सोनियाचा दिनू वर्षे अमृताचा घनू.केशवा माधवा.. तुझ्या नामात रे गोडवा.चाहा तो बहोत..दिलं ही तो है..रंगीला रे,परबत के इस पार मेरी पायल की झंकार..एक प्यार का नगमा है गीते सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. वर्षा उसगावकर यांनी गंमत जमत मधील मी आले..आश्विनी ये ना.. सोबतच साथी मधील आज हम तुम ओ सनम मिलके ये वादा करेंगे अशी एकाहून एक सरस गाणी सादर केली. ज्येष्ठ गायिका सपना अवस्थी यांनी कमी बंधन जुडा लिया, कभी दान चुरा लिया या सारखी गीते गायली. कार्यक्रमासाठी महोत्सव समितीचे वासुदेव ढगे, विलास रेणके,संतोष सूर्यवंशी, अभिजित सोनीग्रा, बाळासाहेब तातेड परिश्रम घेत आहेत.




## आदर्श शिक्षक पुरस्काराने संतोष चिकणे सन्मानीत

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि ५ मे-**

गुळपोळी येथील भैरवनाथ विद्यालयातील संतोषकुमार चिकणे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मनित करण्यात आले.

सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा कृती समिती मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी पतसंस्था, मर्या. पंढरपूर जि. सोलापूर यांच्या वतिने सन २०२४ -२५ चा आदर्श शिक्षक पुरस्कार भैरवनाथ माध्यमिक विद्यालय गुळपोळी या प्रशालेतील शिक्षक संतोषकुमार नागनाथ चिकणे यांना प्राप्त झाला. या पुरस्काराचे वितरण आज पंढरपूर येथील सिंहगड इनस्टीट्युट या संस्थेत पार पडला. हा सन्मान सोहळा संस्थेचे संस्थापक चेअरमन मा.आ. दत्तात्रय सावंत व सर्व संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत पार पडला .हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष अरूणभाऊ कापसे मुख्याध्यापक प्रमोद देशमुख व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# शिव-बसव मिरवणूक जल्लोषात



## अघोरी नृत्याने वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मे -**

मित्रप्रेम युवा ग्रुपच्यावतीने महात्मा बसवेश्वर महाराज व छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित शिव -बसव मिरवणूक बार्शी येथे जल्लोष पूर्ण वातावरणात पार पडली.

आ. दिलीप सोपल, खा ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन आडवा रस्ता येथून मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी पोलीस उपाधीक्षक जालिंदर नालकुल, कीर्तनकार शिवलीला पाटील, माजी नगरध्यक्ष विश्वास बारबोले, योगेश सोपल, गणेश जाधव, मंगल शेळवणे, दगडू मांगडे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब आडके, संदीप बारंगुळे, दत्ता शिंदे, राजाभाऊ रसाळ, पो. नि. बालाजी कुकडे आदी उपस्थित होते. राहिमतपूर येथील अघोरीं नृत्य पथक, शिवलीला पाटील वारकरी संस्थेचे मुलीचे टाळ पथक, वीर फकिरा लेझीम पथक, ढोल पथक, आकर्षक बाहुल्या पथक, डी जे पथक आदींचा मिरवणुकीत सहभाग होता. अघोरीं नृत्य पथकाच्या कलानी बार्शीकरांची मने जिंकली. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी नागेश अक्कलकोटे यांच्या मार्गदर्शनाखाली शशिकांत दसंगे, विठ्ठल गुडे, अनिल चाबुकस्वार, जालिंदर देवकर, प्रफुल्ल केसकर, गणेश निंबार्गी, प्रवीण घोटाळे, आण्णा घोटाळे, प्रशांत दसंगे, कल्पित आगळे, विष्णू देवकर यांनी परिश्रम घेतले

### मशीदीसमोर कव्वाली

शाहीर अमर शेख चौकातील मदिना मशीदसमोर मिरवणूक येताच डीजे वरील कव्वाली लावण्यात आल्याने शहरवासियांनी आनंद व्यक्त केला.

# कर्मवीर महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे -**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात नुकताच माजी विद्यार्थी मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान वसंतराव देशमुख यांनी भूषवले.



प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने यांनी त्यांच्या मनोगतामध्ये महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि संशोधनातील प्रगतीचा आढावा घेतला आणि सुरू असलेल्या विविध कोर्सेस आणि उपक्रमांची माहिती दिली. सोलापूर जिल्ह्यातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या या महाविद्यालयाने ६५ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचा घडवणारा हा शिक्षण मंदिराचा मेळावा संस्मरणीय ठरला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त सचिव आणि माजी प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव यांचीही उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात दिलीप कोरके यांनी भविष्यातील मेळावा करण्याचे मान्य केले. स्नेहल राऊळे यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात महाविद्यालयाचे योगदान अधोरेखित केले. डॉ. जयश्री भोसले यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी महाविद्यालयाने केलेले सहकार्य आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा झालेला विकास याबाबी सांगितल्या. लक्ष्मी यादव यांनी शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन, दिलेले प्रोत्साहन याविषयीच्या आठवणी सांगितल्या, समाधान काळे यांनी आपल्या राजकीय व्यक्तिमत्त्व जडणघडणीत महाविद्यालयाने दिलेली संधी या गोष्टींचा उहापोह केला, प्रतीक्षा वाघमोडे यांनी कविता वाचन करून शिक्षकांप्रति आदर व्यक्त केला, डॉ. फैमिदा विजापुरे यांनी विद्यार्थी दशेतील आठवणी जाग्या केल्या, सागर पडवळ, प्रा. आर. डी. पवार यांनी मनोगत व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. सुशील कुमार शिंदे यांनी केले तर प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने यांनी उपस्थितांचे स्वागत केले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य ज्योतिराम भायगुडे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, पत्रकार जैनुद्दीन मुलाणीतसेच विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थी व प्राचार्य डॉ. टी. एन. लोखंडे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अमर कांबळे व डॉ. भारती सुडके यांनी केले. आभार डॉ. दादासाहेब हाके यांनी मानले.

# संत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी सोहळा राष्ट्रीय स्तरावर साजरा करणार

## ॲड. महेश ढवळे यांची माहिती

### शिंपी समाज पदाधिकारी बैठक




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे-**

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा ६७५ वा षटशतकोत्तर अमृत महोत्सवी संजीवन समाधी सोहळा २३ व २४ जुलै रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जाणार असल्याची माहिती अखिल भारतीय संत नामदेव क्षत्रिय एकसंघचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी दिली.


संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने अखिल भारतीय क्षत्रिय नामदेव एकसंघचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली देशभरातील नामदेव शिंपी समाजातील विविध पोटजातीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी ॲड महेश ढवळे यांची फेरनियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.. या बैठकीस संत नामदेव महाराज वंशज गुरुवर्य माधव महाराज, मुकुंद महाराज, एकनाथ महाराज, ज्ञानेश्वर महाराज , केदार महाराज यांच्यासह संस्थेचे सचिव रुपेश खांडके, उपाध्यक्ष नंदकुमार कोसबोतवार , धनंजय गोंदकर , कोषाध्यक्ष अनिल गजके, संघटक मनोज भांडारकर, कायदे सल्लागार ॲड. अजय तल्हार, प्रदेश महिला अध्यक्षा रेखा मुळतकर, सदस्य नितीन बाविस्कर, धनंजय जवंजाळ, पालखी सोहळा पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष सुभाष भांबुरे, अखिल भारतीय नामदेव छिपा युवा परिषदेचे खेमराज नामा, ॲड सागर मांढरे, दत्तात्रय पवार, पंढरपूर समाजाध्यक्ष गणेश उंडाळे , राजेश धोकटे, विलास पोहरे, प्रथमेश परांडे यांच्यासह महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यातून प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी निवृत्ती महाराज नामदास यांनी संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा संजीवन समाधी सोहळा हा राष्ट्रीय व शासकीय स्तरावर साजरा करण्यात यावा अशी मागणी समाज बांधवांनी केली. संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने श्री क्षेत्र पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांची मोफत निवास व भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष

## गहिनीनाथ महाराज औसेकर यांना शनिरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ मे -**

श्रीनाथ संस्थानचे सद्गुरु तथा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना २०२५ चा शनिरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.



नाथसंस्थानमध्ये श्री शनेश्वर देवस्थान शनिशिंगणापूरचे अध्यक्ष भागवत सोपानराव पाटील बानकर, अतुल पाटील महाराज आणि विश्वस्त मंडळाच्या मान्यवर पदाधिकाऱ्यांनी सद्गुरु गहिनीनाथ महाराज यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुरस्कार स्वीकृतिबाबतचे पत्र उचित सन्मान करून प्रदान केले व २७ मे रोजी श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथे उपस्थित राहून हा पुरस्कार स्वीकारण्याचे निमंत्रण दिले. श्री शनेश्वर देवस्थान शनिशिंगणापूर संस्थान तर्फे २००४ पासून प्रतिवर्षी हा शनिरत्न पुरस्कार महाराष्ट्रातील ख्यातनाम संत महंत सामाजिक धार्मिक व पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज व्यक्तीत्वांना देण्यात आलेला आहे यावर्षी २०२५ च्या शनिरत्न पुरस्कारासाठी नाथ संस्थानचे गहिनीनाथ महाराज औसेकर यांची सन्मानपूर्वक निवड घोषित करण्यात आली आहे.

# ६० बालके घेताहेत संगीत अन् आध्यात्मिकतेचे धडे

## खुदावाडी येथे बालसंस्कार शिबिर

### २१ दिवसांचे शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ५ मे-**

तुळजापुर तालुक्यातील खुदावाडी येथे जेष्ठ समाजसेवक डॉ सिद्रामप्पा खजूरे यांच्या संकल्पनेतून श्री संत मारुती महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १ मे पासून बालसंस्कार शिबिराची सुरुवात झाली असून २२ मे रोजी या शिबीराची सांगता होणार आहे .



पंचक्रोशीतील वीस गावातील साठ बालके या शिबीराचा लाभ घेत असुन संगीत, व्यक्तीमत्व विकासाबरोबरच आध्यात्मिककेचे धडे घेत आहेत शाळा संपली आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्या मुलांनी आपला सुट्टीतला वेळ वाया घालवू नये म्हणून जेष्ठ समाजसेवक डॉ सिद्रामप्पा खजूरे यांच्या संकल्पनेतून मुलांमध्ये व्यक्तीमत्व विकास व संस्काराची पेरणी करण्यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये हभप वैभव महाराज कानेगावकर, हभप शुभम महाराज कानेगावकर, जेष्ठ समाजसेवक डॉ सिद्रामप्पा खजूरे यांचे मार्गदर्शन मिळत आहे. शिबीरामध्ये किर्तन, प्रवचन कसे करायचे, मृदंग वादन,पेटी वादन याचे धडे, गीतेचा संस्कृतमधील अभ्यास, हरिपाठ, मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी विविध व्याख्यान, अभंग, भारुड, गवळणी, मुलांचे वाचन घेणे आदी कार्यक्रम या शिबीरामध्ये संपन्न होत आहेत

> सध्याची पिढी वेगळ्या विचाराने वहात चाललेली आहे, त्यामुळे प्रत्येक पालक हा आपल्या बालकांचा विचार करीत आहे, त्यामुळे वारकरी सांप्रदायाचे वळण लागण्यासाठी, आणि त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, फक्त टाळ पक्काजाचेच शिक्षण न देता चांगले आणि सुंदर आयुष्य जगण्यासाठी ज्या संस्काराची गरज आहे ते संस्कार या शिबीरामध्ये दिले जातात
>
> **- हभप वैभव महाराज कानेगावकर**

> शिबीरात संस्कारातून भोळेपणा येणार नाही तर अंध:श्रध्देचे समर्थनही होणार नाही तर वाईट गोष्टींपासून आजचा बालक दूर रहावा, त्याच्यातील दुर्गुण कमी व्हावेत, व्यसनाधीनता, नैराश्य दूर व्हावे, आई वडीलांची सेवा करावी,त्यांच्यात कलेचा अविष्कार निर्माण व्हावा,व कठीण परिस्थितीत जीवन जगण्यासाठी सामर्थ्य निर्माण करण्यासाठीचे संस्कार या शिबीरामध्ये करण्यात येत आहेत
>
> **- डॉ. सिद्रामप्पा खजूरे, ज्येष्ठ समाजसेवक खुदावाडी**

## महत्वाचे...



### माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांना निशिगंध व अबोली काव्यसंग्रह भेट

**बार्शी, दि. ५ मे-**

मयुरी बाबर लिखित शिव-सई पुत्र शंभू या काव्यसंग्रहाचे प्रकाशन माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील, जयुकमार शितोळे, पां. न. निपाणीकर व कवी प्रकाश गव्हाणे हे उपस्थित होते. बाबर यांनी या काव्यसंग्रहातून स्वराज्यरक्षक शंभूराजे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे. शंभूराजेंचे व्यक्तित्व व कर्तृत्व यातून सिद्ध झालेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्य स्थापनेत योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा काव्यरूपात परिचय दिला आहे. त्याचबरोबर प्रा. राहुल पालके यांनी स्वलिखित निशिगंध व अबोली हे काव्यसंग्रह सुशीलकुमार शिंदे व अभिजीत पाटील यांना भेट दिलेले आहेत. या काव्यसंग्रहातून त्यांनी बार्शी तालुक्यातील विद्यार्थी व सामाजिक प्रश्नांचा उहापोह करून परिवर्तनचा मंत्र साकारला आहे. उशाखालचं गाठोडं, संवादाची जागा? पेटलेले मन, मानवलीला आदी कवितांमधून त्यांनी संघर्षाचे स्वरूप मांडले आहे.

### श्री दत्त गायन समाजाची संगीतसेवा श्री भगवंत चरणी अर्पण

**बार्शी, दि. ५ मे-**

श्री भगवंत महोत्सव २०२५ सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत 'भगवंता मायबापा' हा सुमधुर अभंग व भक्तीगीतांचा कार्यक्रम सकाळच्या सत्रात मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये पार पडला. गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली, कानडा राजा पंढरीचा, दर्शन दे रे भगवंता, देह देवाचे मंदिर, विठ्ठला तू वेडा कुंभार, या लोकप्रिय गीतांसोबतच सनई, सतार, बासरी, हार्मोनियम व तबलावादनाने उपस्थितांची मने जिंकली. कलाकारांची सूर तालावरील पकड, पाठांतर आणि नियमित रियाज या सादरीकरणातून दिसून येत होता. आपण शिकत असलेली कला आपल्या ग्रामदैवत श्री भगवंता समोर सादर करण्याची संधी मिळणे हे कलाकरांचे भाग्यच आहे, अतिशय चांगला कार्यक्रम पाहिल्या दिवशी पार पडला. सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा या कानडी अभंगाने व सनई वादनाने रसिकांची विशेष दाद मिळवली. यामध्ये वेदांत देशमुख, आश्लेषा पांढरे, महिका शहाणे, मल्हार खांडेकर, मधुरा घाटे, शुभ्रा डोके, समीक्षा खांडेकर, तेजश्री बोंदर, रुंजी चव्हाण, अथर्व डोके, अभिनव दगडे, श्रावणी माने, मानवी जगदाळे, श्रावणी नागरगोजे, देवांश पंडित, शोभना रणशूर, आरोही कोकाटे, मनाली करंजकर, गार्गी गंभीर, शमिका नाईक, सानवी राऊत, सोहम राऊत, अनिरुद्ध वाळके, अनुराग पाटील, दीपराजन हामने, सुमित घाडगे, निखिल गरड, सौम्या सोपल व चिन्मयी सोपल या कलाकारांनी आपली कला सादर केली. यांना हार्मोनियम वर सुरेश जाधव कृष्णा खांडेकर , सुखदा नाईक तर तबल्यावर प्रदीप सुतार अभिजीत कदम, कौस्तुभ पाठक यांनी उत्तम साथसंगत केली. या कार्यक्रमासाठी श्री दत्त गायन समाजाच्या संचालिका प्रा. डॉ. अबोली सुलाखे व दत्त गायन समाजाचे केंद्र व्यवस्थापक अमोल सुलाखे यांचे मार्गदर्शन लाभले.





### ज्ञानेश्वर दुधाणे यांना कै. आप्पासाहेब चव्हाण स्मृती पर्यावरण पुरस्कार

**पंढरपूर, दि. ५ मे -**

कै.आप्पासाहेब चव्हाण स्मृती सामाजिक पर्यावरण पुरस्कार करकंब येथील करकंब गावच्या लेकीचं झाड अभियान टीमचे संकल्पक ज्ञानेश्वर दुधाणे यांना वामनराव माने (पं.स.पंढरपूर माजी सभापती) यांचे हस्ते आणि पंडीतराव देशमुख, (सभापती कृषी)हरिदादा गायकवाड,मा. जि.प.सदस्य सुभाष माने. निशिकांत परचंडराव मुख्याधिकारी या मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. करकंब गावामध्ये वृक्ष संवर्धन चळवळीच काम गेल्या तीन वर्षापासून अतिशय महत्त्वपूर्ण आणि सातत्यपूर्ण सुरू असून या कामाच्या योगदानामुळे ज्ञानेश्वर दुधाणे यांना पर्यावरण सामाजिक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तसेच साहित्यामध्ये रेणुका बुधाराम तर शैक्षणिक क्षेत्रात पांडुरंग शिंदे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत मंदार केसकर तर प्रास्ताविक प्रताप चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचलन सचिन लादे, ज्ञानेश्वर मोरे आणि देशमुख यांनी करत आभार सचिन यांनी मानले. आयोजक अमरसिंह चव्हाण,अमोल चव्हाण, प्रताप चव्हाण आणि मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले.

### कांदलगाव येथे नृसिंह नवरात्र उत्सवास प्रारंभ

**बार्शी, दि. ५ मे-**

तालुक्यातील कांदलगाव येथील ग्रामदैवत श्री नरसिंह जन्मोत्सवानिमित्त नऊ दिवसांच्या नवरात्र उत्सवाला प्रारंभझाला आहे. या निमित्ताने दि. ५ मे ७ दिवसांच्या अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा शुभारंभ होणार असल्याची माहिती नृसिंह देवस्थान समितीचे अध्यक्ष हरिदास फुरडे पाटील यांनी दिली. अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यामध्ये पांडुरंग महाराज उंबरे, बिभीषण महाराज गिलबिले, गोपीनाथ बानगुडे महाराज, अण्णासाहेब बोधले महाराज, सिद्धी ताई अंधारे महाराज, दयानंद कोरे महाराज आणि ज्ञानेश्वर माउली महाराज नगरे यांची कीर्तन सेवा होणार आहे. ज्ञानेश्वर माउली गुरव, रावसाहेब करंडे महाराज, शंकर महाराज जगताप, अशोक महाराज मोरे, हरिओम सातपुते महाराज आणि विवेक धस महाराज यांची प्रवचने होणार आहेत. रविवार, दि.११ रोजी नरसिंह जयंतीचा मुख्य सोहळा पार पडणार असून, दुपारी भव्य अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सोमवार, दि.१२ रोजी सकाळी सीताराम महाराज गडाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांचे काल्याचे कीर्तन झाल्यानंतर, समस्त ग्रामस्थांच्या वतीने काल्याचा महाप्रसाद वाटप होईल, तर रात्री देवाची पालखी छबिन्याचा कार्यक्रम होणार आहे.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोटचा निकाल ६६.४३ टक्के; कॉपीमुक्त अभियानाचा परिणाम

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.५ मे-**

कॉपीमुक्त अभियानाच्या परिणामामुळे यंदा अक्कलकोट तालुक्याचा बारावीचा निकाल ६६.४३ टक्के लागला आहे. गेल्यावर्षी हाच निकाल ९० टक्के इतका लागला होता.


यंदा निकालाची टक्केवारी सुमारे २३.५७ टक्के घसरली आहे. बारावी परीक्षेचा निकाल सोमवारी ऑनलाईन जाहीर झाला. अक्कलकोट तालुक्यातून बारावी परीक्षेला १ हजार ४८६ मुले तर १ हजार २२२ मुली असे एकूण २ हजार ७०७ विद्यार्थी बसले होते. यातील प्रत्यक्षात २ हजार ६७८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यातील एकूण १ हजार ७७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कॉपीमुक्त अभियानाचा चांगलाच परिणाम येथे दिसून आला. यात विद्यार्थ्यांचे नुकसान करण्याचा हेतू नसून स्पर्धात्मक युगात अभ्यास करण्याची प्रवृत्ती वाढावी हाच हेतू असल्याचे गट शिक्षणाधिकारी प्रशांत आरबाले यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात यंदा बारावी व दहावी परीक्षेच्यावेळी कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले. तरीही कॉपीचे ३७ प्रकार उघडकीला आले होते. परीक्षा केंद्रावर कडक लक्ष केंद्रित करण्यात आल्यामुळे व परीक्षकांमध्ये बदल करण्यात आल्यामुळे अभियानाचा प्रभाव दिसून आला. यामुळे निकालाच्या टक्केवारीत फरक दिसून येत आहे. भविष्यात विद्यार्थ्यांनी अभ्यासावर भर द्यावा हेच या अभियानाचे उद्दिष्ट असल्याचे गटशिक्षणाधिकारी आरबाले यांनी स्पष्ट केले.



## बारावीचा निकाल





### सांगोल्याचे उत्कर्ष विद्यालय १०० टक्के

बारावी परीक्षेत सांगोला येथील उत्कर्ष विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सलग दुसऱ्यावर्षी देखील १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये अथर्व भारत वेदपाठक ८२ टक्के, आकांक्षा सावंत ७४.८३ टक्के, अनुप पतंगे ७३ टक्के गुण मिळवून अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक या विद्यार्थ्यांनी पटकावला.३२ विद्यार्थ्यांपैकी २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले असुन ६ विद्यार्थ्यांनी ७० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.निलिमा कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. संजीवनी केळकर, सचिव वसुंधरा कुलकर्णी, कोषाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी, प्राचार्य सुनील कुलकर्णी, प्रा. राजेंद्र ठोंबरे यांनी अभिनंदन केले.





### वळसंगचे शंकरलिंग महाविद्यालय ८९.६६ टक्के

तालुका दक्षिण सोलापूर येथील श्री शंकरलिंग कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ८९.६६ टक्के लागला असून या परीक्षेत ५८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १ विद्यार्थिनी विशेष प्राविण्य, १३ विद्यार्थी प्रथम श्रेणी २१ विद्यार्थी द्वितीय श्रेणी आणि तृतीय श्रेणीत १७ विद्यार्थी असे एकूण ५२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कनिष्ठ महाविद्यालयात कुमारी हंजगे वैष्णवी तिप्पण्णा हिने ७६ टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम, सुरपुरे संजना संतोष हिने ७४.८३ टक्के मिळवून द्वितीय, तर तेली प्रेमा सूर्यकांत हिने ७३.५० टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, सदस्य विश्वनाथ थळंगे, रामेश्वर बिज्जरगी माजी प्राचार्य शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, सिद्धाराम बागलकोट, चंद्रशेखर दसमाने, शंकर केशेट्टी प्रकाश दुधगी प्राचार्य वीरेश थळंगे पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.

### पिलीवचे कर्मवीर भाऊराव पाटील अन रमेश खलीपे महाविद्यालय ९० टक्के

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजचा बारावी कला शाखेचा निकाल ९० टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यामध्ये कला शाखेतील ४४ विदयार्थी फेब्रुवारी (मार्च) महिन्यात झालेल्या परीक्षेस बसले होते त्यापैकी ४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेचा निकाल ९०.९१ टक्के लागला यामध्ये प्रथम सुरवसे विनायक लक्ष्मण ६१.५० टक्के, द्वितीय अनिकेत कुंभार ६० टक्के, तिसरा समृद्धी जामदार ५७.६७ टक्के तर विज्ञान शाखेतील ७४ विदयार्थी परीक्षेस बसले होते. विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक रुपाली तांबवे ६० टक्के, द्वितीय माहेश्वरी पाटील ५९.१७ टक्के, तृतीय अलफिया मुलाणी ५८.८३ टक्के सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे प्राचार्य एस.डी. कापसे, पर्यवेक्षक किरगत, विभागप्रमुख एस.एस.पाटील, स्थानिक स्कूल कमीटी सदस्य संग्रामसिंह जहागीरदार, गणेश पाटील, संग्राम पाटील, वरिष्ठ लेखनिक भोरकडे यांनी यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# बारावीला यंदाही जिल्ह्यात मुलींची बाजी

### बहुतांश महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मे-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मार्च-एप्रिल २०२५ मध्ये पार पडलेल्या बारावी परीक्षेचा निकाल आज ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला. यामध्ये जिल्ह्यात यंदाही मुलींनीच बाजी मारल्याचे दिसून आले. जिल्ह्यातील बहुतांश महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.



### ग्लोबल व्हिलेज कॉलेजचा सलग दहाव्या वर्षी १०० टक्के निकाल

बोरामणी (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्लोबल व्हिलेज ज्युनिअर कॉलेजचा निकाल सलग दहाव्या वर्षी १०० टक्के लागला. विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी आरोही पाटील ९०.१७ टक्के प्रथम, श्रीनिवास गायकवाड ८६.८४ टक्के द्वितीय, वेदांत दोशी ८५.५० तृतीय, हरी अंबरकर ८५.३३ टक्के चतुर्थ, मोहसीन खुरुसे व आदित्य बागमार ८४.३३ टक्के मिळवून पाचव्या स्थानावर यश मिळविले. या परीक्षेत ग्लोबल व्हिलेज ज्युनिअर कॉलेज मधून ७८ विद्यार्थी परीक्षेस सामोरे गेले होते. २२ विद्यार्थी विशेष प्रविण्यासह तर ४८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना प्राचार्या आसमा नदाफ, प्रा. डॉ. अविनाश पाटील, प्रा. अनिकेत चनशेट्टी, प्रा. मल्लिनाथ जळकोटे, प्रा. आप्पासाहेब गुगले, प्रा. राहुल काळे, प्रा.शिवानंद पाटील प्रा. प्रियांका माने आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा व शैक्षणिक समन्वयक प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी अभिनंदन केले.

## बारावी परीक्षेत वैरागमध्ये मुलींनी राखले वर्चस्व

वैराग शहर व भागातील बहुतांशी शाळा व महाविद्यालयांच्या निकालामध्ये मुलांपेक्षा मुलींनी बाजी मारल्याचे दिसून येत आहे.

शारदा देवी कनिष्ठ महाविद्यालय : प्रथम सानिका पवार (८०.३३ टक्के) द्वितीय : वैष्णवी मोटे ( ७७.८३ टक्के) तृतीय : सचिता केंदळे ( ७५. ५० टक्के) यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी परिक्षेत मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संतोष निंबाळकर, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, प्राचार्य संतोष सरवळे यांनी अभिनंदन केले.

सदगुरु अनुराधाताई देशमुख महाविद्यालय : विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असून प्रथम क्रमांक सुकन्या माळी ( ८८. ८३ टक्के) द्वितीय स्वानंदी नाईक (८७. ६७ टक्के) तृतीय वैभवी शक्तीराज (८७ १७ टक्के). कला शाखेचा ९६ ९६ टक्के निकाल यामध्ये प्रथम अंकुश चौरे ( ७३ टक्के ) द्वितिय अमरदीप काळदाते ( ७१.५० टक्के ) तृतीय नितीन मारकड ( ७०.१७ टक्के ) सर्व यशस्वी मुला -मुलीचे संस्थेचे अध्यक्षा माजी जिल्हा परिषद सदस्या सुरेखा कोरके, संस्थेचे सचिव डॉ. कपिल कोरके, डॉ. अमिता कोरके, डॉ. शितल कोरके, संस्थेचे खजिनदार विनायक डोईफोडे, बापूसाहेब करडे, प्राचार्य खंडेराया घोडके व मुख्याध्यापक विकास पाटील यांनी अभिनंदन केले.

विद्या मंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शास्त्र शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्रिया सुर्यवंशी (९०.५० टक्के) वैष्णवी भोसले (८८. ५० टक्के) तृतीय वैष्णवी साळुंखे ( ८७ ६७ टक्के ) तर विशेष प्रावीण्य- ११२ प्रथम श्रेणी १२२ आणि द्वितीय श्रेणीत ३ विद्यार्थी पास झाले. विद्या मंदिर : कला शाखा ( ८७. ८७ टक्के ) यामध्ये वैभव डोके (६९ ३३ टक्के), स्वरूप क्षीरसागर (६४.६७ टक्के) ओंकार सरवदे (६३ टक्के) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भूषण भूमकर.चेअरमन मृणाल भूमकर सचिव निनाद भूमकर व प्राचार्य कल्याण करंडे यांनी अभिनंदन करण्यात आले.

तुळशीदास जाधव उच्च माध्यमिक प्रशालेचा निकाल ९८ ६८ टक्के निकाल लागलेला असून यामध्ये स्नेहा जाधव ८४. ८३ टक्के, माया सुरवसे ८३ ६७ टक्के, प्रांजली नाईकवाडी ८२. ५० टक्के, ऋतुजा लोखंडे ८२.५० टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे संस्थेचे अध्यक्ष व्ही. बी. पिसाळ, जनरल सेक्रेटरी श्रीमती एस. एन. गडसिंग, उपाध्यक्ष प्रमोद जगताप, जॉईंट सेक्रेटरी हेमंत गडसिंग, संचालक मिरगणे, प्राचार्य सतीश चव्हाण आदींनी अभिनंदन केले.

### अर्णव उच्च माध्यमिक विद्यालय

विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा ९८ टक्के. विज्ञान शाखेमध्ये सिद्धार्थ जगताप (९३.१७ टक्के) श्रीराम शिक्रे (८९.१७ टक्के ) आर्यन चेंट्टी (८७ टक्के) महेश कुरुंद (८५.८३टक्के) धनश्री कोत्तावार (८५.८३ टक्के). ६६ विद्यार्थ्यांना ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सचिव रविंद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचा निकाल ९५.७१ टक्के

बारावी परीक्षेचा शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचा निकाल ९५.७१ टक्के लागला. संस्थेच्या सात शाखेतून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रमातून १६३२ विद्यार्थी परीक्षेला बसले. यापैकी १५६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेत सदाशिवराव माने विद्यालयातील वाणिज्य शाखेचा वरद कोतमीरे ८९.८३ टक्के प्रथम, तर कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज सदाशिवनगरची मनाली भुजबळ हिने ८९.५० टक्के द्वतीय क्रमांक पटकावला. सदाशिवराव माने विद्यालयाची विज्ञान शाखेची क्रांती पांढरे हिने ८९ टक्के मिळवीत तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेच्या सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथून विज्ञान, कला, वाणिज्य व व्य.अभ्यासक्रम या शाखेतून ५८६ विद्यार्थी परीक्षेला





बसले यापैकी ५७६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाखेचा निकाल ९८.२९ टक्के लागला. यशवंतनगरच्या महर्षी शंकरराव मोहिते प्रशालेतून विज्ञान, कला, व्य. अभ्यासक्रमातून २४१ विद्यार्थी पैकी २३२ उत्तीर्ण होऊन निकाल ९६.२७ टक्के लागला. अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयातून विज्ञान, कला, वाणिज्य, व्य. अभ्यासक्रमातील ३९४ पैकी ३७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व निकाल ९५.९४ टक्के लागला. सदाशिवनगरच्या कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय व ज्यू. कॉलेज मधील विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतून १६० पैकी १५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व निकाल ९८.१३ टक्के लागला. अकलूजच्या जिजामाता कन्या प्रशालेतून विज्ञान शाखेतील १३६ पैकी १३६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल १०० टक्के लागला. वेळापूरच्या सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील विद्यालयातून कला विभागात ८८ पैकी ५८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल ६५.९१ टक्के लागला. नातेपुते येथील श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज येथील कला शाखेतून २७ पैकी २५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल ९२.५९ लागला. या यशाबद्दल संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, सर्व संचालक मंडळ, विविध पदाधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### पैकीच्या पैकी गुण मिळवणारे विद्यार्थी


मुस्कान युनूस सय्यद, पशुविज्ञान व दुग्ध व्यवसाय विषयात २०० गुण. अंकिता सांगवे, कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विषयात १०० गुण (दोन्ही विद्यार्थी सदाशिवराव माने विद्यालय अकलूज), तक्षशिला दळवी, कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विषयात १०० गुण.(जिजामाता कन्या प्रशाला अकलूज)



## यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळाचा निकाल ९५.३२ टक्के

करमाळा येथील विद्या विकास मंडळ संचलित यशवंतरात चव्हाण महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ९५.३२ टक्के लागला. यामध्ये विज्ञान शाखेचा ९८.५२ , वाणिज्य शाखेचा ९७.७७ तर कला शाखेचा ९२. ०१ टक्के निकाल लागला. विज्ञान शाखेमध्ये भक्ती कोंडलकर ७३.६७ टक्के प्रथम, सिद्धी व्हरे ७३.५० टक्के द्वितीय, विक्रमादित्य कोळेकर ७३.१७ टक्के तृतीय क्रमांक. वाणिज्य शाखेत मानसी वासानी ९०.६७ प्रथम, अमृता सांगळे ८७.१७ द्वितीय, अनुष्का चौगुले ८५.५० तृतीय क्रमांक. तर कला शाखेते संजना मारडकर ८८ टक्के प्रथम, पूजा गोरे ८६.५०% टक्के द्वितीय, गुलनाज शेख ८२.३३ टक्के तृतीय क्रमांक. सर्व यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, संस्थेचे सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.

# रणजितदादांच्या वाढदिनी लाखो वह्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज,दि.५ मे-**

विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील हजारो कार्यकर्त्यांनी लाखो वह्यांची भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर झाडांची रोपेही कार्यकर्त्यांकडून देण्यात आली.

आ रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवरत्न बंगला येथे सकाळी पत्नी सत्यप्रभादेवी मोहिते पाटील व स्नुषा शिवांशिका विश्वतेजसिंह मोहिते पाटील यांनी औक्षण करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील , आई नंदिनीदेवी मोहिते पाटील व सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांचे आशीर्वाद घेऊन शिवरत्न बंगल्या समोर उभारलेल्या भव्य शामियान्यात आ रणजितसिंह मोहिते पाटील यांनी राज्यातून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांकडून दिवसभर शुभेच्छा स्वीकारल्या . राज्यातून आलेला प्रत्येक कार्यकर्ता वह्या व झाडांची रोपे भेट देवून वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होता.खा धैर्यशील मोहिते पाटील, आ उत्तमराव जानकर, आ नारायण पाटील, आ बाबासाहेब देशमुख, माजी उपसभापती अर्जूनसिह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, राष्ट्रवादीचे बीड जिल्ह्याचे नेते राजसाहेब देशमुख , जयप्रकाश कदम , अमर शेख, छत्रपती संभाजीनगरचे वसंत वडीकर, अनिल जाधव , धुळ्याचे नरेश पवार , मुंबईचे उदय प्रताप सिंग, लातूरचे राहुल पाटील सास्तुरकर , भारत जाधव , राजू सुपाते, श्री शंकर सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन ड मिलिंद कुलकर्णी , कार्यकारी संचालक स्वरुप देशमुख , आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे व्हा चेअरमन महेंद्र पाटील , शिवामृत दुध उत्पादक सहकारी संघाचे व्हा चेअरमन दत्तात्रय भिलारे , कार्यकारी संचालक रविराज इनामदार , शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे , शेतकरी खरेदी विक्री संघाचे चेअरमन नितीन निंबाळकर, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप आप्पा घाडगे यांच्या सह सोलापूर जिल्हा व राज्यातील हजारो कार्यकर्त्यांनी वाढदिवसानिमित्त आ रणजितसिंह मोहिते पाटील यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. सहकार महर्षी सहकारी साखर कारखान्याचे व श्री शंकर सहकारी साखर कारखाना तसेच शिवामृत दूध उत्पादक संघ व परिसरातील सहकारी संस्थांचे सर्व संचालक मंडळाने आमदारांजीत सिंह मोहिते पाटील यांना शुभेच्छा दिल्या.



## सांगोला विद्यामंदिरचे बारावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ मे -**

बारावीच्या परीक्षेत सांगोला विद्यामंदिर ज्यु. कॉलेज मधील कला शाखा ९४.७४, वाणिज्य शाखा ९८.९९ तर शास्त्र शाखेचा निकाल ९९.१२ टक्के व ज्युनिअर कॉलेजचा एकूण निकाल ९८.३६ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. कला शाखा सृष्टी लिगाडे ९०.१७ प्रथम, आशा बुरांडे, सुजित शिवशरण ८८.३३ द्वितीय, सानिका जरे ८२ तृतीय, वाणिज्य शाखा गुरूदेव बनकर ९२.८३ प्रथम, मृणाल दबडे ९२.५० द्वितीय, सुहास नलवडे ९१.८३ तृतीय, शास्त्र शाखा गौरी वाघमारे ८९.३३ प्रथम, मानसी सुरवसे ८९ द्वितीय, तर प्रतिक्षा गौंड ८७.६७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव म.शं.घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, सर्व संस्था सदस्य, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले यांनी अभिनंदन केले.